भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें

वर्ष ४३] त्रैमासिक [अंक १-४

१६९-१७२

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

७ वा खंड

(स्वीय ग्रंथमाला क्र. ९६)

BHĀRATA ITIHĀSA SAMŚHODHAKA MAṆḌAḶA

Vol XLIII { QUARTERLY } Nos. 1-4

169-172

Miscellaneous Articles On Indian History Vol. VII

शक १८८७] किंमत ५ रु. [A. D.
रा. श. २९३] Price Rs. 5 [1965

निवेदन

१. या मंडळाच्या त्रैमासिकाच्या ४३ व्या वर्षाचा हा जोड अंक आहे. यांत त्या वर्षाचे १–४ अंक समाविष्ट आहेत. याचेंच दुसरें नांव ऐतिहासिक संकीर्ण निबंध ७ वा खंड हें आहे. हा श. १८८४ सालीं असलेल्या मंडळसभासदांसाठीं आहे. श. १८८२ व १८८३ या वर्षांसाठीं काढलेला जोड अंक प्रकाशित होऊन ३ महिने नुकतेच झाले. तोंच श. १८८४ करितां द्यावयाचा हा अंक प्रकाशित होत आहे. पुढील अंकहि असेच जलदीनें काढून अंकप्रकाशनाचें काम अद्ययावत् आणून सोडावें अशी योजना आहे. प्रयत्न चालू आहे. यश मिळेल असा विश्वास आहे.

२. पेशवाईतील व पेशव्यांची भक्ति असलेले पुण्यपुरुष नारायणदीक्षित पाटणकर मराठी इतिहासाच्या अभ्यासकांना तरी अपरिचित नाहींत. त्यांचेकडील कागदपत्रादींचा संग्रह या मंडळास द्यावा अशी त्यांचे वंशज व या मंडळाचे एक अभिमानी सभासद कै. सरदार गंगाधरराव यज्ञेश्वर उपाख्य तात्यासाहेब दीक्षित कायगांवकर यांची फार वर्षांपासूनची इच्छा होती. ती इच्छा त्यांचे पुत्र श्री. रामचंद्र गंगाधर दीक्षित, डॉ. मोरेश्वर गंगाधर दीक्षित व त्यांचे इतर बंधु यांनीं पूर्ण केली. त्यांचे इनाम गांव कायगांव येथून ती सामग्री नुकतीच मंडळांत आली हें कळविण्यास संतोष वाटतो. सर्व दीक्षितबंधूंचें याबद्दल अभिनंदन करतों.

३. सामान्य सुशिक्षित जनतेंत इतिहासाभ्यासाची वाढती आवड निर्माण व्हावी म्हणून या मंडळानें सुमारें दहा वर्षांपूर्वी तीन वेळां इतिहासाभ्यासवर्ग चालविला होता. मध्यंतरीं इतर कामांच्या गर्दीमुळें तो वर्ग स्थगित झाला होता. गेल्या उन्हाळ्यापासून तो पुनः चालू केला आहे. उन्हाळा व दिवाळी या दोन्ही सुट्यांत सालोसाल तो वर्ग सतत चालू ठेवावा असें योजीत आहों. कदाचित् प्रारंभिक व प्रागतिक असे दोन वर्गहि चालवावे लागतील. एकच अभ्यासक सतत दहा वर्गांना उपस्थित राहून सप्रात्यक्षिक शिक्षणाचा लाभ घेईल तर त्याची संशोधक बनण्याची प्राथमिक तयारी पूर्ण होईल असा कयास आहे. इतरांच्या ठिकाणीं इतिहासाची निदान गोडी तरी निश्चयानें उत्पन्न होईल असा विश्वास आहे.

४. गेल्या अंकाप्रमाणें याहि अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाकडून साह्य मिळणार आहे याबद्दल मंडळास संतोष वाटतो व हें मंडळ त्या मंडळाचे आभारी आहे.

श. १८८७ शिवराज्याभिषेकदिन,
दि. ११ जून १९६५ इ.

चिटणीस



यक्ष-विनायक पृ. ९



दक्षिणामूर्ति पृ. १०



जन्म : इ. १८२५] विष्णुबुवा ब्रह्मचारी [मृत्यु : इ. १८७१

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ४३] त्रैमासिक [अंक १-४

१६९–१७२

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

७ वा खंड

(स्वीय ग्रंथमाला क्र. ९६)

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌAḶA

Vol XLIII } QUARTERLY } Nos. 1-4

169-172

Miscellaneous Articles On Indian History Vol. VII

शक १८८७
रा. श. २९३]

किंमत ५ रु.
Price Rs. 5

[A. D.
1965

अनुक्रमणिका

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्रसरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१ प्रकाशनस्थळ—	भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
२ प्रकाशनकाल—	त्रैमासिक
३ मुद्रकाचें नांव राष्ट्रीयत्व व पत्ता	दत्तात्रेय वासुदेव आंबेकर; भारतीय; आर्यभूषण प्रेस, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४
४,५ प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते	श्री. गणेश हरि खरे, श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, डॉ. बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर, भारतीय; १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
६ मालक व पत्ता—	भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें वर दिलेला तपशील अचूक आहे.

ता. ३०।६।१९६५ **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**

मुद्रक : **द. वा. आंबेकर**, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

प्रकाशक : **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

भारत - इतिहास - संशोधक - मंडळ, पुणें

वर्ष ४३] त्रैमासिक [अंक १–४

१ पणयो बलोचस्थानञ्च*

(जैतलीत्युपाह्वो टोपणलालस्यात्मजः कृष्णशर्मा, काव्यतीर्थः, आयुर्वेदरत्नम्, पुण्यपत्तनम्।)

वेदेष्वार्याणां " पणिः " नाम्नैका शाखा[1]। " पणिर्वणिग्भवति " इति निरुक्तवचनम् (नि. नै. काण्डे. अ. २। खं. १८)। पौराणिकानां मतेन पणयो रजःस्वभाविनो रसातलवासिनश्च। उक्तञ्च श्रीमद्भागवते—" धरां रजःस्वभावेन पणयः " (स्कं. ३। अ. ६ श्लोक २८)। अपरञ्च—

" ततोऽधस्ताद्**रसातले** दानवाः पणयो नाम निवातकवचाः कालेया **हिरण्यपुर**वासिन इति विबुधप्रत्यनीका उत्पत्त्या महौजसो महासाहसिनो भगवतः सकललोकानुभावस्य हरेरेव तेजसा प्रतिहतबलावलेपा बिलेशया इव वसन्ति, ये वै सरमयेन्द्रदूत्या वाग्भिर्मन्त्रवर्णाभिरिन्द्राद् बिभ्यति " ॥ ३० ॥ (भागव. स्कं. ५। अ. २४)

*आधुनिकक्वेटानगराच्छड्योजनं, डेरागाजीखां-नगराच्च षट्त्रिंशद्योजनमन्तरेण " '**हरनाई** " नाम्ना प्रसिद्धं नगरं '**हिरण्यपुरं**' संभाव्यम्। मयसोपोटामियमारभ्य[2] बलोचस्थानपर्यन्तं **रसातलं** ज्ञायते। 'रसा' एवावेस्तायां 'रंहा' 'राँघा' वा शब्दोच्चारणेन प्रसिद्धा। अस्यास्तटवर्तिप्रदेशोऽपि पवित्र इति झरथुश्त्रमतानुयायिनां मतम्।

श्रीमद्भागवतस्योपर्युक्तोद्धरणे ऋग्वेदस्य दशममंडलोक्ता कथा संकेतिता (ऋ. मं. १०। सू. १०८ ॥)। तत्र पणीनां 'बल' नामाऽसुरो नृपतिरासीत्। एकदा पणयो देवानां गा अपहृत्य पर्वतगुहासु न्यलयन्। तासां गवामन्वेषणाय मघवा (= इन्द्रः) 'सरमा' नाम्नीं दूतीं प्राहिणोत्। हिब्रू–भाषायां बल (Baal) शब्दस्य नेता, परमात्मा चेत्यर्थः[2]। 'सरमा' इत्यत्र च 'सर' तथा 'मा' इति शब्दद्वयम्। गल्ला–भाषायां 'सर' शब्दस्य 'श्वा' इत्यर्थः। सर्वासु सेमेटिक-भाषासु द्रविडभाषासु च 'मा' शब्दस्य 'माता' इत्यर्थः[3]।

विचारणीयमधुना यद्भवां निलयनस्थानेन कुत्र भवितव्यम् ?।

---

* वाडदिवस ५४ वा, शक १८८६ (इ. स. १९६४)

वर्तमानसिन्धुदेशस्य पश्चिमसीमायां वर्तते "बलोचस्थान" नाम्ना पार्वत्यो देशः। तत्र 'लस-बेलो' मंडले वर्तते 'बालाबंदर', 'बालावारो कोट्ठ' नाम्ना च ध्वंसावशेषः[४]। सिन्धी-भाषायां 'कोट्ठ' शब्दो दुर्गवाचकः। द्रविडभाषास्वपि कोट्ठ, कोटी, कोट्टु, कोट्ट शब्दानां 'शिखरं' इत्यर्थः[५]। अस्तु।

सायणभाष्येऽसुराग्रणेर्बलस्य नगरं 'बलपुर' नाम्नाऽभिहितम् (ऋ. मं. १० सू. १०८)। 'पुर' शब्दोऽपि दुर्गवाचकः, इति विदुषां मतम्[६]। तेन वैदिकं 'बलपुरं' भाषायां 'बालावारो कोट्ठ' इति नाम्ना वयं निश्चिनुमः। ततः परं 'केच-पंजगोर' प्रदेशयोर्मध्ये 'बिलीदा' नामकं नगरं लभामहे[७]। अत्र 'बिलीदा' शब्दः संस्कृत-भाषायाः 'बिल-द्वार' शब्दस्य परिवर्तितं रूपं स्यात् यत्रापहृताः गवः स्थापिताः स्युः। ततः 'केच' स्थानादधस्तात्समुद्रतटे 'गवादर' नामधेयः प्रदेशः[८]। अयमपि 'गवां द्वारः' इत्यस्यापभ्रंशः। लसबेलो मंडलस्योत्तरे 'गुन्दराणि' नामधेयस्य ग्रामस्य समीपे वर्तन्ते पर्वतगुहाः[९]। अत्रापि 'गुन्दराणि' शब्दस्य 'गोद्वाराणि' इति संस्कृतं रूपं स्पष्टम्। यूनानदेशवासिनो भूगोलवेत्तारः 'लसबेलो' प्रदेशं 'गेद्रोसिया' (Gedrosia) नाम्ना स्मरन्ति[१०]। शब्दश्चायं गे-गु-गो, द्रो-दुरो-द्वार, सिआ-शिला (गो-द्वार-शिला) इतीत्थं परिवर्तनसहः। ईराणदेशवासिनो गश्तास्प नृपस्य समये ऽस्यैव प्रदेशस्य 'कन्दाबील' इत्यभिधानमासीत्[११]। अयमपि शब्दः कन्-कौ-गौ, दा-द्वार, बील-बिलमिति स्वं रूपं व्यनक्ति। प्रान्तस्यास्य पूर्वदिग्भागे सिन्धु-बलोचस्थानसीमायां वर्तते 'खीरथड' नाम्ना पर्वतश्रेणी[१२]। सेयं स्कन्दपुराणस्य हिंगुलाद्रिखण्डे 'क्षीर-क्षेत्र' नाम्नाऽभिहिता[१३]। अनेनात्र गवां बाहुल्यं ध्वन्यते।

अरबदेशवासी प्रसिद्धो भूगोलवेत्ता 'इब्नहौकल' नामधेयो महाभागः 'लसबेलो' प्रदेशस्य 'अर्माबील' इति नाम लिखति[१३]। संज्ञेयं किल महत्त्वपूर्णा पुरातत्त्वान्वेषकेभ्यः तदित्थं, ऋग्वेदस्य प्रथममण्डले त्रयस्त्रिंशदधिकैकशते सूक्ते वर्तते 'बैलयुद्ध' वर्णनम्। तत्र रिपूणां शवस्थापनगर्तानि 'अर्मक' नाम्नाऽभिहितानि। यस्मिन्देशे तानि खातानि, स 'बैलस्थान' नाम्ना कथितः। अत्रेदमवधेयं, यद् बिलमूलको 'बैल' शब्दः। अतो वैदिकस्य 'अर्मक-बैल' शब्दस्य भाषायां 'अर्माबील' इति लघुरूपं सुनिश्चितम्। 'अर्मक' शब्द 'आर्मीनियन्' जातेर्मूलमिति विदुषां मतम्[१४]। इयं जातिरप्यार्याणामेका शाखेति वर्तमानपरिशोधनेन निश्चीयते[१५]। 'आर्मीनियन्' तथा 'फिनीशियन्' इति द्वावप्येकौ। अनयोर्मूलं वैदिकाः पणय एव। अस्तु।

वेदेषु यत्र 'महाबैलस्थानके' इत्यभिहितम् ("बैलस्थानके अर्मके, महाबैलस्थे अर्मके' ऋ० १।१३३।३॥) तत्र वर्तमानसीरियाप्रदेशान्तर्गतो Babilan (बाबीलान) देशोऽवगन्तव्यः। अत्र ह्यसुरो बलो मघवन्नाम्नेन्द्रेण मारितो गर्ते निक्षिप्तश्च, तेनायं 'महा' इति विशेषणेनाभिहितः। यत्र चास्य 'पणि' नामानः सैनिका संग्रामे हताः खातेषु

क्षिप्ताश्च, स देशः केवलं ' बैलस्थान ' नाम्ना ख्यातः। अयमेवाधुना ' बलोचस्थान ' नाम्ना प्रसिद्धः।

वैदिकस्यास्य बैलयुद्धस्य तदाऽधिकं स्पष्टीकरणं भवति यदा बैबिलोनियाप्रदेशो-(खननात्प्राप्तान् कीललिप्युत्कीर्णान् शिलालेखान् पठामः [१६]। येषु ' अवन् ' तथा ' बल्लूल अन्नापद ' इतिनामधेययोर्द्वयोः परस्परं युद्धं वर्णितम्। सुमेरियन्भाषायां ' अवन् ' शब्दो नृपाऽर्थकः [१७]। मयसोपोटामियसमीपे ' सूसा ' (सुषा-वरुणस्य नगरी, लिंग-पुराण) नगरस्य निकटे वर्तते ' अवन् ' नाम्ना नगरम् [१८]। तत्रत्याः नृपतयः प्रागात्मानं ' मह-अवन् ' नाम्नाऽकथयन् [१९]। अत्र ' मह-अवन् ' शब्दो वैदिकस्य ' मघवन् ' शब्दस्य स्पष्टं रूपम्। ऋग्वेदेऽस्य युद्धस्य वर्णनप्रसंगे (१।१३।३६॥) इन्द्रस्य ' अवरमहः ' इति विशेषणो दृश्यते। यदयं शब्दः इष्टिकालेखे वर्णितस्य ' अवन-मह ' शब्दस्य सारूप्यं धत्ते [२०]। तथाऽस्मिँल्लेखे ' बल्लूल ' इति कस्यचिन्नृपस्य नाम। ' अन्ना-पद ' इति शब्देन चास्य वंशनिर्देशः। इह ' अन्ना ' शब्दः सुमेरियन् भाषायां ' श्रेष्ठ ' इत्यर्थबोधकः[२१]। द्रविडभाषास्वपि ' अन, अन्न, अण्णा, ' शब्दाः भ्रातृवाचकाः[२२]। वेदे चास्य सदृशः शब्दः ' इनापदा ' इत्यभिहितः। (छिन्धिवट्टरिणापदा, महावट्टरिणापदा ऋ. १।१३३।२॥)। निरुक्ते ' इन ' शब्दः ' ईश्वर '-पर्यायी (राष्ट्री, अर्यः, नियुत्वान्, इनः-इति चत्वारि ईश्वरनामानि-२।११।२२॥)। ईश्वरो नाम श्रेष्ठः आर्यः। अनेन **' अन्नपद '** तथा **' इनापदा '** शब्दयोः **' आर्यपदः '** इति स्पष्टार्थः। वेदे यत्र ' वट्टरिणापदा ' ' महावट्टरिणापदा ' (ऋ. १।१३३।२॥) पदेषु ' वट्टर ' शब्दः स च सुमेरियन् भाषायां ' बल्लूल ' शब्दस्य सारूप्यं धत्ते[२३]। किमधिकं बलोचस्थानेऽधुनापि-वर्तते ' बलेलो जो दडो ' नामको ध्वंसावशेषः[२४]। यस्योत्खननं मेजर् शेफर्ड् महाभागेन कारितम्। सोऽयं ' बलेलो ' शब्दः सुमेरियन् ' बल्लूल ' शब्दान्न भिन्नः। केचन विद्वांसो बलोचजनान् ' तुर ' (Tura) नाम्नाऽऽह्वयन्ति[२५]। ' तुर ' जनाः गोचारिणो लुण्ठाकाश्चेति मिश्रदेशवासिनामितिहासकाराणां वचनम्[२६]। वेदेष्विन्द्रस्य " तुराषाट् " इति नाम (ऋ. ६।३२।५॥)। " तुराणां हिंसकानां सोढाऽभिभविता " इति वेदभाष्ये भगवान् सायणः कथयति। अरबवासिनश्चेमान् " बलूस " नाम्ना व्यवहरन्ति[२७]। तेषां शब्दस्यास्यार्थः-वनवासिनो, लुण्ठाकाः, तस्कराश्चेति[२८]। बलोचस्थानीय ' लसबेलो ' पदे ' लस ' शब्दस्याप्यरबी भाषायां ' लुण्ठाकः ' इत्यर्थः। तत्र ' बेलो ' शब्दः सिन्धी-भाषाया**मरण्यार्थ**बोधकः। लसबेलोप्रदेशस्य भाषा, सिन्धी-भाषाया अङ्गम्। अस्तु। एवं गोचारिणो द्रव्यापहारकाश्चेमे, इति सर्वसम्मतो निष्कर्षः। इत्थं हि बल्लूल, बलूस, बलूच, बलोच, इत्यभिन्नार्थाः सर्वे शब्दाः। तेन हि वयमस्य प्रान्तस्य भौगोलिक-प्रदेशानां जनानाञ्च वैदिककथाभिः सह समतां विलोक्येत्थं निश्चिनुमो, यत्सोऽयं प्राचीनो प्रदेशो यत्र पणयो मघवतो गा अपहृत्य विभिन्नस्थानेष्वस्थापयन्। येनात्र बिलदा, गवादर, गुन्दराणि, कन्दाबील-प्रभृतीनि नामानि दृश्यन्ते। एवं युद्धे मृतानां शत्रूणां

शवनिखननेन 'अर्माबील', गवां निलयनबिलत्वेन शत्रु-शवानां खात-रूपेण वा 'बैल-स्थानं', पणीनां नेतुर्बलस्याभिधानेन 'बल-स्थानं', बलूसजनानां निवासभूतत्वात् 'बलूस-स्थानं', 'बलूच-स्थानं', 'बलोच-स्थानं' वेति विविधः नामान्यस्य प्रदेशस्य। अत्रत्यजनानां मूलपुरुषाः पणयः इति कथितं मया प्राक्। अद्यापि बलोच-जनेषु 'पणिया' इत्युपनाम प्राप्यते। वेदेष्वेषां जातिस्वभाव उक्तो यथा—

"न्यक्रतून् ग्रथिनो मृध्रवाचः पणीँर श्रद्धाँ अवृधाँ अयज्ञान्।
प्रप्रतान्दस्यूँरग्निर्विवाय पूर्व श्चकाराँ पराँ अयज्यून्॥"

(ऋ. ७।६।३॥)

एषामिष्टदेवता भद्रकालीति श्रीमद्भागवते वर्णितम्। यथा—

"अथ कदाचित्कश्चिद् वृषलपतिर्भद्रकाल्यै पुरुषपशुमालभतापत्यकामः॥ १२॥ तस्य ह दैवमुक्तस्य पशोः पदवीं तदनुचराः धावन्तो निशीथसमये निशि तमसावृतायामनधिगतपशवः आकस्मिकेन विधिना केदारान्वीरासनेन मृगवराहादिभ्यः संरक्षमाणमंगिरसः प्रवरसुतमपश्यन्॥ १३॥ अथ त एनमनवद्यलक्षणमवमृश्य भर्तृकर्मनिष्पत्तिं मन्यमाना बद्ध्वा रशनया चंडिकागृहमुपनिन्युर्मुदा विकसितवदनाः॥ १४॥ अथ पणयस्तं **स्वविधिना**ऽभिषिच्याऽऽहतेन वाससाऽऽच्छाद्य भूषणालेपस्रक् तिलकादिभिरुपस्कृतं भुक्तवन्तं धूप-दीप-माल्य-लाज-किसलयाङ्कुरफलोपहारोपेतया **वैशससंस्थया** महता गीतस्तुतिमृदंगपणवघोषेण च **पुरुषपशुं** भद्रकाल्याः पुरत उपवेशयामासुः॥ १५॥ अथ **वृषलराजपणिः** पुरुषपशोरसृगासवेन देवीं भद्रकालीं यक्ष्यमाणस्तदभिमंत्रितमसिमतिकरालनिशितमुपाददे॥ १६॥ इति तेषां **वृषलानां रजस्तमप्रकृतीनां धनमदरजउत्सिक्तमनसां** भगवत्कला**वीरकुलं** कदर्थीकृत्योत्पथेन **स्वैरं विहरतां हिंसाविहारिणां** कर्मातिदारुणं यद्ब्रह्मभूतस्य साक्षाद्ब्रह्मर्षिसुतस्य निर्वैरस्य सर्वभूतसुहृदः सूनायामप्यननुमतमालंभनं तदुपलभ्य ब्रह्मतेजसाऽति दुर्विषहेण दन्दह्यमानवपुषा सहसोच्चचाट सैव भद्रकाली॥ १७॥ इति (भाग. स्कं. ५, अ. ९)।

बलोचस्थानस्य लसबेलो प्रदेशे वर्ततेऽद्यापि 'हिंगुलाज' नाम्ना भद्रकाली, यां तत्रत्याः मुसलमाना 'नानी' इति कथयन्ति। शीतलापूजायां सिन्धीहिन्दूनां लोकगीतेषु पदमित्थम्-

"हिंगुलाज में नवनींगरियूं नानी, नानी कनि"।

हिंगुलाजतीर्थस्थाने नवकुमार्यस्त्वां नानी, नानी, इति कथयन्ति। इत्यर्थः। प्राचीन-यूनान-धर्मे 'नना' नाम्नी देवताऽऽसीत्। वेदेष्वप्यस्य संकेतो वर्तते। यथा—

" कारुरहं ततो भिषगुपलप्रक्षिणी **नना** " । (ऋ० ९।११२।३॥)

सिन्धुदेशस्य प्रसिद्धः सन्तकविः शाह अब्दुल्लतीफोऽपि स्वकीये ' रसालो नामधेये ग्रन्थे कथयति—

" नांगा **नानीअ** हलिया, सामी सभेई ।
विहक मूं वेई, आऊँन जियन्दी उन रे " ॥ २६ ॥
(शाहजो रसालो । सुरु रामकली, क० १)

नागासंप्रदायिनो सर्वे स्वामिनो ' नानी ' नामकं तीर्थस्नानं प्रस्थिताः । नाहमधुनोपविशामि । तेषां विना नाहं जीवामि । इत्यर्थः ।

एवं सिन्धी–भाषायां ' नानी ' शब्दो ' मातामही ' इत्यर्थे प्रचलितोऽपि देवतार्थमपि व्यनक्ति । अलमनेन विस्तरेण । हिंगुलाजतीर्थस्थानं प्राचीनं यत्र पणयः पुरुषपशुबलिमददन् । एवं बलोचस्थानमेव वैदिक–पणीनां स्थानमिति सुस्पष्टम् ॥

पा० टि०—

१. " कोशोत्सव स्मारकसंग्रह, " काशी नागरी प्रचारिणी सभा, " प्राचीन आर्यावर्त और उसका प्रथम सम्राट् " ले० जयशंकर प्रसाद.

* " विश्ववाणी " प्रयाग, –सितंबर १९४९–" क्या दशरथपत्नी कैकयी ईरानी थी ? " ले० वैद्याचार्य रघुवीरशरणशर्मा (पृ. १८४).

2. " Dravidian Origins and the West " by Dr. N. Lahovary, 1963, Madras (p. 305).

३. तत्रैव (पृ. २०१).

४. बलोचस्तानजी मुख्तसर तारीख–सिन्धी भाषायां, ले. रहिमदादखान बलोच मौलाई शैदाई, सक्खर-सिन्धु. (पृ. ८८ पं. २४).

५. द्वितीय पा. टि. पुस्तकस्य पृ. ३३७.

६. ' Vedic Index ' प्रा. मॅकडोनाल्ड तथा प्रा. कीथ.

७. चतुर्थ पा. टि. पुस्तकस्य भूमानचित्रम्. ८. तत्रैव.

९. ,, पृ. ५, पं. २२. १०. ,, पृ. ८९, पं. १६.

११. ,, पृ. ८९, पं. १९. १२. सिन्धुदेशस्य मानचित्रम्.

१३. चतुर्थ पा. टि. पुस्तकस्य पृ. ९०.

१४. " इन्द्रविजय " संस्कृतम्, ले. विद्यावाचस्पति मधुसूदन झा.

१५. प्रथम पा. टि. पुस्तकस्य पृ. १८९.

१६. " जम्बुद्वीपका धर्म, इतिहास तथा भूगोल " ले. डॉ. प्राणनाथ; नागरी प्रचारिणी पत्रिका भा. १६, अंक १.

१७. तत्रैव.

१८. "

१९. "

२०. ' अवर्मह इन्द्र दादहि '—ऋ. १।१३३।६ ॥ ऋग्वेद सायणभाष्य, वैदिक-संशोधन मंडल, पूना (महाराष्ट्र).

२१. षोडश पा. टि.

२२. द्वितीय पा. टि. पुस्तकस्य (पृ. २०४).

२३. षोडश पा. टि.

२४. चतुर्थ पा. टि. पुस्तकस्य—पृ. ४ पं. २५.

२५. " " " पृ. १५ पं. २५.

२६. " " " पृ. १६ पं. १.

२७. " " " पृ. १५ पं. २३.

२८. तत्रैव.

२. काशींतील कांहीं महत्त्वाचीं प्राचीन शिल्पें *

(श्री. नारायण दत्तात्रय कालेकर, वाराणसी)

प्राचीन परंपरेप्रमाणें वाराणसीला विश्वनाथ दरबार म्हणण्याची प्रथा फार पूर्वीपासून प्रचलित आहे. या दरबारांत देव, दानव, मानव, नाग, यक्ष, किन्नर आणि गन्धर्वादि गण आपल्याकडून आशुतोष भगवान् शंकराची सतत सेवा घडावी या हेतूनें सदैव येत असतात अशी मान्यता आहे.

काशीला केवळ धार्मिक दृष्टीनें महत्त्व आहे असें नसून ऐतिहासिकदृष्ट्याहि हें नगर तितकेंच महत्त्वपूर्ण आहे. येथें भारताच्या कोन्याकोपऱ्यांतून विविध सम्प्रदायाचे लोक संत-महंत, राजे-रजवाडे नेहमींच येत जात असत. या येण्याजाण्यामुळें बऱ्याच संप्रदायांची परंपरा अंशरूपांतच का होईना येथें टिकाव धरून राहिली आहे. या सर्वांत शैव, वैष्णव, गाणपत्य आणि शक्त्युपासक असे लोक असल्यामुळें त्यांच्या उपास्य-देवतांचीं उदाहरणें येथें यत्र-तत्र दृष्टिगोचर होतात. एके काळीं तंत्रशास्त्राचाहि काशींत चांगलाच जोर होता. त्यामुळें त्या शास्त्राशीं मिळत्याजुळत्या बऱ्याच प्रतिमा येथें पाहावयास सांपडतात.

सुमारें चार-पांच वर्षांपूर्वी काशींतील विविध शिल्पांचा मूर्तिशास्त्राच्या दृष्टीनें अभ्यास करण्याचा उपक्रम सुरू केला होता व कांहीं लेख तिकडे तेथील प्रसिद्ध पत्र "आज" मध्यें प्रकाशितहि झालें. मूर्तीवर दिसणारे दागदागिने, हातांतील आयुधें, उभें राहण्याची किंवा बसण्याची पद्धत, मूर्तींचा निर्माणकाल वगैरे तपशिलाची चर्चा त्या लेखांतून केलेली आढळेल. त्या पांच वर्षांच्या कालखण्डांत आम्हांस कांहीं अश्या देव-प्रतिमा पाहावयास मिळाल्या कीं ज्या प्राचीन शिल्पशास्त्राच्या दृष्टीनें खरोखरच अप्रतिम आहेत. त्यांतूनच कांहीं निवडक अश्या सहा मूर्तींचीं वर्णनें मी आजच्या सभेंत चर्चेसाठीं सादर करीत आहें.

गजांकुशधारी नरसिंह

नरसिंहमूर्तीचे 'स्थौण' अर्थात् स्तंभापासून प्रकट झालेली व गिरिज म्हणजे पर्वतापासून उत्पन्न झालेली असे दोन प्रकार आहेत. साधारणपणें हिरण्यकशिपूस मांडीवर घेऊन त्याचें उदर विदारण करणारा नरसिंह स्थौण व याव्यतिरिक्त दुसरा गिरिज म्हटला जातो. केवळ नरसिंह, यानक नरसिंह आणि लक्ष्मीनरसिंह हे गिरिज नरसिंहाचेच प्रकार आहेत.

काशींत सर्व प्रकारच्या नरसिंह-प्रतिमा विद्यमान आहेत. पण त्यांत वरील मूर्ति

* संमेलन ४९ वें, श. १८८४ (इ. १९६२)

कोणत्याहि प्रकारांत बसत नाहीं. ही प्रतिमा ब्रह्मघाटावरील राजमंदिर मोहल्यांत एका मारुतीच्या देवळांत आहे. मूर्ति साधारणपणें पांच फूट उंच असून एका नीळसर पाषाणावर उत्कीर्ण आहे. नरसिंह पद्मासन घालून सिंहासनावर बसले आहेत. मुद्रा गंभीर असून मानेवर दाट आयाळ आहे. या चतुर्भुज नरसिंहानें आपल्या वरच्या उजव्या हातांत अंकुश व डाव्या वरच्या हातांत हत्तीचा उजवा पाय धरला आहे. खालचे दोन्ही हात वरद-मुद्रेंतच गुडघ्यांवर ठेवले आहेत. नरसिंहाचे मस्तकावर मुकुट, कानांत चक्रकुंडलें, गळ्यांत उत्तरीय वस्त्र व मणिमाला शोभा देत आहेत. देवाच्या चारी हातांत वलय असून वक्षस्थळावर आपादलंबिनी वनमाला रुळत आहे. नरसिंहाच्या अंकावर अर्धवट स्थितींत लोळणाऱ्या लक्ष्मीच्या डाव्या हातांत कमळाची कळी दिसत असून तिचा उजवा हात स्पष्टपणें दृष्टिगोचर होत नाहीं. नरसिंहाच्या मागच्या बाजूस मोठीशी प्रभावळ आहे. त्याच्या खालच्या बाजूस दोन सिंह एकमेकांकडे पाठ करून बसले आहेत. या दोन सिंहांच्यामध्यें बद्धांजलि मुद्रेंत एक मानवाकृति आहे. हा गरुड किंवा मूर्तीचा स्थापन-कर्ता असावा असें वाटतें. या मूर्तीचा निर्माणकाल १२ व्या शतकाचे जवळपास असावा. या मूर्तीचें वैशिष्ट्य केवळ तिच्या हातांतील हत्ती आणि अंकुश हेंच आहे. मला तरी आतांपर्यंत मूर्तिशास्त्राच्या प्राचीन किंवा आधुनिक ग्रंथांत असल्या प्रकारची मूर्ति आढळली नाहीं. या मूर्तीशीं बऱ्याच अंशीं मिळणारी एक लहान प्रतिमा नाना फड-णिसांच्या वाड्याजवळ ब्रह्मचारिणी देवीच्या देवळांत ठेविली आहे; पण ती कालदृष्ट्या अलीकडची वाटते.

लक्ष्मी-परिणय

पार्वती-परिणय मूर्तीलाच शिवाची कल्याणसुन्दर मूर्ति म्हणण्याचा प्रघात आहे. असल्या प्रकारच्या बऱ्याच प्रतिमा पाहण्यांत येतात. पण ' लक्ष्मीपरिणय ' मूर्तीचें दर्शन कचितच होतें. काशीच्या प्रसिद्ध मणिकर्णिका घाटावर सिद्धिविनायक नांवाच्या एका गणपतिमंदिराचे भिंतींत एका विशाल दगडावर ही मूर्ति उत्कीर्ण केलेली आहे.

उभ्या असलेल्या चतुर्भुज विष्णूच्या वरच्या हातांत अनुक्रमें शंख व चक्र आहे व खालच्या उजव्या हातानें श्रीविष्णु लक्ष्मीचें पाणिग्रहण करीत असून डावा हात खालीं लोंबता सोडला आहे. विष्णूच्या डोक्यावर करंडक मुकुट, कानांत कुंडलें, गळ्यांत मणिमाला इत्यादि आहेत. परिधान केलेला पीतांबर व उत्तरीय वस्त्राचा सोगा स्पष्टपणें ओळखूं येतो. लक्ष्मी किंचित् नतमस्तक होऊन नारायणासमोर उभी आहे. तिनें आपला उजवा हात नारायणाचे हातांत दिला असून डाव्या हातांत कमळाची कळी घेतली आहे. डावा पाय किंचित् मोडून उभ्या असलेल्या या लक्ष्मीचा केशकलाप, गळ्यांतील व कानांतील आभूषणें पाहण्यासारखीं आहेत. लक्ष्मीच्या पाठीशीं एक मानवमूर्ति उभी असून ती झिजल्यामुळें पुरुष किंवा स्त्री हें ओळखणें शक्य होत नाहीं. याच मूर्तीच्या जवळ एक स्त्री उजव्या हातांत कमळ घेऊन उभी आहे. या कमळ घेऊन उभ्या अस-

लेल्या मूर्तीच्या पायाजवळ अनेक छोट्या मूर्ति आहेत. पण त्या सर्व ओळखूं न येण्यासारख्या भंगलेल्या आहेत.

नारायणाचे मागल्या बाजूस डोक्यावर करण्डक मुकुट घालून एक द्विभुज पुरुष-मूर्ति उभी आहे. या मूर्तीच्या पायाजवळ आणखी कांहीं प्रतिमा आहेत. पण त्या सर्व झिजल्यामुळें ओळखूं येत नाहींत. लक्ष्मी आणि नारायण यांच्या मध्यभागीं वाहनावर आरूढ एक मानवाकृति आहे; पण तीहि अस्पष्टच. या वधूवरांच्या मस्तकांवर पुष्प-वृष्टि करीत गन्धर्व उडत असून अगदीं वरच्या भागास वरातीच्या रूपांत देवसमुदाय विद्यमान आहे. यांत ऐरावतारूढ देवराज इन्द्र व वृषभारूढ शिवगौरी सहज ओळखूं येतात.

यक्ष-विनायक

काशीविश्वेश्वराचे देवळापासून जवळच यक्ष-विनायकाचें मंदिर आहे. यांतील गणेशाची चतुर्भुज मूर्ति एका चौकोनी दगडावर उत्कीर्ण असून या गणपतीच्या प्रमुख तोंडाच्या आजूबाजूस आणखी दोन-दोन तोंडें आहेत. मधल्या तोंडाचे कान इतर मुखांच्या कानांपेक्षां मोठे आहेत. गजाननाचे मस्तकावर गोल टोपीच्या आकाराचा मुकुट असून हातांत व पायांत अलंकार घातलेले आहेत. प्रदक्षिण क्रमानें गणपतीचा पहिला हात वरद मुद्रेंत, दुसऱ्यांत पाश, तिसऱ्यानें सर्प धरिला असून चौथा हात मांडीवर पालथा ठेवला आहे. गणेश आपलीं दोन्हीं पावलें एकमेकांसमोर ठेवून बसले आहेत. गणपतीच्या प्रत्येक मुखाचे दांत स्पष्ट असून फक्त मधल्या मुखाच्या दांतावर एका रांगेत तीन लहान लहान हत्ती आहेत. डॉ. नीलकंठ पुरुषोत्तम जोशी यांनी आपल्या एका लेखांत गणेशसहस्रनाम व काशीखण्ड यांचीं उद्धरणें देऊन हत्तीचा गणेशाचे दांतांशीं जवळचा सम्बन्ध दाखविला आहे. पुराणाने प्रमाणित अशी ही गणेशप्रतिमा काशींत फक्त एकच सांपडली आहे.

गज-विनायक

काशींतील लक्ष्मीकुण्ड या प्रसिद्ध स्थानावर लहान-मोठीं अशीं बरींच प्राचीन शिल्पें ठेवलेलीं आहेत. त्यांत विस्तृत अश्या एका शिलापट्टावर एका बाजूस शेषशायी विष्णूची प्रतिमा व दुसऱ्या भागास एका पंगतींत पांच गणपति आहेत. या पांचांपैकीं पहिला द्विभुज आणि अन्य तीन चतुर्भुज आहेत. पांचवा गणपति ‘गजरूपांत’ दृष्टि-गोचर होत असून येथें फक्त हत्तीचे पुढचे दोन पाय व शुंडा स्पष्टपणें ओळखूं येतात. अशीच एक दुसरी प्रतिमा दुर्गाघाटावर सरदार आपटे यांच्या वाड्याशेजारीं शुंडागणेश या नांवानें प्रसिद्ध आहे.

काशी हें शैवोपासनेचें प्रमुख केन्द्र असल्यामुळें येथें ज्याप्रमाणें सर्व काल-

खण्डांतल्या शिवलिंगांचें दर्शन घडतें त्याचप्रमाणें तंत्रमार्गांतीलहि कांहीं शिवलिंगें दृष्टिगोचर होतात. या प्रकारचें एक शिवलिंग श्रीअन्नपूर्णेच्या मन्दिरांत 'यंत्रेश्वर' या नांवानें संस्थापित आहे. या शिवाच्या पिण्डीवर षट्कोण रेखांच्या मध्यभागीं केवळ 'श्री' हें अक्षर कोरलेलें आहे. यापेक्षां सुन्दर शिवलिंग शिंद्यांच्या श्रीबालाजी मन्दिरांत पातालेश्वर या नांवानें प्रसिद्ध आहे. या काळ्या पाषाणाच्या शिवलिंगावर सम्पूर्ण "श्री-यंत्र" उत्कीर्ण आहे व तें आजच्या मितीपर्यन्त सर्व प्रकारें सुरक्षित आहे. या शिव-लिंगाची शाळुंका चौकोनी आकाराची असून घडण फारच सुन्दर आहे. असें म्हणतात कीं, तंत्रशास्त्राचे आचार्य भास्करराय यांनीं या शिवलिंगाची स्थापना करून बरींच वर्षें या शिवाच्या सान्निध्यांत अनुष्ठानहि केलें. त्यांचें हें शिवलिंग व त्याबरोबर मिळालेलें एक नरकपाळ पुढें व्यवस्थेकरितां पेशव्यांकडे हस्तान्तरित झालें. पेशव्यांच्या सम्पत्तीची विल्हेवाट लागत असतांना ती जागा अंग्रेजांकडून शिंद्यांनीं विकत घेतली व आजतागाईत त्यांचेच ताब्यांत आहे. भास्कररायांसारख्या तंत्र–शास्त्रज्ञ पंडितांनीं स्वतःच्या उपासनेकरितां निर्माण केलेल्या या शिवलिंगाचें निर्माणविशेष महत्त्व-पूर्ण असणारच.

दक्षिणामूर्ति शिव

संगीत, भक्ति, योग इत्यादि शास्त्रांचे आचार्य असलेल्या भगवान् शंकरांचें एक नांव 'दक्षिणामूर्ति' आहे. त्यांनीं वरील विषयांचा उपदेश विद्यार्थ्यांना केला होता. यांच्या या शिष्यांचीं खरीं नांवें कोणतीं याबद्दल ग्रन्थकारांत मतैक्य नाहीं. योगपट्टवृत व्याख्यानमुद्रेंत असलेले शिव, आपल्या चार शिष्यांसहवर्तमान, बहुतेक बसलेले दिसतात. काशींत या प्रकारच्या जवळ जवळ पांच सहा प्रतिमा आहेत. पण या सर्वांत श्रेष्ठ प्रतिमा सोनारपुरा येथील तिळभांडेश्वराचे मन्दिरांत आहे. वटवृक्ष, दक्षिणाभिमुख आणि उर्ध्वमेन्ढ्र हीं दक्षिणामूर्ति शिवाचीं चिन्हें येथें स्पष्टपणें दृष्टिगोचर होतात. हिची घडण पहातां हीं गुप्तकालाची अर्थात् जवळ जवळ ५ व्या किंवा ६ व्या शतकांतील असावी असें निश्चितपणें सांगतां येतें. म्हणूनच दक्षिणामूर्ति शिवाच्या सुन्दर व प्राचीन अशा मोजक्या शिल्पांत हिचाहि समावेश प्रामुख्यानें करावा लागत आहे.

---

३ पर्णालपर्वत–ग्रहणाख्यान*

(श्री. यशवंत गणेश फफे, पुणें)

गतवर्षी या मंडळामध्यें शिवभारतावर चर्चा झाली. अशीच चर्चा, संस्कृत भाषेंत जीं आणखीं ऐतिहासिक काव्यें आहेत त्यांवरहि व्हावी अशी इच्छा कित्येकांनीं व्यक्त केल्यावरून मीं पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् आणि राजारामचरितम् हीं दोन संस्कृत काव्यें नुकतींच वाचिलीं. यांपैकीं पर्णालपर्वतग्रहणाख्यान या काव्यावरील चर्चेचा उपक्रम करण्याचें मीं आज योजिलें आहे. ही चर्चा ऐतिहासिकापेक्षां विशेषेंकरून शाब्दिकच होईल. म्हणजे या चर्चेतून कांही नवीन ऐतिहासिक माहिती पुढें येईल असें फारसें नसून या काव्यांत कांहीं अपपाठ पडले आहेत कीं काय, त्यांमुळें श्लोकांचा अर्थ खालीं दिला आहे. तो विपरीत झाला आहे कीं काय इत्यादि प्रकारचीच चर्चा प्रामुख्यानें होईल. तथापि तिच्या योगानें काव्यांतील वर्ण्य विषयावरहि कांहीं प्रकाश पडेल अशी मला आशा आहे.

पर्णालपर्वतग्रहणाख्यानाचा कर्ता **जयराम पिंड्ये**. याचें दुसरें काव्य 'राधामाधव-विलासचंपू ' प्रसिद्ध आहे. याशिवाय शिवचरित्रांतील कित्येक समरप्रसंगांवर या कवीनें काव्यें रचिलीं आहेत हें त्यानेंच आपल्या प्रस्तुत काव्यांत सांगितलें आहे. मात्र यांतील एकहि काव्य अद्यापि उपलब्ध झालेलें नाहीं. हा कवि कर्नाटकांत शहाजीच्या व त्याच्या पश्चात् व्यंकोजीच्या पदरीं होता. तेथेंच त्यानें शिवाजीच्या पूर्वचरित्रावर काव्यें रचून तीं शहाजी व व्यंकोजी यांस ऐकविलीं व तेणेंकरून ते संतुष्ट झाले, असें कवि सांगतो. तो व्यंकोजीस म्हणतो,

महाराजाधिराजोपि शृण्वन्तुष्टोऽभवत् पुरा ॥
भवद्भिरपि यद्गौरीविलासाख्ये सभांतरे ॥
बेंगरूलाख्यनगरे श्रुतं पूर्वार्धमादितः ॥ अ. १।२२ ॥

जयरामकवि कर्नाटकांत राहात होता, महाराष्ट्रांत नव्हता. म्हणून शिवाजीनें तोंवर आदिलशाहीशीं व मोगलांशीं जीं युद्धें केलीं त्यांची माहिती जयरामास कर्णोपकर्णी किंवा अन्य कवींनीं केलेल्या काव्यांवरूनच मिळालेली होती हें त्यानें पर्णालाख्यानांतच लिहून ठेविलें आहे. तो म्हणतो,

यथाभूतं हि तत् युद्धं कविभिर्वर्णितं पुरा
मयापि तत्प्रसादेन किंचिदाकर्ण्य वर्णितम् ॥ अ - १।२० ॥

---

*पाक्षिक सभा ९, १०, ११, १२, शक १८७४ (इ. १९५२)

दुसऱ्या कवींचीं काव्यें पाहून कळलेलें वृत्तच मीं आपल्या शब्दांत वर्णिलें आहे अशी कबुलीच येथें जयरामानें दिलेली आहे. येथें ‘ पुरा कविभिः वर्णितम् ’ यामध्यें कविभिः असें बहुवचन असलें, तरी शिवचरित्रावर अनेक कवींनीं काव्यें केलीं होतीं असें यावरून निश्चित ठरत नाहीं. एकाच कवीचा आदरार्थी बहुवचनानें केलेला हा उल्लेख आहे असें म्हणावयास चिंता नाहीं. जयरामापूर्वी शिवचरित्रावर काव्य करणारा हा कवि कोण ? तो म्हणजे शिवभारतकार कवींद्र परमानंदच होय. परमानंदाचा उल्लेख जयरामानें या पर्णालाख्यानांत चौथ्या अध्यायांत केलेला आहेच. त्याविषयीं अधिक विवेचन पुढें होईल. परमानंदाचें शिवभारत पाहून आपणहि शिवचरित्र गावें अशी स्फूर्ति जयरामास झाली असावी, असें यावरून दिसतें. जयरामास आपल्या कवित्वशक्तीचा किती मोठा अभिमान होता व त्याची आत्मगौरवाची भावना किती तीव्र होती हें त्याच्या दोन्ही काव्यांत ठिकठिकाणीं दिसून येतें. हा कवि तीन वर्षें महाराष्ट्रांत राहून कर्नाटकांत परत गेल्यावर व्यंकोजीच्या दरबारांत त्याचें जें आगमन झालें, त्याचें वर्णन त्यानें कसें केलें आहे. पाहा :—

अत्रान्तरे समागत्य द्वाःस्थेनेत्थं निवेदितम् ।
आयान्ति गजमारुह्य जयरामकवीश्वराः ॥
ससंभ्रमं ततो राजा हर्षोत्फुल्लविलोचनः ।
तदग्रे प्राहिणोत् तूर्णं सचिवं पंडितैः सह ॥
तदस्तैरेव सहितः स विवेश सभांतरे ॥
प्रत्युत्थानादिसम्मानैः नमस्कृत्य ततः कविम् ॥
पप्रच्छ कुशलं श्रीमदग्रजस्य महीभुजः ॥ ११३–१६ ।

दरबार भरला असतां द्वारपालानें जयराम कवि हत्तीवर बसून येत आहेत असा पुकारा केला, लगेच व्यंकोजीनें लगबगीनें सचिव व पंडित यांस त्याच्या स्वागतार्थ पाठविलें आणि तो सभागृहाच्या द्वाराशीं येतांच स्वतः सिंहासनावरून उठून त्याचा सत्कार केला. जणूं काय, जयराम म्हणजे रघुराजाकडे आलेला वरतंतुशिष्य कौत्सच ! अशी आत्मगौरवाची भावना असलेल्या या कवीनें शिवभारत वाचल्यानंतर त्याच विषयावर आपणहि काव्य करण्याची ईर्षा धरिली. तेव्हां सहजच शिवभारताहून कांहीं अधिक योग्यतेची काव्यनिर्मिति आपण करूं अशी भावना त्याचे मनांत असावी हें उघड दिसतें. गीतारहस्यानंतरहि गीतेवर ग्रंथ होतच आहेत. या प्रत्येक नव्या ग्रंथकारास आपण कांहीं तरी अधिक सांगूं शकूं असें प्रामाणिकपणें वाटत असणारच. ते खरोखर कांहीं अधिक सांगू शकतात कीं नाहीं हा भाग वेगळा. पण त्यांची प्रामाणिक भावना मात्र तशी असते यांत शंका नाहीं. याच प्रकारें शिवभारताहून

विशेष असें आपलें काव्य आहे अशी जयरामाची भावना होती, असें मानण्यास पर्णालाख्यानांतील त्याच्या पुढील श्लोकाचा आधार मिळतो. तो म्हणतो—

ततः कतिपयैः वर्षैः मया काव्यानि तन्वता ॥
छंदो विनिर्मितं तस्मिन् कृतः सर्वस्य संग्रहः ॥ ११२३ ॥

छंद म्हणजे वेद. ऋषींनीं अनेक वर्षें सूक्तें रचिलीं व त्या सर्वांचा संग्रह करून छंद म्हणजे वेद निर्माण केला. याच प्रकारें—जयराम म्हणतो, मी अनेक वर्षें खपून शिवचरित्रावर आख्यानें रचिलीं आणि त्या सर्वांचा एकत्र संग्रह करून शिवचरित्ररूपी वेद निर्माण केला. येथील छंद म्हणजे वेद हा शब्द विशेष लक्षणीय आहे. कवींद्र परमानंदानें भारत रचिलें तर जयराम म्हणतो मीं त्याच विषयावर वेद रचिला ! अशा प्रकारें छंद म्हणजे वेद या शब्दाची योजना करण्यांत जयरामाचा हेतु आपलें काव्य शिवभारताहून श्रेष्ठ आहे असेंच सुचविण्याचा असावा असें मला वाटतें. या श्लोकाखालील भाषांतरांत छंदो विनिर्मितं याचा अर्थ 'एक काव्यग्रंथ तयार केला' असा दिला आहे. यांत जयरामाचा हेतु प्रतीत होत नाहीं हें उघड आहे. जयरामानें निर्मिलेला हा जो शिवचरित्ररूपी वेद त्यांतील अनेक सूक्तांपैकीं पर्णालाख्यान हें एक सूक्त होय. हें एक सूक्त आज उपलब्ध आहे. तरी संपूर्ण शिववेदाचा शोध केव्हां तरी लागेल अशी आशा व्यक्त करून या उपलब्ध सूक्ताकडे आतां आपणास वळावयाचें आहे.

जयराम कवि कर्नाटकांतून महाराष्ट्रांत इ. सन १६७० च्या सुमारास येऊन इकडे तीन वर्षें राहिला. या तीन वर्षांत इकडे घडलेलें वृत्त त्यानें पर्णालाख्यानांत संक्षेपतः दिलें आहे. हें ५ अध्यायांचें व ३५४ श्लोकांचें चिमुकलें आख्यान असून त्यांत पर्णालग्रहणाचा मुख्य विषय तिसऱ्या एकच अध्यायांत सुमारें चाळीस श्लोकांतच वर्णिला आहे. केवळ साठ माणसांनीं जाऊन हा किल्ला हस्तगत केला अशी नोंद जेधेशकावलींत आहे. तेव्हां जयरामानें वर्णनाचा पाल्हाळ केला नाहीं हें उचितच म्हटलें पाहिजे. पन्हाळा हस्तगत झाल्याचें कळतांच शिवाजीमहाराजांनीं रायगडावरून पन्हाळ्यास प्रयाण केलें, याचें वर्णन चौथ्या अध्यायांत आहे. तेव्हां तिसरा व चौथा हे दोन अध्याय पन्हाळ्याशीं अधिक संबद्ध आहेत असें म्हणतां येईल. म्हणून या दोन अध्यायांतील कित्येक स्थळांची चर्चा आपण प्रथम करूं आणि मोगलांशीं संबंध असलेले पहिले दोन अध्याय आणि विजापुराहून येणाऱ्या सैन्याशीं झालेल्या युद्धासंबंधीचा पांचवा अध्याय यांची चर्चा नंतर यथावकाश करूं.

पन्हाळा किल्ल्यास परमानंद **प्रणाल** असें म्हणतो तर जयराम **पर्णाल** असें म्हणतो. या दोन नांवांतील कोणतें समर्पक असा प्रश्न येथें मनांत येतो. मी पन्हाळा पाहिला नाहीं. त्याचें वर्णन मात्र वाचलें आहे. त्यावरून ४॥ मैल घेर असलेल्या या किल्ल्याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग असून त्यांच्या मध्यंतरीं एक नैसर्गिक पन्हळ

पडलेला आहे. या पन्हळावरूनच या किल्ल्यास पन्हाळा हें नांव पडलेलें दिसतें. पन्हळ हा **प्रणाल** या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होय. अर्थात् संस्कृत काव्यांत प्रणाल हें नांवच युक्त होय. पर्णालय-पासून पर्णाल हा अपभ्रंश होईल पण तो शुद्ध संस्कृत शब्द नव्हे. तेव्हां जयरामाच्या पर्णाल या शब्दापेक्षां परमानंदाचा प्रणाल शब्दच युक्त होय.

पन्हाळा घेण्याचें शिवाजी महाराजांनीं कां ठरविलें तें तिसऱ्या अध्यायाच्या प्रारंभीं वर्णिलें आहे. अल्पवयी शिकंदरशहा विजापूरचे गादीवर असून सर्व सत्ता खवासखानाचे हातीं होती आणि तो मोगलांशीं संगनमत करून मराठी राज्यास धोका आणण्याच्या विचारांत होता. हें पाहून आपणच आधीं विजापूरचे राज्यावर चढाई करण्याचें शिवाजी महाराजांनीं ठरविलें. यासंबंधांत पुढील श्लोक आले आहेत :—

> (खवासखानेन) सैनिकानविचार्यैव पातशाहपदे स्थितम्
> ररक्ष स्वाम्यहो एतन् महाराजो महामतिः
> तद्विजापूरमेतेन श्यामास्येन विनाश्यते ॥ ३।७--८ ॥

येथें खवासखानास श्यामास्य म्हणजे हबशी म्हटलें आहे; पण पुढें चौदाव्या श्लोकांत एवं क्रुद्धो महाराजः तुरुष्के दुष्टकर्मणि यांत त्यासच तुरुष्क म्हणजे तुर्क म्हटलें आहे. जयराम हबशी व तुर्क यांत भेद करीत नसला तरी खवासखान हा हबशी होता, असें श्यामास्य या विशेषणानें कळतें.

वरील आठव्या श्लोकांतील 'महामति महाराज स्वामी' म्हणजे शहाजी महाराज होत. तुलनेसाठीं पुढील श्लोक पहाः—

> द्रष्टव्यं तावदेतस्य पित्रा शाहमहीभुजा ॥
> केन केनाप्युपायेन स्थलमेतत्सुरक्षितम् ॥ ५।४॥

शहाजी महाराजांनीं नाना प्रयत्नांनीं ज्या विजापुराचें संरक्षण केलें त्याचा नाश हा खवासखान करणार असें पाहून शिवाजी महाराज पुढील तजविजीस लागले आहेत. अ० ३च्या सातव्या श्लोकाचे अंतीं पातशाहपदे स्थितं असें आहे हें खवासखानासच उद्देशून आहे. त्यानें पातशहाची सर्व सत्ता गुंडाळली होती, व्यवहारतः तोच पातशहा झाला होता, असा येथील अर्थ आहे. अ० ४ श्लोक ८० मध्यें खवासखानास विजयपुरपतिः असें म्हटलें आहे तेंहि याच अर्थानें. पण अ० ३ श्लोक ७ व ८ यांचे भाषांतरांत सर्वच विपरीत अर्थ केला आहे.

> ततो ह्यानंदराजाय प्रतापविधिपूर्वकम्
> पत्रं व्यलेखयत् तूर्णं लेखकैर्मंत्रकोविदैः ॥ ३।१० ॥

या श्लोकांतील प्रतापविधिपूर्वकं या शब्दाचा अर्थ नीटसा होत नाहीं. शिवाजी महाराजांनीं आनंदराजास पत्र पाठविलें तें प्रतापविधिपूर्वक पाठविलें म्हणजे कसें

पाठविलें, याचा कांहीं सरळ बोध होत नाहीं. मला वाटतें प्रताप हा अपपाठ असावा व तेथें प्रणामविधिपूर्वकम् असा मूळचा पाठ असावा.

पन्हाळा घेण्याची कामगिरी शिवाजी महाराजांनीं अण्णाजी दत्तोवर सोंपविली आणि त्याचे मदतीस कोंडाजी व दोघे रवळेकर म्हणजे गणाजी व मोत्याजी अश्या तिघांस पाठविलें. दोघा रवळेकरांस मामा म्हटलें आहे. हे शिवाजीचे मामा कसे या नात्याचा खुलासा इतिहासज्ञांनीं करावा. बखरींत कोण्डाजीस फर्जंद म्हटलें आहे. फर्जंद म्हणजे दासीपुत्र. शिवाजी महाराज आग्र्याच्या कैदेंतून निसटले त्या वेळीं त्यांच्या बिछान्यावर निजून राहिलेला हिरोजी फर्जंद हा शहाजी महाराजांचा फर्जंद म्हणजे दासीपुत्र होता व म्हणून त्याच्या व शिवाजी महाराजांच्या तोंडवळ्यांत साम्य होतें. प्रस्तुतचा कोंडाजी हा कोणाचा फर्जंद याचाहि शोध इतिहासज्ञांनीं घ्यावा.

अण्णाजी दत्तो प्रथम राजापुरास गेले (राजापुरं गत्वा ३।२२) आणि तेथून पुढें तीन दिवस (= तीन मजली) गेले (दिनत्रयं पुरो गत्वा श्लो. २३). म्हणजे ते पन्हाळ्याच्या बरेचसे जवळ गेले आणि तेथून त्यांनीं जें कारस्थान करावयाचें तें केलें. इतक्यांत कोंडाजी वगैरे तेथें येऊन पोचले. रात्र पडतांच (क्षणदामुखे श्लो. २४) त्यांनीं एकत्र जमून सर्व साहित्यानिशीं ज्यांना बरोबर घ्यावयाचें होतें त्यांस एकत्र केलें आणि रात्रींच पुढें प्रयाण केलें (रात्रौ प्रययुः श्लो. २६). हें त्यांचें प्रयाण रात्रीं दहा अकराच्या पुढेंच झालें असलें पाहिजे. सूर्योदयापूर्वी त्यांनीं पन्हाळा सर केला. अर्थात् पन्हाळ्याच्या पायथ्याशीं ते पहाटेस चारापूर्वीं पोचले असले पाहिजेत. म्हणजे ते चार पांच तासांतच पन्हाळ्यास जाऊन पोचले असें ठरतें व म्हणून ते निघाले तें ठिकाण पन्हाळ्याच्या बेरेंच जवळ असलें पाहिजे.

मालानिश्रेणी (श्लो. २४) म्हणजे कोकणांत राहाटावर माळ असते तशी माळ असावी. निश्रेणि यांत नि-पुढें विसर्ग नको. वलीमुख = वानर; शिलीमुख = युद्ध; यावरून वलीमुखशिलीमुख म्हणजे वानरांप्रमाणें निकरानें युद्ध करणारे (श्लो. २५). याच श्लोकांतील 'गोधाधरान्' यांतील गोधा या शब्दाचा अर्थ भाषांतरांत घोरपड म्हणून दिला आहे; पण तसा अर्थ वाङ्मयांत अन्यत्र आढळत असेल तरच तो येथें घ्यावा कीं काय हें विचारांत घेतां येईल. आपटे व वैद्य घोरपड हा अर्थ देत नाहींत. तर सुसर (alligator) असा अर्थ देतात. शिवाय पन्हाळ्यावर चढतांना घोरपडीचा उपयोग केल्याचा पुढें उल्लेखहि नाहीं. सिंहगडाच्या पोवाड्यांत यशवंती घोरपडीचा उल्लेख आहे. पण तो ऐतिहासिक पुरावा नव्हे. कोणताहि किल्ला चढतांना घोरपडीचा उपयोग केल्याबद्दल कागदपत्राचा अस्सल पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाहीं अशी माझी समजूत आहे. मग येथील गोधा शब्दाचा अर्थ काय ? गोधा म्हणजे डाव्या मनगटास धनुष्याची दोरी घासूं नये म्हणून जो चामडी पट्टा मनगटाभोवतीं बांधितात तो. हाच अर्थ येथें लागू पडतो.

श्लो. २७ 'आनाजी पंडितैः स्थितम्' भूतविशेषणानें अकर्म भावे प्रयोगाची योजना. अशी योजना जयरामानें बऱ्याच स्थळीं केली आहे. उदा० १–३१ शिवेन समागतं; २–७ युष्माभिः मृतं; २–३७ अश्ववाराधिपैः स्थितं; ३–७ (खवासेन) पातशाहपदे स्थितं; ३–३५ यामिकैः धावितम्; इत्यादि.

कोंडाजीची टोळी पन्हाळ्याकडे निघाली त्या वेळच्या अंधाराचें वर्णन पुढील श्लोकांत केलें आहेः–

सूचीभेद्यं तमस्तावत् मुष्टिग्राह्यतया स्थितम् ॥
एक एवहि लोकेऽस्मिन्नद्वितीयतया पुनः ॥
संभवामीति सर्वेषामुत्पन्ना ज्ञाति (?) यन्मतिः ॥ ३।२८, २९ ॥

'ज्ञातियन्' याचे जागीं कांहींतरी निराळा मूळचा पाठ असावा हें निश्चित; पण तो कोणता असावा हें नीटसें ध्यानीं येत नाहीं. येथें 'ज्ञानिनां' असा मूळांत शब्द असावा असें मला वाटतें. भाषांतरांत "एक एवहि...संभवामि" याचा अर्थ अगदींच विचित्र केला आहे. आपण पन्हाळ्यास पोचण्यापूर्वी अंधारांतच निश्चितपणें मरणार अशी भावना झाल्यावर पराक्रम करण्याची अहमहमिका उत्पन्न होणें अशक्य होय. येथें 'पुनः संभवामि' असे दोन शब्द जोडले गेल्याने व 'संभवामि युगे युगे' हें वचन मनांत दृढ असल्यानें असें भाषांतर झालें असावें. पण तें प्रस्तुत स्थळीं गैरलागू आहे. येथें पुनः म्हणजे तसेंच, इतकेंच नव्हे तर, besides, असा अर्थ असून संभवामि म्हणजे आहें असा अर्थ आहे. अंधार इतका दाट होता कीं, कांहीं एक दिसत नसल्यामुळें "या जगांत मीच काय तो एकटा आहें, दुसरें कांहींएक नाहीं, अशी शहाण्याशहाण्यांचीहि भावना झाली" असा अर्थ येथें आहे. लोकालोक पर्वताचें स्मरण येथें कवीला झालें (श्लो. ३०) तेंहि या मिट्ट अंधारामुळेंच. लोकालोक हा एक काल्पनिक पर्वत पृथ्वीच्या सभोंवतीं असून त्याच्या अलीकडे लोक म्हणजे प्रकाश व पलीकडे अलोक म्हणजे पूर्ण अंधार आहे, अशी कल्पना पुराणांतरीं आहे. येथें पन्हाळ्यास लोकालोक म्हटलें असून त्याच्या अलीकडेच अंधार आहे इतकाच काय तो फरक आहे.

श्लोक ३१ मधील कृतव्यत्यासनामकाः याचा अर्थ 'नांवांची उलटापालट करून' असा केला आहे. पण प्रस्तुत प्रसंगीं अशी उलटापालट करण्याचें कांहींच प्रयोजन नसल्यामुळें हा अर्थ गैरलागू आहे. येथें मूळचा पाठ कृतव्यत्यासनायकाः असा असावा. चढाओढीनें किल्ला चढण्याचा प्रयत्न करतांना टोळ्यांचे नायक बदलून पाहण्याची शक्यता संभवते.

श्लोक ३३ मध्यें तूर्णचे जागीं तूर्णं असावें. श्लोक ३४ मध्यें वाचं आपावते, कीं आवावते? बहुधा आवावते असाच कवीचा मूळपाठ असावा. आवावते म्हणजे

संपाद्यते. म्हणून आपाद्यते हाच पाठ धरल्यास वाद्य म्हणजे वाद्यध्वनि असा अर्थ घेणें प्राप्त होईल.

श्लो. ४८– ‘ सुप्तोसि किमहो ब्रह्मन् ’ म्हणजे तुम्ही झोपेंत आहां कीं काय ? “ आपण कसे निजलां आहां ” हें भाषांतर समीचीन नाहीं. ‘ निश्वासांपूरितोदराः ’ निश्वासः (नियतः श्वासः) =श्वास आंत घेणें. नि च्या पुढें विसर्ग नको. दिलेला नाहीं तेंच योग्य.

श्लो. ४९– असौ मुद्राधिपतिः शिरः छित्वा पातितोस्ति असेंच वास्तविक असलें पाहिजे. छित्वा याचे जागीं स्थित्याः पडलें आहे हा अपपाठ होय. कारण भाषांतरांत मानिलें आहे त्याप्रमाणें नागोजी पंडितानें शिरसलामतीचा विचार चालविल्याचें वर वर्णन नाहीं. काय गडबड आहे, एवढेंच तो विचारीत आहे.

नागोजी पंडिताचे घरावर गणाजी (गणोजी ?) लवळेकरानें पुढून चाल केली असतां तो मागील आडवाटेनें पळाला एवढें सांगितल्यानंतर पुढील श्लोक आला आहे:–

तत्पश्चान्मौक्तिकाख्योसौ तृतीयस्तत्पलायनम् ॥
ज्ञात्वा संशोधयामास, तावदन्येधिकारिणः ॥ ३।५२ ॥

या श्लोकाखालील अर्थामध्यें मोत्याजी हा किल्ल्यावरील (विजापूरकरांचा) अधिकारी असें म्हटलें आहे तें युक्त नाहीं. हा मोत्याजी रवळेकर होय. “ मौक्तिकाख्यः तृतीयः ” म्हणे अण्णाजी दत्तोबरोबर आलेल्या तीन सरदारांतील तिसरा. पहिल्या दोघांनीं काय पराक्रम केला त्याचें वर्णन वरच आलें असून त्याचेपुढें हें त्यांतील उरलेल्या तिसऱ्याचें म्हणजे मोत्याजी रवळेकराचें वर्णन आहे. अण्णाजी दत्तोनें किल्ल्यावर भेद केला असल्यामुळें केवळ साठ लोकांनीं जाऊन तो किल्ला घेतला (जेधे श.). अर्थात त्यांत मोठेंसें युद्ध झालेंच नाहीं. कवीनेंहि युद्धाचें अवास्तव, काल्पनिक वर्णन वाढविल्लें नाहींच. तथापि त्यानें तीन प्रमुख सरदारांची थोडथोडी कामगिरी वर्णिली आहे.

श्लो. ५६– जासूद दोन दिवसांत पन्हाळ्याहून रायगडास गेला. हें अंतर जवळची वाट धरली तरी दोनशें मैलांहून कमी भरणार नाहीं, असें वाटतें. तज्ज्ञांनीं हें अंतर निश्चित करून जासुदाचा वेग ठरवावा.

श्लो. ६० मध्यें कंदरा म्हणजे दरी; गुहा नव्हे. कंदरेंत शिरला तो ध्वनि, बाहेर पडला तो प्रतिध्वनि. प्रतिध्वनिच कंदरासंनिविष्ट होईल तर तो बाहेर कसा ऐकूं येईल ?

पन्हाळा हस्तगत झाला हें कळतांच शिवाजी महाराज पन्हाळ्यास येण्यास निघाले. त्यांच्या या प्रवासाचें व पन्हाळ्यावरील पाहणीचें वर्णन चौथ्या अध्यायांत केलें आहे.

अ. ४।४ तद्दाक्षिण्यं याचे जागीं तं दाक्षिण्यं असें असतें तर बरें होतें.

महाराजांनीं पाचाडास येऊन अंबेचें दर्शन घेतलें. ही अंबा म्हणजे देवी अंबाबाई असें भाषांतरकार समजतात. पण ती देवी नसून राजमाता जिजाबाई आहे. प्रतापगड-तुळजापुराप्रमाणें पाचाडास देवीचें प्रसिद्ध स्थान नाहीं. राजमाता जिजाबाईस रायगडची हवा सोसत नसे म्हणून ती खालीं पाचाडासच राहात असे. शिवाय येथील शब्दहि स्पष्ट आहेत. पहा :—

न त्वाऽऽशिषो गृहीत्वास्याः पुनर्नत्वा कृतांजलिः ॥ ६ ॥
एवं निवेदितान् सर्वांस्तच्छूरान् प्रीतिपूर्वकम् ॥
तांबूलं दापयित्वाग्रे धावमानान् पुरस्सरान् ॥ ८ ॥
नासीरस्थानपि तया पताकाभिरलंकृतान् ॥ ४।९ ॥

यांतील (१) अस्याः आशिषो गृहीत्वा, (२) तच्छूरान् आणि (३) तया तांबूलं दापयित्वा या शब्दांवरून अंबा म्हणजे माता हाच अर्थ कवीस अभिप्रेत आहे याविषयीं संशयास जागा राहात नाहीं.

अ. ४।१२ पट्टल याचें जागीं पटल असें हवें.

महाराजांची स्वारी पाचाडाहून महाडावरून पोलादपुरास आली. महाडास खजूरी डाळिंबी अक्रोड द्राक्षामंडप इत्यादी असल्याचें वर्णन कवीनें केलें आहे तें अवास्तव आहे. पौलस्त्यनगरांतील वर्णिलेला मठ रामदासांचा असें भाषांतरांत म्हटलें आहे तें खरें नसून तो मठ कवींद्र परमानंदाचा होता हें महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनीं पूर्वीच प्रतिपादिलेलें सर्वांस माहीत असेलच. येथील श्लोक असे आहेत :—

ततः पौलस्त्यनगरे परमानंदनंदितैः ॥
रसैस्तु पंचदशभिः कवीन्द्रैः वर्धितैः द्विजैः ॥ १६ ॥
गीयमानं यशः स्वीयं श्रुत्वा श्रुत्वा शनैः शनैः ॥
नरयानादवातीर्य चतुःशालं मनोरमम् ॥ १७ ॥
मंदिराग्र्यं समासाद्य एकएवाग्रगोऽभवत् ॥
गोस्वामिचरणद्वंद्वं वंदयामास मंदिरे ॥ ४।१८ ॥

परमानंदनंदितैः कवीन्द्रैः पंचदशभिः रसैः वर्धितैः द्विजैः गीयमानं स्वीयं यशः श्रुत्वा श्रुत्वा......गोस्वामिचरणद्वंद्वं वंदयामास.

परमानंदानें आनंदित झालेले कवींद्र म्हणजे ब्रह्मानंदीं निमग्न झालेले कवींद्र-परमानंद यांचा पोलादपुरचा आश्रम म्हणजे जणू एक प्राचीन पद्धतीचें गुरुकुलच होतें. तेथें विद्येबरोबरच विद्यार्थ्यांच्या भोजनाचीहि सोय असे. म्हणजे तेथील विद्यार्थी काव्यांतील नऊ रस आणि अन्नांतील षड्रस अशा पंधरा रसांनीं गुरुकडून (परमानंद

कवींद्रांकडून) संवर्धिले जात. वाल्मीकिविरचित रामायण त्याच्या शिष्यांनीं म्हणजे लवकुशांनीं गायिलेलें श्रीरामचंद्रानें ऐकिलें तद्वत् येथें कवींद्रपरमानंदविरचित शिवभारत परमानंदाच्या शिष्यांनीं गायिलेलें शिवाजी महाराजांच्या कानीं पडलें. जणू काय महाराजांच्या आगमनप्रसंगीं गुरुकुलांतील विद्यार्थी महाराजांच्या स्तुतिपर पद्यांनीं त्यांचें स्वागतच करीत होते. अठराव्या श्लोकांतील गोस्वामी म्हणजे कवींद्र परमानंदच होत, रामदास नव्हत.

श्लोक १७ मध्यें **अवातीर्य** याचे जागीं **अवतीर्य** असावें.

पोलादपुराहून महाराज प्रतापगडीं देवीच्या दर्शनास गेले. त्याचे वर्णनांत पुढील श्लोक आला आहे :—

ततः श्रीमत्प्रतापाख्ये पर्वते पुष्पितद्रुमे ॥
पारे गिरां स्थितवति प्राकारोच्छ्रायशोभिते ॥
आरुरोह नृपस्तस्मिन् आप्तैः कतिपयैर्जनैः ॥ ४।२२ ॥

यांतील ' गिरां पारे स्थित ' याचा ' अवर्णनीय ' असा अर्थ केला आहे. पण येथें **गिरां** हा अपपाठ असून **गिरौ** असा मूळपाठ असला पाहिजे हें सहज ध्यानीं येतें. पारच्या डोंगरावरच प्रतापगड आहे व या डोंगराच्या पायथ्याशींच पार हा गांव आहे. या गांवावरूनच जवळच्या घाटास पारघाट हें नांव पडलेलें आहे. श्लोक २४ मधील हेमकुंभ यांतील कुंभ म्हणजे कळस; घुमट नव्हे.

प्रतापगडच्या भवानीच्या देवालयाचे वर्णनांत पुढील श्लोक आला आहे :—

सौवर्णरौप्यफलकैः कपाटैर्दिक्चतुष्टये
स्फुटं प्रतीयमानं यत् सुरज्येष्ठमिवाननैः ॥ ४।२५ ॥

(देवळाच्या) दारांतून तें देऊळ स्पष्ट दिसत होतें असें भाषांतरांत म्हटलें आहे. पण तें कसें दिसेल ? देवळाच्या दारांतून आंतील देवी कदाचित् दिसेल, पण देऊळ दिसण्यास तें दुरूनच पाहिलें पाहिजे. येथें कपाटैः म्हणजे दारांतून नव्हे. तर द्वारांमुळें, द्वारांच्या योगें. चार द्वारें असलेलें तें देवालय चतुर्मुख ब्रह्मदेवाप्रमाणें भासत होतें, एवढेंच येथें वर्णिलें आहे.

श्लो. २७ मधील उच्छिख केकी म्हणजे पिसारा उभारलेले मोर असा अर्थ केला आहे; पण उच्छिख म्हणजे उंच तुरा असलेले, पिसारा उभारलेले नव्हत.

श्लो. ३०, ३१ पहा—

वानरैः पक्षिभिश्चापि भक्षितार्धफलैर्वृते ॥
प्रांगणे कुत्रचित् व्याप्ते बालैस्तद्ग्रहणोत्सुकैः ॥ ४।३१ ॥

येथें " वानर व पक्षी तसेंच मुलें यांनी व्याप्त अशा पटांगणांत " असा अर्थ केला आहे. वास्तविक वानर व पक्षी झाडांवर होते, खालीं पटांगणांत नव्हते. पटागणांत मुलेंच तेवढीं होतीं. वृक्षांवरील वानरांनी व पक्ष्यांनीं अर्धवट खाल्लेलीं फळें खालीं पडत होतीं व तीं उचलण्यासाठीं मुलें धडपडत होतीं. पटांगण वानरांनीं व्याप्त असतें तर मुलें त्यांत शिरण्यास धजलींच नसतीं. प्रांगण वृत होतें तें अर्धभक्षित फळांनीं; वानरांनीं व पक्ष्यांनीं नव्हे.

श्लो. ३५ यांतील प्र...मंडितैः हें वास्तविक उस्रैः याचें विशेषण नसून शीर्ष-पुष्पाचें आहे. म्हणून येथें एकदेशान्वय झाला आहे.

श्लो. ४४ मध्यें हरिद्रा याऐवजीं हळिद्रा असें चुकून पडलें आहे.

श्लो. ४६ मधील पुराणस्तवसंस्तुतैः मंत्रैः या शब्दांवरून महाराजांनीं केलेली भवानीची पूजा पुराणोक्तच होती वेदोक्त नव्हती असें निश्चित ठरत नसलें तरी तसा संशय येथें उत्पन्न होतो. पण वेदोक्ताचा प्रश्न या वेळेपर्यंत उत्पन्न झाला नव्हता; तो पुढें राज्याभिषेकाच्या वेळीं उत्पन्न झाला.

श्लो. ५२ यामध्यें **नित्य** याचे जागीं **नृत्य** असें हवें.

श्लो. ५५—दिनत्रयेण शनैः (प्रणालाद्रिं) ययाे असें वर्णिलें आहे. पण प्रतापगड ते पन्हाळा हें अंतर (विशेषतः राजमार्गानें) बरेंच मोठें आहे. तें किती आहे तें तज्ज्ञांनीं निश्चित करावें. मला वाटतें तें दीडशें मैलांवर भरेल. इतकें मोठें अंतर तीन दिवसांत तोडलें असल्यास तें शनैः म्हणजे सावकाश खासच नव्हे.

महाराज पन्हाळ्याजवळ येतांच दत्तोपंत वाकेनवीस हे त्यांस गडाच्या बाहेर सामोरे आले व त्यांनीं महाराजांवर सोन्याचीं फुलें उधळल्याचें कवि वर्णितो. यावरून दत्तोपंत वाकेनवीस ही पन्हाळ्यावरील फार मोठी असामी असावी असें दिसतें. यांची अधिक माहिती इतिहासज्ञांनीं सादर करावी. यापुढील श्लोक असा :—

ततः स भूधरपतिं भूधराधिपतिर्नृपः ॥
पात्रं कृपाकटाक्षस्य गुरुश्छात्रमिवाकरोत् ॥ श्१५६–५७ ॥

यांतील भूधरपति शब्दाचा अर्थ पन्हाळा किल्ला असा केला आहे. पण भूधरपति म्हणजे किल्लेदार आणि भूधराधिपति म्हणजे शिवाजीमहाराज असा येथील अर्थ असून गुरुशिष्यांची उपमा याच अर्थास साजेशी आहे. अचेतन गडास शिष्याची उपमा साजत नाहीं हें स्पष्टच आहे.

श्लो. ६० " इंदुमुखैः स्त्रीणां वृन्दैः " असें कवीनें म्हटलें आहे. पण इंदुमुखी

स्त्रियाच, वृंद नव्हत. येथे विशेषण अन्यसंक्रांत आहे, त्यामुळें समासाचा विग्रह करून अर्थ जमविण्यास अडचण पडते.

पुढील ६१ व्या श्लोकांत कवीनें महाडाप्रमाणेंच पन्हाळ्यासहि अक्रोडवृक्ष सांगितले आहेत !

श्लो. ६६ ते ६८ यांत "सोमालये कर्पूरवापिकातोयं उपस्पृश्य" असा वाक्यांश निष्पन्न होतो व त्यावरून सोमालय तलावांत (त्याच्या एका कांठाशीं) कापूरबाव असावी असें निष्पन्न होतें. कित्येक तलावांच्या कांठीं विहिरी आढळतात. तलावांतील पाणी आटलें किंवा गढूळ झालें तरी या विहिरींत स्वच्छ पाणी असतें. अशी कापरासारख्या स्वच्छ पाण्याची कापूरबाव या नांवाची विहीर या सोमालय तलावांत (त्याचे कांठीं) आहे कीं काय हें माहीतगार सांगू शकतील. पन्हाळ्याचे वर्णनांत कापूरबाव हें नांव आढळत नाहीं. तेथील एका प्रसिद्ध विहिरीचें नांव अंधारबाव किंवा शृंगारबाव असें दिलेलें आढळतें

शिवाजी महाराजांनीं सोमालयाजवळील ज्या देवाची चांफ्याच्या लक्ष पुष्पांनीं पूजा करविली त्या देवाचें नांव जयरामानें दिलें नाहीं. पण सोमालय या शब्दाच्या सादृश्यानें त्याचें नांव सोमेश्वर असावेंसें वाटतें. भोजराजानें लाविलेले चंपकवृक्ष म्हणजे पांढऱ्या चांफ्याचे वृक्ष असावे. कारण सोनचाफ्याचे वृक्ष इतके दीर्घायुषी नसतात.

गंगा व यमुना या नांवांचीं दोन धान्यागारें "खारीशतसहस्रेण धान्येनापूरितौ" अशीं सांगितलीं आहेत (श्लो. ७२, ७३). येथें खारीशतसहस्र म्हणजे भाषांतरांतल्याप्रमाणें 'लाखो खंडी' न घेतां एक लक्ष खारी असाच अर्थ घेणें इष्ट होय. चार आढकांचा एक द्रोण आणि सोळा द्रोणांची एक खारी असें कोष्टक आहे.

द्रोणस्तु खार्यः खलु षोडशांशः
स्यादाढको द्रोणचतुर्थभागः ॥ (लीलावती)

आढक म्हणजे ७$\frac{११}{१६}$ रत्तल असें आपटे कोशांत दिलें आहे. त्यावरून खारी हें माप सुमारें पावणेचार मणांचें दिसतें. प्रांतभेदानें मापें लहानमोठीं असलीं तरी खारी म्हणजे खंडी नव्हे हें निश्चित होय. वरील कोष्टकानुसार एक लक्ष खारी म्हणजे सुमारें अठरा एकोणीस हजार खंडी होतील. पन्हाळ्यावर गंगा, यमुना आणि सरस्वती अशीं तीन धान्यागारें असून त्या तिहींत मिळून २५ हजार खंडी धान्य मावतें असें पन्हाळ्याचे वर्णनांत सांगितलेलें आहे. त्यास अनुसरून पाहतां जयरामानें दोन धान्यागारांत एक लक्ष खारी म्हणजे अठरा एकोणीस हजार खंडी धान्य मावतें म्हणून सांगितलें आहे तें वस्तुस्थितिदर्शक आहे, काल्पनिक नाहीं असें दिसून येतें. महाराजांनीं पन्हाळा घेतला तेव्हां तेथें गंगा व यमुना हीं दोनच धान्यागारें असावीं. तिसरें पुढें केव्हां तरी बांधलें असावें व म्हणूनच जयरामानें उल्लेखिलें नसावें.

श्लो. ७५ मध्यें अग्नियंत्राणि याऐवजीं अग्नियंत्रैश्च असा मूळ पाठ असावा. दार्वादिनवीनेंधनसंचयैः याचा अर्थ "दारू इत्यादि नवीन इंधनांचा सांठा" असा दिला आहे. यांतील दारू शब्दानें वाचकांची भलतीच समजूत होण्याचा संभव आहे.

येथवर पर्णालग्रहणाशीं विशेष संबद्ध अश्या तिसऱ्या व चौथ्या अध्यायांचें अवलोकन केल्यानंतर आतां राहिलेले १,२ व ५ हे अध्याय क्रमानेंच पाहूं. पहिल्या अध्यायांत सुरत व कारंजा या शहरांची लूट, त्र्यंबक ते सालेरीपर्यंतचे किल्ले घेणें आणि जव्हार व रामनगर हीं राज्यें हस्तगत करणें, या घटनांचा केवळ उल्लेख आला आहे. यांतील कोणत्याहि घटनेचें विशेष वर्णन केलेलें नाहीं. तें वर्णन या कवीनें निरनिराळ्या स्वतंत्र आख्यानांत केलें असल्याचें अ० १ श्लो. ४१ वरून दिसून येतें. या पहिल्या अध्यायांत ज्या अनुक्रमानें या घटना सांगितल्या आहेत त्याच अनुक्रमानें त्या घडल्या किंवा छंदासाठीं कवीनें त्यांचा अनुक्रम बदलला आहे हें मात्र इतिहासज्ञांनीं तपासून पाहिलें पाहिजे. कवीनें जव्हार व रामनगर घेतल्याचा उल्लेख पहिल्या अध्यायांत श्लोक ३९ व ४० यांत केला असून सालेरीच्या युद्धाचा उल्लेख दुसऱ्या अध्यायांत सातव्या श्लोकांत केला आहे. यांत कालानुक्रम चुकला आहे, कारण सालेरीच्या संग्रामानंतरच मोरोपंतांनीं जव्हार व रामनगर हस्तगत केलीं आहेत. असो. आतां ऐतिहासिक भागाविषयीं पाल्हाळ न करितां आपण या अध्यायांतील विशिष्ट श्लोकांचें निरीक्षण करूं.

अध्याय १ श्लोक २ रा यांत व्यंकोजीला वीरत्रयधुरंधरः असें विशेषण दिलेलें आहे. याचा अर्थ अनुवादांत "तीनहि वीरांमध्यें श्रेष्ठ" असा केला आहे. पण यानें स्पष्ट बोध होत नाहीं. येथील तीन वीर म्हणजे संभाजी, शिवाजी व व्यंकोजी हे भाऊ होत असें कोणी म्हणतील; पण तें युक्त होणार नाहीं. धुरंधर या शब्दाचे मागें सामान्यनामच हवें. विशेषनामें चालणार नाहींत. शिवाय याच काव्यांत शिवाजीला विष्णूचा अवतार–कल्कि अवतार– असें कवीनें म्हटलें आहे. तोच कवि शिवाजीपेक्षांहि व्यंकोजी श्रेष्ठ असें त्याच काव्यांत कसें म्हणेल? तेव्हां येथें वीरत्रय म्हणजे वीरांचे तीन प्रकारच घेणें प्राप्त होय. साहित्यशास्त्रांत दयावीर, दानवीर, धर्मवीर व युद्धवीर असे वीरांचे चार प्रकार सांगितले जातात. असेच कोठें तीन प्रकार सांगितले असणें शक्य आहे. वरील चार प्रकारांपैकीं दयावीर या प्रकाराचा अंतर्भाव धर्मवीर या प्रकारांत करून वीरत्रय मानणेंहि शक्य आहे व तसेंच तें येथें कवीनें मानिलें असावें.

श्लो. ४ भ्राजत्–चे जागीं भ्राजमान हवें होतें. कारण भ्राज् धातु आत्मनेपदी आहे. छंद जमण्यासाठींच कवीनें परस्मैपदी योजना केलेली दिसते. भ्राजत् हा शब्द पुढील सभ्याभरणभूषितः या शब्दास जोडावयास हवा. सभ्य म्हणजे सभासद हींच चमकदार आभरणें, असा अर्थ करावयास पुढील सभास्तारैः शब्दाची अडचण येते. म्हणून सभ्य म्हणजे सभासद असा अर्थ न घेतां उचित असा अर्थ घेणें प्राप्त आहे. भ्राजत्सभ्याभरणभूषित म्हणजे प्रकाशमान पण सभ्यजनोचित अशा अलंकारांनीं मंडित.

श्लो. ७ मध्यें, स्वर्णदंडच्छत्रचामरशोभितः यांत छत्रचामरांचे दांडे सुवर्णाचे होते असा अर्थ करणें प्राप्त आहे; दंड म्हणजे राजदंड असा अर्थ घेतां येणार नाहीं. कारण पुढें १२ व्या श्लोकांत राजदंड आलेला असून तो रुप्याचा आहे.

श्लो. १७ मध्यें कवीनें शिवाजीस रामाची व व्यंकोजीस भरताची उपमा दिलेली आहे. स. १६६७ चे एप्रिलांत विजापूरकरांच्या ज्या सैन्यानें शिवाजीच्या रांगणा किल्ल्यास वेढा दिला होता त्यांत हा व्यंकोजीहि (विजापूरकरांतर्फे) होता याचें स्मरण ही उपमा वाचून होतें. अर्थात् व्यंकोजीस भरताची उपमा हा केवळ कविवाग्विलास होय.

श्लो० १८ मध्यें शिवाजी हा व्यंकोजीचा वडील भाऊ असें म्हटलें आहे. असेंच या काव्यांत अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. अ. १ श्लो. ५१ यामध्यें स्वतः व्यंकोजीहि शिवाजीस दाजीस्वामी म्हणतो. म्हणजे या काव्याचे रचनेपर्यंत तरी व्यंकोजीस शिवाजीहून वडील ठरविण्याची कल्पना उत्पन्न झालेली नव्हती हें निश्चित होय. ती पुढे केव्हां तरी निघाली.

श्लो. १९ मध्यें कवि शिवाजीस ' निष्कलंक कल्की ' म्हणतो. कल्की=कलंकयुक्त असाहि एक अर्थ आहे. म्हणून जयरामानें त्यामागें निष्कलंक हें विशेषण योजिलेलें दिसतें. विष्णूचा दशमावतार या अर्थाच्या कल्की शब्दामागें निष्कलंक शब्द घालण्याची आवश्यकता नाहीं. कारण तो अवतार निष्कलंकच असणार.

श्लो. २८ यामध्यें ' इतो राजगडं गत्वा ' म्हणजे राजगडास जाऊन शिवाजीचें दर्शन घेतल्याचें कवि सांगतो. एवढ्यावरून हा काळपर्यंत म्हणजे सु. १६७० पर्यंत शिवाजी रायगडासच राहात असे, रायगडावर वास्तव्य करीत नव्हता असें म्हणतां येणार नाहीं. रायगड हें कायमचें वास्तव्यस्थान केल्यावरहि शिवाजी मधूनमधून राजगडावर असणें शक्य आहे.

श्लो. ३० मध्यें अस्मिन् प्रयाणे म्हणजे सुरतेवर स्वारी करण्यास जातांना वाटेंत शिवाजीनें त्र्यंबकचा किल्ला जिंकल्याचें सांगितलें आहे. सभासद तसें सांगत नाहीं. त्र्यंबक ते सालेरीपर्यंतचे गड मोरोपंतांनीं स्वारी करून हस्तगत केल्याचें तो सांगतो. यावरून सुरतेकडे जातांना शिवाजी महाराजांनींच त्र्यंबकगड जिंकला ही या काव्यानें कळणारी नवीन माहिती आहे असें म्हणावें लागतें.

आतां एकतिसावा श्लोक पहा :—

ततः कारंजनगरं श्रीकृष्णेन यथा पुरा ॥
भागदत्तं पुरं तद्वत् लुंठयित्वा समागतम् ॥ १।३१ ॥

श्रीकृष्णानें भागदत्तपुर लुटल्याची कथा कवीस कोठें आढळली नकळे. श्रीमद्-

भागवत, दशम स्कंध, अध्याय ५९ मध्यें ही कथा आलेली आहे. तेथें नगर लुटल्याचा उल्लेख नाहीं. भगदत्त हा नरकासुराचा पुत्र. हे प्राग्ज्योतिषाचे म्हणजे आसामचे राजे. यांच्या प्राग्ज्योतिषपुरावर श्रीकृष्णानें स्वारी करून, नरकासुराचा वध करून त्यानें बंदींत टाकलेल्या सोळा सहस्र राजकन्या सोडवून आणिल्या. त्या वस्त्रालंकारांनीं विभूषित अश्या आणिल्या हीच कवीनें लूट मानिली असल्यास नकळे. भगदत्ताच्या मातेनें श्रीकृष्णाची प्रार्थना केल्यामुळेंच या प्रसंगीं भगदत्तास जीवदान मिळालें व तो प्राग्ज्योतिषाचा म्हणजे आसामचा राजा झाला. अर्थात् त्याचें भागदत्तपुर आसामांतच असणार. भाषांतरांत भागदत्तपूर म्हणजे भागलपूर असें जें म्हटलें आहे तें यथार्थ नाहीं.

श्लो. ३३ यांत बग्गुलानां याचे जागीं कवीचा शब्द **बग्गलानां** असा असावा. कारण बागल याचें संस्कृतीकरण बग्गल असें होईल. बग्गुल असें होणार नाहीं. बग्गुल हें बागूल याचें संस्कृतीकरण होईल.

खलाजवलाख्यावप्यमलावतिदुर्ग्रहौ ॥ ११३६ पूर्वार्ध ॥

यांतील अमलौ हा अपपाठ असून अचलौ असाच मूळपाठ असला पाहिजे. कारण खलाजवलाख्यौ याचेपुढें अचलौ या शब्दाची आवश्यकताच आहे, अमलौ या शब्दाची नाहीं आणि गडांस अमलौ हें विशेषण देण्यांत कांहीं स्वारस्यहि नाहीं.

श्लो. ४० मध्यें शिवाजीला लीलाविग्रहवान् शिवः असें म्हटलें आहे त्यावरून तो शिवाचा अवतार म्हटल्याप्रमाणें होऊन तो विष्णूचा अवतार असें जें याच काव्यांत अन्यत्र म्हटलें आहे त्याशीं विरोध भासतो. येथें शिवः म्हणजे शिवाजी हा लीलाविग्रहवान् (अर्थात् यापुढें विष्णु हा शब्द अध्याहृत घेऊन) होता अशा प्रकारें अर्थ जमवून घेतां येईल.

त्र्यंबकपासून सालेरीपर्यंत शिवाजी महाराजांनीं जे जे किल्ले हस्तगत केले त्या सर्वांस त्यांनीं नवीं नांवें ठेविलीं असें कवि श्लो. ४१ मध्यें सांगतो. हीं नवीं नांवें कोणतीं याचा शोध इतिहासाभ्यासकांनीं करावा.

व्यंकोजीनें पन्हाळगडाचें व तेथील जय्यत बंदोबस्ताचें वर्णन करून हा एवढा अवघड किल्ला फार दुरून येऊन शिवाजीमहाराजांनीं लीलेनें चुटकीसरशीं घेतला असें म्हणून पुढील प्रश्न कवीस केला आहे:—

तत्र कस्मादहो किंचिदेतावत्कर्म दुष्करम् ॥ ११५१ ॥

अहो, एतावत्कर्म किंचित् (अपि) दुष्करं न (जातं) तत् कस्मात् ? पन्हाळा हस्तगत करण्यासारखें एवढें मोठें कृत्य थोडेंहि अवघड गेलें नाहीं हें कसें घडलें असा व्यंकोजीचा प्रश्न आहे. यावरून त्यास यांत फितूर झाल्याम संशय आला असावा

असें वाटतें. शिवाजी महाराजांनीं पन्हाळा कसा घेतला तेंच आधीं सांगा असें व्यंकोजी म्हणत आहे. :येथेंच हा पहिला अध्याय समाप्त झाला आहे.

यापुढें वास्तविक पन्हाळा कसा सर करण्यांत आला याचेंच वर्णन यावें; पण विषयान्तर करून सालेरीला मोगलांशीं फार मोठें युद्ध झालें, त्यावर औरंगजेबानें मोठ्या संतापानें बहादूरशहा, दिलेरखान वगैरे दक्षिणेंतील आपल्या सरदारांस कोणता खलिता पाठविला व त्यावर त्या सरदारांनीं कोणतें उत्तर पाठविलें याचेंच सविस्तर वर्णन कवीनें दुसऱ्या अध्यायांत केलें आहे. सालेरचें युद्ध हें शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत झालेलें सर्वांत मोठें रणकंदन होय. त्यांत मोठें मोगल सैन्य सफाई बुडालें आणि त्यांचे इखलासखान व बहिलोलखान हे दोन्ही सेनापति आणि दुसरे बावीस नामांकित सरदार पाडाव झाले. यास अनुसरून अध्याय २ श्लो. ८ मधील **विघ्रुताः** याचा अर्थ नुसतें अडविले गेले असा नसून कैद केले गेले असाच आहे हें उघड आहे. अदीलशहा, कुतुबशहा, सिद्दी, पोर्तुगीज वगैरे सर्वांवर शिवाजीचा वचक बसून ते त्यास खंडणी देऊं लागले याविषयींहि या पत्रांत औरंगजेबानें जळफळाट व्यक्त केला आहे. यांतच कुतुबशहासंबंधानें तो म्हणतो—

> लक्षद्वयं त्रयं चैव वराहाणां स्वमस्तके
> गृहीत्वास्मै तुरुष्कोपि प्रददौ कुतुपोप्यसौ ॥ २१५ ॥

यांतील ' लक्षद्वयं त्रयं चैव ' म्हणजे भाषांतरांतल्याप्रमाणें दोन तीन लाख नव्हे, तर दोन नी तीन मिळून पांच लाख. चैव पदानें हा अर्थ स्पष्ट आहेच. शिवाय कुतुबशहानें सन १६६८ त शिवाजीशीं तह केला त्यांत पांच लक्ष होनच खंडणी देण्याचें कबूल केलें होतें. म्हणजे कवीचें येथील विधान इतिहासास अनुसरूनच आहे.

> अन्येपि बहवस्तेन दर्पेणैव विनिर्जिताः ॥ २१६ पूर्वार्ध ॥

यांतील दर्पेणैव या पदाचा अर्थ तोऱ्यानें असा केला आहे, तसा न करितां केवळ धाकानेंच असा केला पाहिजे.

औरंगजेबानें आपल्या खलित्यांत शिवाजीस जिंकण्याचा उपाय असा सांगितला आहे कीं, शिवाजीपासून ज्यांना ज्यांना उपद्रव पोचतो ते विजापूरकर, सिद्दी, पोर्तुगीज इत्यादि सर्वांस आपणाशीं सामील करून घ्यावें आणि सर्वांनीं मिळून शिवाजीच्या किल्ल्यांभोवतालचा सर्व मुलूख हस्तगत करून किल्ल्यांस वेढा देऊन बसावें. हा उपाय कसा व्यर्थ आहे तें सरदारांच्या उत्तरांत पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे :—

> बद्धमूलो रिपुस्तावत् उपायज्ञोपि भूरिशः ॥
> जेतव्यः कथमस्माभिः शतवर्षमधःस्थितैः ॥
> पर्वतानां शतं तावत् धान्यमुत्पद्यते यतः ॥
> तादृशं च तथैवान्यन्नवीनं प्रविधीयते ॥ २१२३–२५ ॥

या चार ओळींतील पहिल्या ओळीचा अर्थ स्पष्ट आहे आणि चौथ्या ओळीचा अर्थ भाषांतरांत मुळींच दिलेला नाहीं. मधल्या दोन ओळींचा म्हणजे चोविसाव्या श्लोकाचा अर्थ पुढीलप्रमाणें केला आहे :—

" तेव्हां शंभर वर्षेपर्यंत सपाट प्रदेशावर (खालीं) राहिलेल्यांनीं आम्हीं त्यास कसें जिंकावें ? कारण, तेथें शेंकडों खंडी (पर्वतासारखे ढीग) धान्य उत्पन्न होतें. "

या अर्थामध्यें तेथें म्हणजे सपाट प्रदेशावर असें निष्पन्न होतें. पण सपाट प्रदेशावर पर्वतप्राय धान्याचे ढीग उत्पन्न होणें हें गड हस्तगत न होण्याचें कारण होऊं शकत नाहीं. बरें तेथें म्हणजे गडावर असें धरावें तर तेथें बेताचेंच धान्य उत्पन्न होणार; पर्वतप्राय ढीग कांहीं पिकणार नाहींत. " शंभर वर्षें सपाट प्रदेशावर राहिलेले आम्ही " हा अर्थहि बरोबर नाहीं. ' शंभर वर्षें खालीं वेढा देऊन बसलों तरी ' असा येथील अर्थ आहे. संपूर्ण श्लोकाचा अर्थ असा :— आम्ही शंभर वर्षें जरी गडास वेढा घालून खालीं बसलों तरी आम्हांकडून शिवाजी कसा जिंकला जाणार ? कारण त्याजपाशीं शेंकडों किल्ले आहेत आणि त्यांवरहि धान्य पिकतें.

आतां पुढील ज्या ओळीचा अर्थ भाषांतरांत केला नाहीं तिचा अर्थ पहावयाचा. तथैव च म्हणजे त्याचप्रमाणें तादृशं नवीनं अन्यत् (पर्वतानां शतं) प्रविधीयते. (तादृशं नवीनं अन्यत् ह्या नपुंसकलिंगी एकवचनी पदाचा अन्वय वरल्या ओळींतील पर्वतानां शतं याशीं करण्याविना येथें गति नाहीं.) या अन्वयास अनुसरून या ओळीचा अर्थ असा.—" त्याचप्रमाणें असेच दुसरे शेंकडों नवीन गड शिवाजीकडून बांधले जात आहेत. " याच्या पुढल्या ओळींतील " प्रत्येकं पर्वते तस्मिन् " या उल्लेखावरूनहि वरील पर्वतानां शतं तावत् याचा अर्थ शेंकडों गड आहेत असाच घेतला पाहिजे. पर्वतप्राय धान्याचे ढीग असा घेतां येणार नाहीं.

सव्विसाव्या श्लोकांत ' पर्वतादर्धमायान्ति ' याचे जागीं ' पर्वतादध आयान्ति ' असाच मूळ पाठ असला पाहिजे. कारण अर्ध्याच गडापर्यंत उतरून सभोंवतीचा प्रदेश लुटतां यावयाचा नाहीं. त्यासाठीं गडाच्या अगदीं खालीं म्हणजे अधः च उतरलें पाहिजे.

आमच्या सैन्यावर शिवाजी ससाण्यासारखी झडप घालतो असें सांगून बहादूरशहा पुढें म्हणतो—स केन रक्षणीयोस्ति मामकीनैरधःस्थितैः ॥२।२९॥ येथील रक्षणीय हा शब्द चिन्त्य आहे. निवारणीय या अर्थानें तो पडला आहे. वास्तविक बहादूर, दिलेरखान इत्यादि अनेकांनीं मिळून बादशहास हें उत्तर पाठविलें आहे. तथापि विसाव्या श्लोकांत ' प्रत्युत्तरं ताभ्यां लिखितं ' यांत उत्तर पाठविणारे बहादूरशहा व दिलेरखान असे दोघेच धरले आहेत आणि येथें या २९ व्या श्लोकांत मामकीनैः या पदानें उत्तर लिहिणारा एकटाच (बहादूरशहा) असल्याचें मानिलें आहे. उत्तर लिहिणारे अनेक असतील तर ते आस्माक (याचेंच छांदसरूप अस्माक) किंवा आस्माकीन असा शब्द योजतील. पहा:—

यत्र यत्र ततस्तेन स वै (सर्वो) मार्गो निरुध्यते ॥
न पक्षैरपि निर्गच्छेत् तस्मात्पर्वतसंकटात् ॥ २।४० ॥

यत्र यत्र याचा संबंध मागल्या श्लोकांतील अस्माभिः परिधाव्यते याशीं आहे. ' अस्माभिः यत्र यत्र परिधाव्यते स मार्गः तेन निरुध्यते वै। ' आम्ही ज्या ज्या मार्गानें धावूं लागतों तो तो मार्ग शिवाजी पूर्णपणें अडवून टाकतो. इतका पक्का अडवितो कीं त्या डोंगरी अवघड मार्गांतून पंख लावून उडून जाऊं म्हटलें तरी देखील जातां येऊं नये. भाषांतरांत **स वै** याचे जागीं सर्वो असा शब्द सुचविला आहे; पण तो घेण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. तसेंच पक्षैरपि याचे जागीं शुद्धिपत्रांत पक्षिरपि असें दिलें आहे. पण पक्षि असा शब्द नसून पक्षिन् असा असल्यामुळें हें शुद्धिपत्रच शुद्ध करावयास हवें.

शिवाजी आग्र्याचे दरबारांत गेला तेव्हां तेथें दशहजारी, बाराहजारी असे स्वारांचे मोठमोठे अत्यंत उग्र सरदार होते असें सदतिसाव्या श्लोकांत आलें आहे. भाषांतरांत दशहजारी, द्वादशहजारी याऐवजीं घोडेस्वारांचे मुख्यच दरबारांत दहा बारा हजार होते असें म्हटलें आहे तें अर्थातच चुकलें आहे.

त्रेचाळिसाव्या श्लोकांत शिवाजीचा मामेभाऊ जाधवराव आला आहे. हा मोगलांचा पक्ष सोडून शिवाजीकडे गेल्याचें ४८ व्या श्लोकांत सांगितलें आहे. या जाधवरावाचें नांव कल्याणजी हें शिवभारतावरून समजतें. शिवाजीला अनेक मामा होते त्यांतील कोणत्या मामाचा हा पुत्र याचा निश्चय जाधवांच्या वंशावळीवरून होतो कीं काय हें इतिहासाभ्यासकांनीं पहावें. नाइकजी खराडे, नाइकजी पांढरे, सिद्दी हिलाल व कल्याणजी जाधव या चौकडीचा उल्लेख शिवभारतांत अनेक स्थळीं आलेला आहे. यांपैकीं खराडे व पांढरे यांना शहाजीनेंच प्रथम सरदारी देऊन उदयास आणिलें (शिवभा. ९।७). पण जाधवराव व हिलाल यांच्याप्रमाणेंच हे पांढरे व खराडेहि अफजलखानाच्या स्वारींत त्याचेबरोबर आले होते. अफजलखानाच्या वधानंतर शिवाजीची चलती पाहून ही चौकडी शिवाजीकडे आली. पुढें शिवाजीस सोडून ते मोगलांकडे गेले होते असें प्रस्तुत काव्यावरून कळतें आणि मोगलांचा पक्ष सोडून ते शिवाजीकडे आल्याचेंहि या काव्यांत सांगितलें आहे. त्या काळीं मराठे सरदारांप्रमाणेंच कित्येक मुसलमान सरदारहि वारंवार धनीपालट करीत असें सिद्दी हिलालाच्या उदाहरणावरून दिसून येतें.

श्लो. ४८ मध्यें करिष्यथः पडलें आहे तेथें करिष्यतः असें हवें.

श्लो. ५० च्या भाषांतरांत " परंतु त्याचा परिणाम त्याला चेव आणण्यांतच झाला आहे " असें वाक्य आहे. यांतील त्याचा परिणाम म्हणजे सख्य करून ताब्यांत ठेवण्याचा परिणाम असा अर्थ पूर्व वाक्यावरून निष्पन्न होतो तो बरोबर नाहीं. तह केल्यानंतर तुम्हींच (आपल्या करणीनें) त्यास आपणाविरुद्ध उठविलेंत असा येथील

अर्थ आहे. तदनंतर शिवाजीस आग्रा येथें भेटीस बोलावून औरंगजेबानें कपटानें कैद केलें याचाच अप्रत्यक्ष उल्लेख येथें करण्यांत आला आहे.

शिवाजीशीं निष्कपटपणानें तह करून त्यास आपलासा करणें हा एकच मार्ग आहे, अन्य मार्गांनीं त्यास जिंकणें अशक्य आहे, असें आपलें स्पष्ट मत लिहून बहादूरशहा वगैरेंनीं आपलें उत्तर संपविलें आहे आणि येथेंच जयरामानें आपल्या आख्यानाचा द्वितीयाध्याय पूर्ण केला आहे. तृतीय व चतुर्थ अध्यायांचें निरीक्षण आपण प्रारंभीं केलेंच आहे; तेव्हां आतां पंचमाध्यायाकडेच वळावयाचें आहे.

शिवाजी महाराजांनीं तह मोडून अचानक पन्हाळा घेतला ही वार्ता येतांच विजापूरच्या दरबारांत मोठी खळबळ उडाली. शिवाजी महाराजांनीं हा जो चढाईचा पवित्रा टाकला त्यास तुमचें कपटी कारस्थानच कारणीभूत झालें असा तेथील सर्व सरदारांनीं मुख्य वजीर खवासखान यास दोष दिला. तो दोष मुत्सद्देगिरीनें स्वीकारून खवासखानानें सर्वांस शांत केलें आणि ताबडतोब शिवाजी महाराजांच्या पारिपत्यासाठीं बहिलोलखानास मोठ्या सैन्यानिशीं रवाना केलें. तसेंच रांगणा प्रांतांत असलेले मुजावरमलीक व सर्जाखान, आदवनीचा सिद्दी मसूद, कर्नूलचा अबदुल अजीज आणि नलदुर्गाच्या जवळ असलेला खिदरखान पणी यांस तातडीनें बहिलोलखानास येऊन मिळण्याविषयीं पत्रें पाठविलीं. इतकेंच नव्हे तर मोगल सरदार दिलेरखान याजकडूनहि सत्वर मदत मिळविण्याची खटपट चालविली. पण शिवाजी महाराजांचे गुप्त हेर जागरूक होते. त्यांजकडून ही सर्व बातमी महाराजांस टाकोटाक समजली. तेव्हां त्यांनीं हे सरदार बहिलोलखानास मिळण्यापूर्वींच त्याचा मोड करण्याचें ठरवून प्रतापराव वगैरे सरदारांस तत्काळ पाठविलें. त्यांनीं उमराणीजवळ बहिलोलखानास अचानक घेरून त्याचा पूर्ण पराभव केला. तेव्हां पर्णालग्रहण पक्कें झालें म्हणून जयरामानें या उमराणीच्या युद्धाचें वर्णन पर्णालग्रहणाख्यानांत पांचव्या (शेवटल्या) अध्यायांत केलें आहे. या युद्धाचें इतकें सविस्तर वर्णन अन्यत्र आढळत नाहीं म्हणून ऐतिहासिक दृष्ट्याहि या वर्णनाचें महत्त्व विशेष आहे. आपण आतां यांतील कांहीं स्थळांचें निरीक्षण करूं.

शिवाजी हा विष्णूचा कल्की अवतार असें जयरामानें अन्यत्र म्हटलें आहे; पण अ. ५।८ मध्यें त्यास भावी कल्की अवताराचा अग्रदूत असें म्हटलें आहे.

सालेरच्या युद्धांतील मोगल सरदारांपैकीं कित्येकांचीं नांवें १३ ते १८ या श्लोकांत आलीं आहेत. त्यांत १४ व्या श्लोकांत ‘ अस्माको बंधुः ’ म्हणून म्हटला आहे तो मोगलांकडील सेनापति बहिलोलखान हा होय. म्हणजे बहिलोलखान हेंच दोघां बंधूंचें नांव. मोगलांकडील महत्कर्मसिंह (मोहकमसिंह ?), अमरसिंह, उदारामाचा नातू आणि सर्जाखान हीं आणखी चार नांवें यांत आलीं आहेत. यांपैकीं अमरसिंह हा उंबरखिंडीच्या युद्धांत होता असें शिवभारतावरून कळतें.

नबाबुरहमित्येवमुच्चैः क्रोशन् व्यवस्थितः
ततोप्यधिकमेतस्मिन्निपेतुस्तस्य सैनिकाः ॥
प्रवदन्तो नबाबश्चेद्धंतव्यः शास्तिखानवत् ॥ ५।१६–१७ ॥

यांत वर्णिलेला नबाब कोण हें निश्चित कळत नाहीं. बहुधा तो या युद्धांतील मोगलांचा मुख्य सेनापति इखलासखान असावा. ' न बाबुः ' असा पदच्छेद करून ' मी बाबू (हिंदु) नव्हे ' असा त्याचा अर्थ भाषांतरांत केला आहे तो युक्त नाहीं. कारण ' मी हिंदु नाही ' असें ओरडून सांगण्यानें मराठ्यांकडून जीवदान कसें मिळेल ? उदारामाच्या नातवानें शिखासूत्र दाखवून म्हणजे आपण ब्राह्मण आहों असें पटवून देऊन जीवदान मिळविल्याचें पुढल्याच श्लोकांत वर्णिलें आहे. तेव्हां मी हिंदु आहें असें ओरडण्यानें कदाचित् जीवदान मिळण्याचा संभव; ' मी हिंदु नव्हे ' असें ओरडण्यानें उलटच परिणाम व्हावयाचा. अर्थात् येथें ' न बाबुः ' असा पदच्छेद करणें युक्त नव्हे. ' नबाबः अहं ' याऐवजीं छंद जमण्यासाठीं ' नबाबुरहं ' असें अकारान्ताऐवजी उकारान्त नाम कवीनें योजिलें आहे इतकेंच. यांत पदच्छेद करून श्लेष काढणें अयुक्त होय.

बहिलोलखानाचें सैन्य प्रयाण करीत असतां धुळीनें सूर्य दिसेनासा झाला याचे वर्णनांत "कवयस्तर्कयांचक्रुरित्थं ते चक्रवर्तिनः" ॥ ५।३८ ॥ हा उल्लेख कवि परमानंदाचाच असावा असें वाटतें. परमानंदाचें काव्य वाचूनच शिवचरित्र आपणहि वर्णावें अशी आपणास स्फूर्ति झाल्याचें काव्यारंभीं जयरामानें सांगितलेंच आहे. पोलादपुरास शिवाजी महाराज आले तेव्हां तेथें परमानंदाचे शिष्य शिवचरित्र गात असल्याचा उल्लेख जयरामानें चौथ्या अध्यायांत केला आहे. तसाच हा परमानंदाचा तिसरा उल्लेख असावा असा तर्क होतो व तो खरा असेल तर परमानंदानें या उमराणीच्या युद्धापर्यंतचा तरी शिवचरित्राचा भाग लिहिला असला पाहिजे असें अनुमानितां येईल.

श्लो. ५०–अस्मात् याचे जागीं अस्मान् असें रूप असावें. येथें विचार्यते हा शब्द विचारणें या मराठींतील अर्थानें कवीनें योजिला आहे कीं काय अशी शंका येते.

श्लोक '५४–' जलाशयोऽभवच्छत्रोस्तत्र सैन्यं ' जलाशय होता व त्याजवळ शत्रूचें सैन्य होतें. भाषांतरांत सैन्याचा उल्लेख नसून शत्रोः याचा संबंध जलाशयाकडे जोडला आहे.

मराठे सरदारांनीं उमराणीजवळ येतांच तेथील तलाव रोखून शत्रूचें पाणी तोडलें आणि त्यास चोहोंकडून वेढून टाकिलें. सिद्दी हिलाल शत्रूच्या आघाडीवर राहिला. विठोजी शिंदा शत्रूच्या पिछाडीस एका कोसावर वाट अडवून बसला. डाव्या उजव्या बगलांस कृष्णाजी भास्कर आणि विठ्ठल पीलदेव यांनीं वेढा दिला आणि विसो बल्लाळ हा जरूर पडेल तेथें मदत करतां यावी म्हणून सभोवतीं फिरता राहिला. ही एवढी व्यवस्था

होईतों याची गंधवार्ता शत्रूस लागली नाही. यावरून हें सर्व कार्य सूर्योदय होण्यापूर्वीच गुपचीपपणें उरकलें गेलें असलें पाहिजे हें उघड आहे. पण विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी कीं मुख्य सेनापति प्रतापराव व आनंदराव हे अद्यापि उमराणीस येऊन पोचले नव्हते. ते येण्यापूर्वीच शत्रु-सैन्यास वेढा देण्याचें हें कार्य पुढें आलेल्या सामान्य सरदारांनींच उरकून टाकलें होतें ! शिवाजी महाराजांच्या तालमींत सर्वच मराठे सरदार कसे निष्णात व शिस्तबद्ध झाले होते याचें हें प्रत्यंतरच होय. सकाळीं बहिलोलखानाचे सैनिक आपल्या हत्तींस जलाशयावर नेऊं लागले तेव्हां तो जलाशय इतकेंच नव्हे तर आपलें सर्व सैन्य चोहोंकडून वेढलें गेलें आहे हें त्यांच्या ध्यानीं येऊन त्यांची मोठी त्रेधा उडाली. इतक्यांत सेनापति प्रतापराव हजार घोडेस्वारांनिशीं भरधांव येऊन पोचला आणि लगेच युद्धाची धुमश्चक्री सुरू झाली. सूर्यास्तापर्यंत युद्ध होऊन विजापूरकरांचा पूर्ण पराभव झाला; पण प्रतापरावानें बहिलोलखानास पळून जाऊं दिलें. शिवाजी महाराजांनीं कोल्हापूरच्या युद्धांत रुस्तुमजमानास असेंच पळून जाऊं दिलें होतें (शिवभारत। २४।७४–नहि विदधति भीरौ शूरतां सूर्यवंश्याः) याचेंच अनुकरण प्रतापरावानें केलें म्हणायचें !

ततस्तद् बहलोलाख्यपठाणकटकं महत् ॥
दधारान्वर्थनामार्थं तद्वक्तुं केन पार्यते ॥ ५।६२ ॥

यांतील अन्वर्थनामार्थं सार्थ होण्यासाठीं बहलोल याच्या जागीं बहुलोल असाच कवीचा मूळ पाठ असला पाहिजे. या आख्यानांत बहुलोल असें नांव कोठेंच छापिलेले नाहीं. श्लोक २५ व १०५ यांमध्यें बाहुलोल व इतरत्र बहलोल आहे. पण प्रस्तुत श्लोकांत श्लेषासाठीं बहुलोल हा शब्द आवश्यक आहे.

श्लो. ६५ यामध्यें 'ततः खणखणाटोच्चैः संबभूव द्वयोर्महान्' यांत खणखणाटः आणि उच्चैः यांचा संधि करतांना रणधुमाळीमुळें कवीचें मन व्यग्र झालेलें दिसतें.

श्लोक ७९—' तेलंगदायसहिताः निष्पेतुरहिते तदा '

यांतील दाय शब्दाचा अर्थ भाषांतरांत सैन्य असा केला आहे. पण तो अर्थ आढळत नाहीं. येथें **दाय** याचे जागीं **राय** असा मूळपाठ असावा. मराठ्यांच्या बाजूस कोणी तेलंगराय नामक सरदार असणें शक्य आहे. रूपाजी भोसला, सोमाजी मोहिता व सिदोजी निंबाळकर यांचें सैन्य तेलंगी असणें शक्य नाहीं. तें महाराष्ट्रीयच असणार.

श्लोक ८३—" नायीकजी पांडरासौ खराडा नायकस्तथा "

शिवभारतांतील माझ्या राहिलेल्या शंकांपैकीं एकीचें वरील श्लोकानें निरसन झालें. शिवभा. १७।५६ मध्यें पांडरो नायकश्चैव खराटोपिच नायकः असा उल्लेख आहे. कर्नाटकांतील पाळेगार संस्थानिकांस नायक म्हणतात. केंगनायक, वेंकटनायक व त्रिमलनायक हीं नांवें शिवभारतांत आलेलीं आहेत. याच प्रकारें महाराष्ट्रांतहि प्रथा

होती कीं काय अशी शंका मला पांडरे नायक व खराडे नायक या उल्लेखांवरून आली होती. याच खराडे व पांडरे यांना शिवभा. २३।५५ मध्यें " उभौ नायकनामानौ राजानौ यादवान्वितौ " म्हटलें आहे. यावरून नायक हें विशेषनाम आहे कीं काय अशी शंका येत होती. सराफी करणारांसहि नाईक म्हणून उल्लेखीत असत. तेव्हां खराडे व पांडरे हे कोणत्या अर्थानें नायक अशी माझी शंका. ती " नाईकजी पांडरा " या उल्लेखानें दूर झाली आणि नाईकजी हें विशेषनाम असें निश्चित झालें. नाईकजी पांडरे त्याचप्रमाणें नाईकजी खराडे.

या उमराणीच्या युद्धांत असलेल्या १४ मराठे सरदारांचीं नावें या आख्यानांत आलीं आहेत. त्यांत इतरत्र आलेलीं कोणतीं आणि याच स्थळीं प्रथम उल्लेखिलेलीं कोणतीं हें इतिहासज्ञांनीं पहावें. यांत एक नांव कृष्णाजी भास्कर असें आहे. अफजलखानाचे व शिवाजीचे भेटीचे वेळीं एक कृष्णाजी भास्कर अफजलखानाबरोबर होता. खानानें आपली तरवार याचेच हातीं दिली होती व तिनें शिवाजीवर प्रहार करण्याचा प्रयत्न त्या कृष्णाजी भास्करानें केला होता. प्रतापगडच्या युद्धानंतर जाधव, हिलाल इ० अफजलखानाबरोबरचे कित्येक सरदार शिवाजीकडे आले तसाच हा कृष्णाजी भास्करहि आला होता काय? कीं उमराणीच्या युद्धांत असलेला कृष्णाजी भास्कर हा दुसरा कृष्णाजी भास्कर? पन्हाळ्याचे वेढ्यांतून निसटून जातांना शिवाजीनें त्या किल्ल्यावर मुख्य अधिकारी त्र्यंबक भास्कर म्हणून नेमिला होता (शिवभा. २६।५४). त्या त्र्यंबक भास्कराचा तर हा कृष्णाजी भास्कर भाऊ नसेल? तिसरा एक वेदोजी भास्कर (शिवभा. १२।६) आढळतो, तोहि कदाचित् याचा भाऊ असेल. पण केवळ नामसादृश्यानें हें निश्चित ठरत नाहीं. त्यास तसा पुरावाच उपलब्ध झाला पाहिजे.

येथवर पर्णालपर्वतग्रहणाख्यानांतील जीं स्थळें चर्च्य आहेत असें मला वाटलें तीं नमूद करून त्यांसंबंधानें मीं आपलें म्हणणेंहि दिलें आहे. त्याची ग्राह्याग्राह्यता ठरविणें हें काव्येतिहासज्ञ विद्वज्जनांकडे आहे. ते हें कार्य यथावकाश करितील अशी आशा प्रगट करून हा लांबलेला लेख पुरा करितों.

४ भोसलवंशावली*

(श्री. यशवंत गणेश फफे, पुणें)

शिवचरित्रप्रदीपांत भोसलवंशावली हें संस्कृत काव्य छापलेलें आहे. तें वाचीत असतां उद्भवलेल्या कांहीं प्रश्नांची चर्चा आज करावयाची आहे.

पहिला प्रश्न या काव्याचा कर्ता कोण हा उद्भवला. मथळ्याखालींच म्हणजे पहिल्या श्लोकाचे वर "वेंकटभट्टविरचिता" असें लिहिलें आहे. यावरून या वंशावलीचा कर्ता वेंकटभट्ट असा अर्थ होतो; पण ३४ श्लोकांच्या या वंशावलीखालीं आणखी ३ श्लोक जोडले आहेत त्यांतील पहिला श्लोक असा आहे :—

श्रीशाहजीभूपतिवंशवर्णना। रामस्य पूर्वैरिव भूसुरेंद्रैः ॥
गंगाधरार्यैर्विहिता मखीन्द्रैः । रामेण सेयं लिखिता तदाज्ञया ॥

या स्पष्ट उल्लेखावरून कवीचें नांव गंगाधर व प्रतलेखकाचें नांव रामचंद्र असें ठरतें. तेव्हां या काव्याचा कर्ता वेंकटभट्ट कीं गंगाधर आर्य? याचा उलगडा या काव्याच्या अधिक प्रती उपलब्ध झाल्यास कदाचित् होईल. म्हणून तंजावर संग्रहांत या काव्याच्या प्रती असल्यास मंडळानें शोध घ्यावा.

या श्लोकाचे पुढें आणखी दोन श्लोक छापले आहेत ते बुद्धिबळाचे पटावरील ६४ घरांतून घोडा आपल्या गतीनें अखंडपणें कसा फिरवावा यासंबंधाचे आहेत. त्या श्लोकांचा या वंशावलीशीं व शिव-चरित्राशीं कांहीं एक संबंध नाहीं असें असतां हे श्लोक व त्यांच्या स्पष्टीकरणार्थ दोन कोष्टकें संपादकांनीं या शिवचरित्रप्रदीपांत दिलीं आहेत. त्याचें कारण इतकेंच दिसतें कीं, ६४ घरांतून घोडा अखंड फिरविणें हा एक गमतीचा प्रकार असल्यानें तो देण्याचा मोह संपादकांस आवरला नसावा. तें असो. पण मूळ लेखकानें दिलेली रीती चुकली आहे असें जें संपादकांनीं दर्शविलें आहे, तें बरोबर नाहीं. उलट संपादकांनीं या रीतीच्या स्पष्टीकरणार्थ जीं २ कोष्टकें दिलीं आहेत तींच सदोष असून त्याप्रमाणें घोडा ६४ घरांतून अखंडपणें जाऊं शकत नाहीं, तो ३२ व्या घरावर अडतो. रामचंद्राच्या रीतींतील एक अक्षर प्रत करतांना किंवा छापतांना चुकलें आहे त्यामुळें संपादकांची ही दिशाभूल झाली आहे.

तिसरा प्रश्न भोसलवंशावलींतील पहिल्याच श्लोकांत आलेल्या **श्रीवराट** या नांवासंबंधानें उद्भवतो. हें नांव भोसलवंशावलींतील इतर नांवांप्रमाणें **जी** प्रत्ययान्त नाहीं. तें उदेपूर घराण्यांतील एकाद्या प्रसिद्ध राजाचेंहि आहेसें वाटत नाहीं. कवीनें तें निराधारपणें दिलें असेंहि म्हणतां येणार नाहीं. यास्तव या नांवाचा अधिक शोध

* पाक्षिक सभा ८, शक १८७९ (इ. १९५८)

घेणें अवश्य वाटतें. साताऱ्याच्या प्रतापसिंहाची राणी सगुणाबाई हिनें इ. १८७४ त पुराव्या-साठीं दिलेला एक वंशवृक्ष उपलब्ध आहे. त्यांत बाबाजी भोसल्यावरील तिसरें नांव Barahattaji बऱ्हाटजी असें आहे. बवयोः सावर्ण्यं या नियमानुसार हें वऱ्हाट असें होतें व तें प्रस्तुत वंशावळींतील वराट या नांवाशीं मिळतें. दोन्हीं वंशावळींत बाबाजीच्या वर तिसरें स्थानच या नांवास दिलेलें आहे ही गोष्टहि ध्यानांत घेण्याजोगी आहे. वराट या नांवाचा देशवाचक वऱ्हाड या शब्दाशीं संबंध आहे कीं काय अशीहि कल्पना मनांत येते. पुराणादिकांतून देशनामांवरून तेथील राजाचा उल्लेख केला जातो हें आपणांस माहीत आहेच.

प्रस्तुत भोसलवंशावली मूळचीच जरा क्लिष्ट असून अशुद्धतेमुळें तिच्या क्लिष्टतेंत भर पडली आहे. यास्तव शुद्धतेच्या दृष्टीनें क्रमशः सर्वच श्लोक वाचून चर्चा करणें इष्ट होईल. वेळेच्या अभावीं आज तसा प्रयत्न करितां येत नाहीं. तथापि एक स्थळ आजच सभासदांच्या निदर्शनास आणून देणें इष्ट वाटतें. श्लोक २० पहा. शिवाजीच्या स्तुतिपर असलेला हा श्लोक असाः—

निर्जित्य सर्वानवनीमहेन्द्रान् । नृपः स सिंहासनमध्यरोहत् ॥
योऽधत्त दिल्लीपतिचित्तशल्य- । मनन्यगच्छन्नृपतीतिशब्दम् ॥ २० ॥

दिल्लीपतीच्या चित्तास शल्याप्रमाणें टोंचणारा व अन्य कोणाकडेहि लावला न जाणारा असा नृपति हा शब्द शिवाजीनें धारण केला असा याचा अर्थ होतो. पण येथें शंका अशी उद्भवते कीं राजा हा किताब भोसल्यांसच नव्हे तर अनेक घराण्यांस कित्येक पिढ्यांपासून चालत आलेला होता. तो शिवाजीनें या प्रसंगीं धारण केला आहे हें म्हणणें कसें समर्पक होईल ? शिवाय चिररूढ असलेला हा शब्द शिवाजीनें धारण केल्याचें दिल्लीपतीस शल्य कां वाटावें ? अर्थात् येथें कांहीं चूकभूल आहे हें उघड आहे. शिवाजीनें नवीन धारण केला तो शब्द नृपति हा नव्हे तर छत्रपति हा होय व हाच शब्द दिल्लीपतीस शल्या-प्रमाणें वाटला असणार. या दृष्टीनें श्लोकाच्या चतुर्थ चरणाकडे पाहिल्यास तेथें वस्तुतः छत्रपति हाच शब्द असल्याचें स्पष्ट दिसूं लागतें. मूळचा चरण अनन्यगच्छत्रपतीतिशब्दम् असा असून लेखनवाचनप्रमादानें ञ चे जागीं न आणि त्र चेखालीं ऋकार जोडून तेथें चुकीनें न्नृ झाला आहे व तेणेंकरून अर्थाचा अनर्थ झाला आहे. नमुन्यादाखल हें एक उदाहरण दिलें आहे. यावरून अशा संस्कृत काव्यांची शुद्धाशुद्धतेच्या दृष्टीनें सूक्ष्मपणें छाननी होणें कसें आवश्यक आहे हें स्पष्ट होईल.

---

५ शहाजीपुत्र संभाजीची जन्मतिथि*

(श्री. देवीसिंग चौहान, मुंबई)

शहाजी महाराजांचा ज्येष्ठ पुत्र व शिवराजांचा सोदर संभाजीची जन्मतिथि अद्यापि ठरलेली दिसत नाहीं. कै. गो. स. सरदेसाई यांनीं संभाजीचा जन्म इ. स. १६१९ त म्हणजे शक १५४१ मध्ये झाला असें म्हटलें आहे (शककर्ता शिवाजी–१९३५, पृ. १७); परंतु हें विधान खरें नाहीं. शिवकालीन पत्र–सार–संग्रहांतील कांहीं पत्रें व कवीन्द्र परमानंदाचें शिवभारत यांच्या आधारें वरील तिथि निश्चित करण्याचा प्रयत्न येथें कर्तव्य आहे.

शहाजी राजांचे वडील मालोजी राजे. यांना विठ्ठलराज भोसले नांवाचा भाऊ होता. परमानंदाने दिलेल्या सविस्तर वर्णनावरून विठोजीच्या मार्गदर्शनाखालीच ५ वर्षांच्या शहाजीची जोपासना व प्रगति झाली. त्याला आठ पुत्र होते. त्यांत सर्वांत थोरला संभाजी. खेलोजी, मालोजी वगैरे इतर सात पुत्र (शिवभारत अ. ३ श्लो. ३). सर्वांत ज्येष्ठ पुत्र संभाजी माघ वद्य ३० शक १५४४ पर्यंत जिवंत असल्याचा विश्वसनीय पुरावा मिळतो (पसासं. ले. १७६). हा संभाजी निजामशाही दरबारांत घडलेल्या खंडागळे हत्ती प्रकरण प्रसंगींच्या, भोसले विरुद्ध जाधव या युद्धांत मारला गेला (शि. भा. अ. ३, श्लो. ४९-५१). विठोजी भोसल्याच्या शेष सात मुलांत २१०० होन व १०८ तोळे सोनें यांची वांटणी झाल्याचा व या मुलांना वरील ऐवज पोचल्याचा पुरावा उपलब्ध झाला आहे. वाटणी फक्त सात मुलांत झाली. एक पावती खेलोजी आदि सहा मुलांची आहे. त्यांत मालोजी नाही (पसासं., ले. १७७). दुसरी पावती फक्त मालोजीची आहे (पसासं., ले. १७८). दोन्ही पावत्या एकाच मितीच्या म्हणजे फाल्गुन शु. ८ शक १५४४ च्या आहेत.

(१) यावरून माघ वद्य ३० शक १५४४ रोजीं हयात असलेला संभाजी फा. शु. ८ शक १५४४ रोजीं झालेल्या वाटणींत सामील नाहीं. तो हयात नव्हता व तो शक १५४४ मध्यें निपुत्रिकच वारला; हें अनुमान अपरिहार्य ठरतें. (२) खंडागळे हत्तीयुद्धांत लखोजी जाधवाच्या हातून संभाजी मारला गेला असें परमानंदानें वर्णन केलें आहे. लखोजीचा थोरला पुत्र दत्ताजी जाधव हा संभाजीच्या हातून मारला गेल्यामुळें लखोजीनें संभाजीचा शिरच्छेद करून पुत्रवधाचा सूड उगविला. दत्ताजी जाधवाचा मृत्युहि शक १५४४ मध्यें झाला. प्रत्यक्ष जावयाला जखमा करण्यासहि लखोजीनें मागेंपुढें पाहिलें नाहीं असें मोठें मार्मिक वर्णन परमानन्द करितो. एतदनुषंगानें असें

* संमेलन ४९ वें, श. १८८४ (इ. १९६२).

नमूद करावेंसें वाटतें कीं, बिनचूक ऐतिहासिक तपशील देण्याची परमानन्दाची हातोटी विठोजीच्या मुलांच्या यादीवरून दिसून येते. कौतुकाची बाजू अशी कीं, हीच यादी व हाच ज्येष्ठपरत्वाचा क्रम उपरिनिर्दिष्ट पत्रांतून दिसून येतो. (३) वरील पुराव्यावरून निजामशाही दरबारांतील खंडागळे हत्ती प्रकरण शक १५४४ च्या फाल्गुनांत घडून आल्याचें सिद्ध होतें. (४) जाधवराव निजामशाही सोडून मोगलांकडे केव्हां गेला या गोष्टीचा उलगडाहि वरील पुराव्यावरून होण्यासारखा आहे. ही गोष्ट शक १५४४ च्या फाल्गुनांत किंवा श. १५४५ च्या आरंभीं झाली असली पाहिजे. कारण जाधवरावांच्या दत्ताजी या ज्येष्ठ मुलाचा अन्त निजामशाही दरबारांतच घडला. यावरून कै. आपटे यांचे म्हणणें कीं, "शहाजी व जाधवराव यांचें वितुष्ट वाढून जाधवराव मोगलांकडे शके १५४३ मध्यें गेला." हें खोटें ठरतें. (५) आतां शहाजीपुत्र संभाजीचा जन्म केव्हां झाला हें पाहावयाचें. विठोजीपुत्र संभाजी हा शहाजी राजाचा सख्खा चुलतभाऊ होय. विठोजीनें शहाजीचा प्रतिपाल व जोपासना केली. विठोजी दिवंगत झाल्यावर या भोसले कुलाची सर्व काळजी शहाजीला घ्यावी लागलेली दिसते. खंडागळे हत्ती प्रकरणीं युद्धांत विठोजीपुत्र संभाजी पडला. त्याची कड घेण्यासाठींच लखोजी जाधवराव प्रत्यक्ष श्वशुर असून सुद्धा त्याच्याविरुद्ध शहाजीला शस्त्र उगारावें लागलें.

विठोजीपुत्र संभाजी हयात असता तर, शहाजी आपल्या पुत्राचें नांव संभाजी कसें ठेवणार? प्रत्यक्ष चुलतभाऊ जिवंत असतां त्याचेंच नांव आपल्या मुलाला कोणीहि देणार नाहीं. विठोजीपुत्र संभाजीच्या मृत्यूनंतर शहाजीला पुत्र झाला व संभाजीची स्मृति जागृत ठेवण्यासाठीं शहाजीनें आपल्या ज्येष्ठ पुत्राचें नांव संभाजी ठेविलें असावें, ही गोष्ट प्राचीन हिंदू परंपरेस व कुलाचारास धरूनच आहे. म्हणून शहाजीचा ज्येष्ठ मुलगा संभाजी हा शक १५४४ संपल्यानंतर जन्मला ही गोष्ट सिद्ध होते. म्हणजे तो शक १५४५ मध्यें किंवा तदनंतर जन्मला असावा.

शिवदिग्विजयकारानें संभाजीजन्माची तिथि शके १५४५ हीच दिली आहे ती खरी आहे असें यावरून सिद्ध होतें.

बृहदीश्वर शिलालेखांत संभाजीचा जन्म शक १५४७ दिला आहे. तो खरा नाहीं असें वाटतें. कारण या संभाजीचें लग्न श. १५५२ च्या कार्तिक-मार्गशीर्षांत झालें असें मीं इतरत्र दाखविलें आहे. तत्कालीन सामाजिक पद्धतीनुसार भोसले कुलांतहि मुलां-मुलींचीं लग्नें लहानपणीं करीत. छत्रपति शिवाजी, छ. संभाजी व राजाराम यांची लग्नें आठव्यानवव्या वर्षीं झालेलीं आहेत. हें ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध आहे. जर शिवाजीचा ज्येष्ठ सोदर संभाजी शक १५४७ त जन्मला असें मानलें तर लग्नसमयीं त्याचें वय केवळ ५ च वर्षांचें ठरतें. लहानपणीं म्हणजे इतक्या लहानपणीं हें लग्न संभवत नाहीं. संभाजीचा जन्म शक १५४५ चा असल्यास ७व्या वर्षीं लग्न होणें भोसलेकुलपरंपरेस धरूनच होईल. म्हणून संभाजीचा जन्म श. १५४५ मध्यें झाला या विधानास पुष्टि मिळते.

---

६ एकोजीची जन्मतिथि*

(श्री. देवीसिंह चौहान, मुंबई)

शहाजी महाराजांच्या संभाजी, शिवाजी व एकोजी या तीन मुलांपैकीं फक्त छत्रपति शिवाजी महाराजांची जन्मतिथि–फाल्गुन वद्य ३ शक १५५१ ही शिवभारतादि इतिहाससाधनाधारें निश्चितपणें इतिहासज्ञांस सांगतां येते. थोरला मुलगा संभाजी व धाकटा मुलगा एकोजी यांच्या जन्मतिथि निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीत. किमानपक्षीं त्या निश्चयपूर्वक सांगण्यांत आलेल्या नाहींत. प्रस्तुत प्रसंगीं एकोजीच्या जन्मतिथीचा विचार कर्तव्य आहे.

एकोजी तिघांपैकीं धाकटा असल्याचें सर्वमान्य आहे असें मानावयास हरकत नसावी. छत्रपति शिवाजी महाराजांनीं एकोजीस लिहिलेल्या पत्रांत, " तुम्ही धाकटे भाऊ ", " आम्ही तरी वडिलपणें " असे उल्लेख (पसासं. ले. २३३२) सांपडतात. या मताला तंजावरस्थ एकोजीचे वंशज व त्यांच्या पदरचे पंडित यांचा पाठिंबा असल्याचें बृहदीश्वर देवालयांतील शिलालेखांतील उल्लेखांवरून दिसून येतें.

एकोजीची जन्मतिथि निश्चित करण्याच्या दृष्टीनें अस्सल ऐतिहासिक कागद-पत्र वगैरेचा पुरावा दुर्दैवानें पुरेसा उपलब्ध नाहीं. सुदैवानें परमानन्दकृत शिवभारतांतील एका उल्लेखावरून या तिथीचा शोधबोध होणें थोडेंसें तरी शक्य दिसतें. शिवभारतांतील तो उल्लेख ८ व्या अध्यायांतील खालील श्लोकांत सांपडतोः—

अथो कतिपयाहोभिस्तं समाप्य महोत्सवम् ।
तस्यैवच गिरेर्मूर्ध्नि स्वजनेन समन्विताम् ॥ ८.१७ ॥

सम्बन्ध्यनुमतः पत्नीमन्तर्वत्नीं निधाय ताम् ।
प्रतस्थे शाहनृपतिर्दर्याखानजिगीषया ॥ ८.१८ ॥

वरील गरोदर पत्नीच्या उल्लेखाविषयीं कै. द. वि. आपटे यांनीं शिवभारताच्या प्रस्तावनेंत शहाजी राजांची पत्नी जिजाई असून झालेला मुलगा शिवाजी होय असें म्हटलें आहे (प्रस्तावना पृ. ७९). पण हें बरोबर दिसत नाहीं. कारण शिवभारतकारानें शिवजन्माचा वृत्तांत सविस्तर असा ५ व ६ अध्यायांत दिलेला आहे. शहाजीपत्नी जिजाईला सहा पुत्र झाले, पण त्यांपैकीं दोघेच जगले (५–२२) असें सांगून त्यानें शिवजन्माचें वर्णन केलें आहे. शिवाजी महाराजांच्यानें जिजाई गरोदर असतांना सुद्धां शहाजी महाराज दर्याखानाशीं लढण्यासाठीं गेले होतेः—

* संमेलन ४९ वें, श. १८८४ (इ. १९६२)

योद्धुमद्धा पठानेन दर्याखानेन मानिना ।
शाहराजे महाराजे प्रयाते विषयान्तरम् ॥ ६·३७॥
प्रभुः स जगतां प्रादुरभूद्भूशभलान्वये ॥ ६·३८ ॥

असें सांगून शिवभारतकार शिवराज जन्मले असें लिहितो. पत्नी गरोदर असतांना तिला शिवनेरीवर ठेवून स्वारीवर गेल्याचें व शिवराजाचा जन्म झाल्यानंतर परत येऊन शहाजी राजानें पुत्रमुखावलोकन केल्याचेंहि वर्णन त्यानें आवर्जून केलेलें आहे :—

दर्याखानं शरैर्भित्वा नीत्वा निरवलेपताम् ।
विजयी शाहराजोऽपि शिवं गिरिमथाव्रजत् ॥ ६·९३ ॥
स तत्र सोदरं शम्भोरंभोजास्यलोचनम् ।
व्यलोकत मुदोपेतः सदोदितपराक्रमः ॥ ६·९४ ॥

हें पुत्रमुखदर्शन शिवराज ५-६ महिन्यांचे झाल्यानंतर शहाजीला घडलें असें कवीनें स्पष्ट म्हटलें आहे. शक १५५२ च्या श्रावण–भाद्रपदांत हा योग घडून आला असें स्पष्ट होतें. येथें ही गोष्टहि लक्ष्य आहे कीं शहाजीनें दर्याखानाचा फक्त गर्व हरण केला. त्याचा वध केला नाहीं. तो जिवंत होता.

आठव्या अध्यायांतील दर्याखानाला जिंकण्याचा व आपल्या गरोदर पत्नीला, आपला व्याही विश्वासराजवंश्य विजयराज याच्याजवळ शिवनेरीस ठेवण्याच्या उल्लेखांत कवीन्द्र परमानंदाला जिजाबाई अभिप्रेत नाहीं असें स्पष्ट दिसतें. शिवराजाच्या जन्माचें सविस्तर वर्णन केल्यानंतर पुनः जिजाबाई गरोदर झाली असावी काय ? किंवा कै. द. वा. आपटे शिवभारताच्या प्रस्तावनेंत प्रतिपादतात त्याप्रमाणें शिवराजाच्यानें गरोदर असतानांच हा जिजाबाईचा उल्लेख आहे की काय ? ५ व्या व ६ व्या अध्यायांत शिवजन्माचें व शहाजी महाराजांच्या पुत्रदर्शनाचें सविस्तर वर्णन केल्यानंतर, परामनंदासारखा ऐतिहासिकतेची पदोपदीं काळजी घेणारा इतिहासलेखक इतका ढोबळ कालविपर्यासाचा प्रमाद करील, असें म्हणणें योग्य होणार नाहीं. परंतु कै. आपटे तसें समजतात. हें अनवधानानें घडलें असावें. जिजाबाई पुनः गरोदर राहिल्याचें व तिला पुत्र वा कन्या झाल्याचें कोठेंहि आढळांत नाहीं. एवंच हा गरोदरपणाचा उल्लेख जिजामातेविषयीं नाहीं असें निश्चयानें म्हणावें लागतें. तर मग हा उल्लेख शहाजी राजांच्या कोणा पत्नीचा ? शहाजी महाराजांना दोनच पत्नी होत्या. एक थोरली जिजाबाई व दुसरी धाकटी तुकाई. तुकाई आवाच्या पोटीं एकोजीचा जन्म झाला. एकोजी शिवाजीपेक्षां लहान होता हें निर्विवाद आहे. तंजावर येथील बृहदीश्वर शिलालेखांत एकोजी राजाला, वयानें नसलें तरी मानानें, मोठा ठरविण्याची युक्ति तंजावरच्या गादीवरील एकोजीच्या वंशजांनीं व त्याच्या दरबारांतील पंडितांनीं योजिली आहे.

त्यांनीं तुकाई आऊ ही शहाजी महाराजांची थोरली पत्नी असल्याचें वर्णिलें आहे; पण तें खोटें आहे म्हणून शिवभारताच्या ८ व्या अध्यायांतील शहाजी महाराजांच्या गरोदर पत्नीचा उल्लेख हा तुकाईचा आहे असें मला वाटतें. पुढें ती प्रसूत होऊन तिला एकोजी हें पुत्ररत्न झालें असा निष्कर्ष निघतो.

शिवाजी राजाच्यानें जिजाबाई व एकोजीच्यानें तुकाईआऊ गरोदर असतांना शहाजी राजांना दोनदां वेगवेगळ्या वेळीं दर्याखानावर स्वारी करावी लागली. हें दर्याखानाचें प्रकरण १–२ वर्षें रेंगाळत होतें. दर्याखान शक १५५२ च्या पौषांत मारला गेला असें कै. आपट्यांनीं बादशहानाम्याच्या आधारें ठरविलें आहे. दर्याखान हा प्रथम मोगलांचा सेनापति होता. प्रथम शहाजी महाराजांनीं निजामशाहीच्या हुकमानें त्याच्यावर स्वारी केली या वेळीं शिवजन्म झाला. त्यानंतरच्या मधल्या काळांत शहाजी निजामशाहीवर रुष्ट होऊन मोगलांकडे गेला व योगायोगानें याच कालांत दर्याखानानें मोगलांच्याविरुद्ध बंड केलें. शहाजीची दर्याखानावरील दुसरी स्वारी शहाजी मोगलांचा सरदार असतांना झाली. तें साल शक १५५२ चें होतें हें दर्याखानाच्या हकीकतीवरून दिसून येतें. त्याच सालांत तुकाई आवा गरोदर होती व तिचें वास्तव्य जिजाई इत्यादि शहाजी राजांच्या कुटुंबियांच्यासह शिवनेरीवर होतें.

याच वर्षी म्हणजे शक १५५२ त शहाजी राजांनीं आपला थोरला मुलगा संभाजी याचा विवाह शिवनेरीवर विजयराजाची कन्या जयन्ती इजबरोबर उरकून घेतल्याची हकीकत परमानन्दानें ८ व्या अध्यायाच्या आरंभींच दिली आहे. हा संभाजी-जयन्ती विवाह उरकून व गरोदर पत्नीला शिवनेरीस ठेवून, शहाजी राजे दर्याखानावर गेले. हा लग्नसमारंभ मार्गशीर्ष महिन्यांत झालेला असावा. त्या वेळीं तुकाईआऊ आसन्नप्रसवा होती असें समजण्यास हरकत नाहीं. ती शक १५५२ अखेरपर्यंत प्रसूत झाली असावी. अशा रीतीनें शहाजी महाराजांचा कनिष्ठ मुलगा एकोजी शक १५५२ च्या माघ-फाल्गुनांत जन्मलेला असावा.

७ दर्यासारंग हें नांव कीं पद ?*

(म. म. द. वा. पोतदार)

आज अनेक वर्षें वरील प्रश्न मी आपल्या मनाला करीत आहें. कारण 'दर्यासारंग' हा शब्द अलीकडे सुमारें चाळीस वर्षांपूर्वीपासून मराठी भाषेंत आरमाराधिपति या अर्थानें रूढ झाला आहे. अलीकडे म्हणण्याचें कारण कोठल्याहि मान्य कोशांत तो आढळत नाहीं. अच्युतराव कोल्हटकर यांच्या 'संदेशा'त तो या अर्थानें वापरल्याचें पुसट आठवतें. नाथमाधव यांच्या 'सावळ्या तांडेल' या कादंबरींतहि तो अशा अर्थानें योजिल्याचें श्री. आवळसकरांनीं सांगितलें. परंतु मराठी कागदपत्रें व बखरी वगैरेंत हा शब्द येतो. तथापि तो पदवाचक असल्याचें कधींहि मनांत आलें नाहीं.

सुमारें पसतीसचाळीस वर्षांमागें मी अलीबागेस गेलों असतां तेथील कोळी सरपाटील यांच्या घरचे कांहीं जुने कागद आणून आपल्या मंडळास सादर केले. या संग्रहांत मला 'सारंग' आडनांवाच्या मंडळीची एक यादीच मिळाली होती आणि ही सारंग मंडळी अद्यापिहि अलीबागेस आहेत.

तांडेल, नाखवा या शब्दांप्रमाणेंच सारंग हा शब्दहि आडनांववाचक बनल्याचा निश्चय मला वरील यादी व सारंगकुलाचें अस्तित्व यांवरून करतां आला आणि शंका आली कीं शिवाजीनें आरमारावर नेमलेला दर्यासारंग हाहि असाच दर्यानामक सारंग असावा, नव्हे असला पाहिजे.

तो विषय त्या वेळेपासून तसाच मनांत घोळत राहिला. आतां दर्यासारंगाविषयींचे उल्लेख पुनः काळजीपूर्वक जुळवून पाहतां मनानें ग्रहण केलें कीं 'दर्यासारंग' याचा अर्थ 'सारंग' कुळांतील दर्या नांवाचा एक पुरुष असला पाहिजे.

पुढील प्रमाणचिकित्सेवरून आपणहि तें ग्रहण कराल अशी आशा आहे.

(१) 'दर्यासारंग'चा अस्सल मराठी कागदांत आढळणारा एकमेव उल्लेख राजवाडे खंड ८ मध्यें आला आहे. त्यांत 'दौलतखान व दरियासारंग' अशा दोन व्यक्तिनामांचा उल्लेख आहे.

(२) मराठी बखरींतून सर्वांत जुना सभासद, तसेंच एक्याण्णव कलमी, चिटणीस, शिवदिग्विजय यांतूनहि दर्यासारंगाचे उल्लेख आले आहेत. तेहि नीट वा सरळ वाचून पाहिले तर दर्यासारंग, दौलतखान व मायनाक भंडारी या सर्व सहकाऱ्यांचे उल्लेख व्यक्ति-

---

* संमेलन ४७ वें, श. १८८२ (इ. १९६०).

आहे. इंग्रजाचे लेखांत या पुरुषाचें मूळ नांव वेंटगी सारंगी असें दिलें आहे. तो जर खरोखरच मुसलमान झाला असेल तर मग एक तर्क–दुर्बळसा तर्क–असा कीं मूळचा हिंदु वेंटगी मुसलमान 'दर्या' झाला. दर्या इमादशाहा असें नांव मुसलमानांत आलें आहे. उलट दर्याबाई भोसले, दर्याबाई निंबाळकर अशीं हिंदु नांवें पण स्त्रियांचीं आढळलीं आहेत.

तें कांहीं असो, वरील विवेचनावरून हें स्वच्छ सिद्ध व्हावें कीं दर्यासारंग हें व्यक्तिनाम आहे. पद–पदवी नाहीं.

(१२) मूळ गोष्ट सरळच होती. सर्व उल्लेख स्पष्ट व्यक्तिवाचकच आहेत. तथापि पंडित व्यर्थ भ्रमांत पडले; आणि मग मागाहून इतरेजन. परिणामीं एक इतिहासभ्रम आणि दुसरा भाषाभ्रम असे दोन भ्रम निर्माण झाले. पहिला विद्वानांची खात्री पटली म्हणजे दूर होईल. दुसरा मात्र जाणें कठीण आणि गेला तरी व्रण तरी राहीलच.

आधारभूत उतारे

१ सभासद (काव्ये. सं. १८०३ शके) पृ. ५६.

.........जहाजें करून

दर्यासागर म्हणोन मुसुलमान सुभेदार

व मायनाईक भंडारी असे दोघे सुभेदार करून, दोनशें जहाजें एक सुभा असें आरमार सजलें. (वाकसकर–आवृत्ति. हेंच नांव.)

२ अ एकक्याण्णव कलमी (वाकसकर पृ. १२४)

"दर्यासारंग व दौलतखान यांसि आरमारचा सुभा सांगितला."

"त्यांजबरोबर दर्यासारंग व दौलतखान व मायाजी भाटकर आरमारसुद्धा दिले." (साने—काव्ये. सं.—मराठी साम्राज्याची छोटी बखर)

२ आ एक्याण्णव कलमी (साने—का. सं. म. सा. छो. ब.; वाकसकर पृ. १५१)

"दौलतखान व दर्या व सारंग व मायनाईक भंडारी यांजकडे आरमारचा सुभा होता."

३ अ तारीखे शिवाजी—जदुनाथ सरकारकृत भाषांतर*

"Shiva dispatched Daria Sarang (= Admiral of the Sea) and Doulatkhan to the fleet and built ghurabs and gullivats...." (कंसांतील मखलाशी अर्थात् बाबू मजकूर यांची आहे.)

*Modern Review 1907 & 1910 (वाकसकर पृ. १२७ व १२८)

"......he deputed Daria Sarang, Doulatkhan and Mokaji Bhatkar (? Minaik Bhandari) with the fleet."

३ आ तारीखे शिवाजी (सरकार-वाकसकर पृ. १५२)

"Daulatkhan and Dariya Sarang were engaged in building the fort of Khanderi..."

४ चिटणीस—सप्तप्रकरणात्मक श्रीशिवछत्रपतिमहाराज यांचें चरित्र, कीर्तने १८९४ दु. आ. पृ. ६७

"त्याजवर सरदार दर्यासागर व मायनाक भंडारी वगैरे यांसि सुभेदारी देऊन तोफा वगैरे सामान दर्यावर्दी केले" (साने संपादित—आवृत्ति १९२४ मध्यें या-प्रमाणेंच आहे)

५ राजवाडे खंड ८ ले. ३१

"दौलतखान व दरियासारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत पेशवे यांणी वराता सुभे मजकुरावरी दिधल्या" (१८ जानेवारी १६७५ खमस सबैन अलफ छ २ जिलकाद)

६ जदुनाथ सरकार—शिवाजी चरित्र (चौथी आ. १९४८) पृ. २४७

"They were formed into two Squadrons and commanded by two admirals who bore the *titles* of Daria Sarang and Mai Nayak"

(टीप—Doulatkhan was an officer distinct from the Daria Sarang—Rajwade VIII 27 and 91 Q. B. 74)

या चरित्राच्या १९१९ च्या पहिल्या आवृत्तींत पृ. २३६ वर वरील वाक्य आलें आहे. पण त्यांत Daria Sarang च्या पुढें कंसांत (Sea Captain) and Mai Nayak च्या पुढें कंसांत (water leaders) असे शब्द आहेत; आणि तळटीपेंत पुढील मजकूर आहे :—

Daria is Persian for ocean and Maa is Arabic for water. Sabhasad, 68, speaks of Daria Sarang as a Musalman and Mai Nayak as a Hindu of the Bhandari caste. आणि यानंतर २१ नोव्हेंबर १६७० च्या मुंबई-इंग्रजी पत्रांतील Ventgee Sarangee चा उल्लेख दिला आहे.

७ Hobson Jobson :—

Serang-a native boatswain ...मूळ Persian Sarhang : "a commander or overseer."

1599—Carletti, Viaggi, ii 206

"...but manned by sailors, who are Arabs, Turks, Indians and Bengalis, who serve for so much a month and provide themselves under the direction and command of a chief of their own whom they call the Saranghi, who also belongs to one of these nations, whom they understand, and recognise and obey, carrying out the orders that the Portuguese Captain... may give to the said Saranghi."

८ **Grant Duff**--A History of the Marathas.

(Edited by Edwardes 1921) Page 148

"He gave the command of his fleet to two persons named Dureea Sagur and Mynak Bundaree..."

Foot note by Editor--Darya Sarang i. e. Sea-Commander was probably the correct title of this sea-captain. (Refers to Sarcar's Shivaji 1919)

९ **English Records on Shivaji.**

Vol. I-137, p. 118 : Gerald Aungier to Randolph Taylor, Swally, dated, 1 Nov. 1667

"...the President bids me write you that, if you will venture the ill consequences of it, he is willing to grant a pass, but then desires it may run in Silimnaik's name and not in Durreall Sarungs or any person related to Sevagee."

सिलिम नाइकाला मित्र समजून व्यवहार उलगडतो का पहाण्याविषयीं मजकूर आहे. नाहींतर शिवाजीच्या बंदरावर सूड उगवूं वगैरे भाषा आहे.

Vol. I-238, p. 179 :

Bombay to Surat, dated 21 November 1670

"The General and Admiral of the fleete which consists of 160 small vassells, counted by my owne servant (who I sent as a spie) is one Ventgee Sarungee, commonly called Durrea Sarungee, with whom I having had a corespondence these 7 or 8 years, and always found him real and oblidgeing, I was resolved to try if I could gett out any thing of his designe, soe wrote him a civill letter ......

The Sarungee likewise told him that if the Christians did not attempt to hinder his designe, his master would not medle with them."

vol. I–481, p. 365 :

Henry Oxinden to Bombay, dated Rairy Gurr 30 May 1674

"This morning I sent Naran Sinay to our Procurator Naragee Punditt to know...and the restoring the vessell belong-ging to our Broach broker, taken by Deria Sarang and now in Caraptan."

Vol. II–310, p. 169 : Bombay to the Company, dated 23 July 1678

"Wee have been for severall days hottly allarummed that Sevagee Rajah had certaine intention to attempt the burnning the Siddys Fleete at Mazagaon,...to which purpose he some months since sent for Daoulat Caun and Deria Sarung, both Generalls of his Fleete at sea and after having praised them their good services, and given them severall Tushereiffs..."

Vol. II–341, p. 169 : Rajapore to Surat, dated 6 Nov. 1678

"Deria Saranga and his sonn are both taken prisoners by the Rajah's order."

---

८ जनार्दन बाजीराव पेशवे व सगुणाबाई*

(श्री. य. न. केळकर, पुणें)

थोरल्या बाजीराव साहेबांना एकूण चार पुत्र झाले. ते अनुक्रमें नानासाहेब, रामचंद्र, राघोबा, व जनार्दन. पैकीं रामचंद्र व जनार्दन अल्पवयांतच वारले. रामचंद्राचा जन्म १७२३ सालीं झाला. व दहा वर्षांचा होऊन तो १७३३ सालीं वारला. जनार्दनाचा जन्म १० जुलै १७३५ रोजीं झाला व तो २१ सप्टेंबर १७४९ रोजीं वारला. म्हणजे मृत्युसमयीं तो चौदा वर्षांचा होता.

या दोन पेशवे-पुत्रांपैकीं जनार्दनाचें चरित्र या लेखांत सांगावयाचें आहे. मराठी शाहिरांच्या पोवाड्यांतून रामचंद्राची दखल घेतली गेलेली नाहीं. परंतु जनार्दनपंताचा उल्लेख प्रभाकर शाहिरानें केलेला सांपडतो. पेशवे कुटुंबाचें नांवनिशीवार संक्षिप्त वृत्त सांगणाऱ्या प्रभाकराच्या "जगदीश्वर कोपला गोष्ट झाली खरीच निरूपायी। म्हणून एकाएकीं सर्व बुडाली ब्राह्मणबाच्छाई।" या पोवाड्यांत असा उल्लेख आहे :—"सूळ

* पाक्षिक सभा १०, श. १८८५ (इ. १९६३)

बाळाजी विश्वनाथ, सुत त्यांचे बाजीराव। नांव केलें आपानीं लढविले वसईस उमराव ॥ राव बाजीचे पुत्र प्रभु बाळाजी बाजीराव। कनिष्ठ दादा त्याहुन धाकटे जनार्दनराव " ॥

नानासाहेब पेशव्याचा जन्म १२ डिसेंबर १७२१ रोजीं झाला. म्हणजे तो रामचंद्राहून दीड दोन वर्षांनीं मोठा होता, तर राघोबा व जनार्दनबाबा यांच्याहून तो चौदा पंधरा वर्षांनी मोठा होता. म्हणजेच तो जवळ जवळ त्यांना त्यांच्या पित्यासारखाच होता. आणि खरोखरीच पित्याप्रमाणेंच त्यानें राघोबा व जनार्दनबाबा यांचें लालनपालन व शिक्षण अतिशय आस्थापूर्वक केलें.

जनार्दनपंताचा जन्म १० जुलै १७३५ रोजीं पुणें येथें झाला. त्याच्या जन्मासंबंधीं व बारशासंबंधीं पेशवे रोजकिर्दीत दोन नोंदी अशा सांपडतात :—

१. सीत सलासीन छ १० रबिलावल (ता. २०-७-१७३५.).

खर्च रु. ८= पुत्र उछाह खर्च देणे परटिणीस दाहा दिवसांची पांघरुणे धुवावयास टाकिली त्यास दक्षणा.

२. सीत सलासीन छ ११ रबिलावल (ता. २१-७-१७३५.).

खर्च रु. २८ राजश्री जनार्दनपंतास चिंदल्यास मोहरा२.

रु. १७७९ पुत्र उछाह खर्च.

म्हणजे बारशाच्या दिवशीं दोन सोन्याच्या मोहरा मोडून त्याच्या बिंदल्या करून जनार्दनाच्या हातांत घातल्या त्याला २८ रुपये खर्च आला व बारशाच्या समारंभास एकूण १७७९ रुपये खर्च करण्यांत आला.

जनार्दनाचें उष्टावण १९ डिसेंबर १७३५ रोजीं झालें. सामान्यतः मूल एक वर्षाचें झाल्यानंतर उष्टावण करण्याची रीत आहे. पण जनार्दनबाबाचें तें पांचव्या महिन्यांतच केलेंसें दिसतें (राजवाडे ४ पृ. १७७).

जनार्दन दोन वर्षांचा झाल्यानंतर त्याचें चौलकर्म म्हणजे झुलपें राखण्याचा समारंभ २६ नोव्हेंबर १७३७ रोजीं झाला. त्याबद्दल जिवाजी न्हाव्याला एक रुपया देणगी देण्यांत आली त्या संबंधीची अस्सल नोंद अशी— " खर्च पोतापैकीं १ रु. देहनगी देणें जिवाजी न्हावी. रा. जनार्दनपंताचे चेऊल केले सबब " (पे. द. भा. ३० पृ. ३५१).

जनार्दनपंताचा व्रतबंध म्हणजे मुंज २६ मार्च १७४० रोजीं झाली. त्यासंबंधी राजवाडे खंड ६ पृ. ३२ वरील पुरंदरेस्मरणांत अशी नोंद आहे :—

" चैत्र शु. १० बुधवारी रा. बाजीराव पंतप्रधान यांचा तिसरा पुत्र जनार्दन याचा व्रतबंध झाला रा. बाळाजी बाजीराव यांनीच लग्न केले. ती घटका लग्न लागले असे." (येथें लग्न याचा अर्थ मुहूर्त.)

बाजीरावसाहेब उत्तरेस स्वारीस निघून गेले होते म्हणून नानासाहेबानेंच जनार्दनाची मुंज लावली. मुंजींत मुंजाच्या मातृभोजनासाठीं आई अवश्य लागते. अर्थात् काशीबाई या वेळीं पुण्यासच होती. मात्र मुंज लागल्यानंतर काशीबाईची रवानगी जनार्दनबाबासह बाजीरावसाहेबांकडे करून देण्यांत आली.

परंतु दुर्दैवानें बाजीरावसाहेब स्वारींतच एकाएकीं ज्वराची व्यथा होऊन रावेरखेडी येथें २८ एप्रिल १७४० रोजीं वारले. अर्थात् तेथील क्रियाकर्मांतर छोट्या जनार्दनपंतालाच उरकणें भाग पडलें. त्यासंबंधीं पेशवे रोजकिर्दीतील एक नोंद अशी— "ता. ४ मे १७४० (१८ सफर) देणें क्रियेस धोत्र रा. जनार्दनपंतास पांघरावयासि सेला धुवट हात ९ येकूण सणंग ·।· रु. २॥" (पे. द. २२ पृ. ८९).

बाजीरावसाहेब तिकडे वारले त्या वेळीं थोरले पुत्र नानासाहेब व बंधु चिमाजी आपा हे पुण्यास नव्हते. त्या वेळीं ते कोंकणांत मानाजी आंग्र्याच्या साहाय्यास गेले होते. त्यांना कुलाबा मुक्कामीं वैशाख वा ५ मीस ती वार्ता कळली. त्यानंतर तेथेंच आवश्यक ते क्रियाकर्मांतराचे विधि उरकून ते २६ मे १७४० रोजीं पुण्यास परत आले. त्यानंतर काशीबाई बाजीरावांच्या लष्कराबरोबर पुण्यास येण्यास निघाली होती ती ३ जून रोजीं पुण्यास दाखल झाली.

बाजीरावसाहेबांच्या आजारांत जे दैवी मानवी उपाय रावेरखेडी येथे करण्यांत आले त्यांचा कांहीं तपशील पेशवे रोजकिर्दीतील नोंदींवरून कळतो तो असा—

७ सफर (२३ एप्रील) उत्कुंभ दानासाठीं धर्मादाय रुा २५ खर्च.

८ सफर (२४ एप्रील) धर्मादाय कुंभ २ खर्च रुा २४.

१० सफर (२६ एप्रील) १२ रु. रायास ओवाळून ठेवावयास मोहोर १.

११ सफर (२७ एप्रील) मृत्यंजयाचा जप श्रीमाहादेवाची सोन्याची प्रतिमा करून केला. खर्च रु. १४ त्याच दिवशीं वाड्यांत महिशीदान, बलेशदानें केली त्यास खर्च रु. १६०.

१२ सफर वैशाख शुा १३ सोमवार मुा रावेर रा. रायास कैलासवास झाला ते वेळीं मुखांत घालावयासी सोने मासा ८८८८१ (पे. द. २२, पृ. ८८-८९).

छ २२ सफर आबैन ९१३१।≈ देणें धर्मादाय रा राऊ यास देवआज्ञा जाली त्याचे क्रियेस अकरावे दिवसी.

त्यांचेकरता मृत्यंजयाचा जप केला होता त्यास १८० रु. खर्च आला. व्यंकटेशाचें अनुष्ठानहि केलें होतें.

छ २८ सफर आबैन ४२१ खर्च पोता.

रा राऊ यांच्या अस्थी कासीस पाठविल्या त्यास दिल्हे (पुढे तपसील) बेंकाजी संभाजी व महादजी नारायण कुंटे यांचेबरोबर त्यांना अनुक्रमें २०६ व २१५ रु. दिल्हे (अप्रसिद्ध).

१७४१ सालीं जनार्दन पंतास देवीचा आजार येऊन गेला (पे. द. भा. २२ पृ.९१).

२० एप्रिल १७४४ रोजी जनार्दनपंताचें लग्न झालें. वय अर्थात् नऊ वर्षे. अंतोबा नाईक भिडे म्हणून सावकार होते, त्यांच्या मुलीशीं लग्न झालें. लग्नानंतर मुलीचें सासरचें नांव सगुणाबाई असें ठेवण्यांत आलें. सगुणाबाई लग्नाचे वेळीं बहुधा पांच सहा वर्षांचीच असणार ! जनार्दनपंताचे लग्नासंबंधी तीन नोंदींत तीन प्रकार लिहिले आहेत. राजवाडे खंड ४ पृष्ठ १७७ वरील नोंदींत रामाजी नाईक भिडे यांच्या कन्येशीं लग्न झालें असें म्हटलें आहे. तर काव्येतिहाससंग्रह पृष्ठ ४८२ वरील वंशावळींत " जनोबा उर्फ बाबासाहेब यास बायको नारोबा नाईक भिडे यांची बहीण " असें म्हटलें आहे. तर अन्यत्र " अंताजी नाईक भिड्याच्या मुलीशीं " असें म्हटलें आहे. आमच्या मतें अंताजी नाईकाच्या मुलीशींच लग्न झालें. याला आधारहि आहे. पे. द. भा. २२ पृष्ठ १०८ (पे. रोजकिर्द खंड) यांत एका नोंदींत स्पष्टपणें " बाळाजी नाईक भिडे व नारोबा नाईक भिडे सगुणाबाईचे बंधू " असा उल्लेख आहे.

पेशव्यांच्या सोयरिका बऱ्हंशीं मातबर सावकार कुळांशीं झाल्या. प्रभाकर शाहिरानें पोवाड्यांत म्हटलें आहे—" विपुल त्या रास्तयाच्या घरीं आजवर संतत संपती । इचलकरंजिकर बारामतिकर सोयऱ्यांत धनपती ॥ चा. पहा कृष्णराव चास्कर साजणी ॥ कोंकणचे कोल्हटकर साजणी ॥ महशूर सोलापुरकर साजणी ॥ चा. पहिली ॥ दिक्षित-पेठे-साठे-ओक-ओंकार सभाग्यामधीं । फाटक-थत्ते-बर्वे-देवधर-पेंडशांची रीत सुधी ॥ १ ॥"

यांत भिड्यांचाच तेवढा उल्लेख नेमका गळला आहे. असो. अंताजीनाईक हा प्रथम साताऱ्यास सावकारी करीत असे, नंतर पेशव्यांच्या बरोबर स्वारींत जाऊन संपन्न झाला व पुढे पुण्यासच स्थायिक झाला. पुण्याच्या मुहियाबाद उर्फ बुधवार पेठेची कमाविशी त्याला १२ नोव्हेंबर १७३६ रोजीं मिळाली (पे. द. भा. २२ पृ. १७७). १७४१ च्या डिसेंबरांत शाहूनें त्याला पेशव्याची पोतदारी व पालखीचा मान दिला. तो. ९ जानेवारी १७४२ रोजीं वारला. त्याला मुलगे दोन-एक रामाजी व दुसरा बाळाजी. परंतु वर सांगितल्याप्रमाणें तिसरा नारोबानाईक हाहि एक असला पाहिजे. बाळाजीनाईक भिडे यांची बाग भवानी पेठेच्या उत्तरेच्या अंगास होती (पुणें नगर संशोधन वृत्त, खंड २ पृ. २२७). नारोबानाईक भिडे पोतदार याची नोंद १७५६-५७ नांत खाजगी कडील कारकुनांच्या तैनाता या सदरांत आली आहे. तींत "नारोबानाईक भिडे पोतदार तैनात २५० रुपये व कापड २० " असें म्हटलें आहे (पे. द. भा. ४० पृ. ८७).

नानासाहेब पेशव्यांना १॥ कोट रुपयांचें कर्ज होतें. त्यापैकी ४५ लक्ष एकट्या भिड्यांचें होतें.

लग्नाच्या समारंभासंबंधीं तपशिलवार माहिती कांहींच उपलब्ध नाहीं. फक्त एक भाऊसाहेब पेशव्यांचें पत्र आहे तें असें:—

श्री [१६-३-१७४४]

राजमान्य राजश्री चिंतो अनंत कमावीसदार पाा धुळकोट सोरेगाऊ गोसावी यांसी सेवक सदाशिव चिमणाजी नमस्कार * * * (सु) हूर सन आर्बा आर्बैन मया अलफ चिरंजीव राजश्री जनार्दनपंत यांचें लग्न वैशाख मासीं आहे. तरी गंगेरी पानें सुमार५०००० पनास हजार, बैलावरी घालून बाा माणसे देऊन मार्गीं निगेनिसी वैशाख शुद्ध प्रतिपदेस पुण्यास येऊन पोहचत, यैसी पाठऊन देणे. या कामास सुस्ती जालिया मुलाहिजा होणार नाहीं हे पष्ट जाणोन लिहिल्याप्रमाणे पाने येथे पावत ते करणें जाणिजे छ १२ सफर. (पे. द. १८ ले ४८).

राघोबादादा व जनार्दनपंत यांच्या शिक्षणाची खास व्यवस्था पंतोजी वा गुरुजी ठेवून करण्यांत आली होती. श्रीमंतांच्या घरीं शिकणाऱ्या मुलांच्या बरोबर दुसऱ्या दोन चार गरीब मुलांनाहि त्यांचे जोडीदार म्हणून ठेवण्याची प्रथा असते. अशी राघोबादादा व जनार्दन यांबाबतहि अनुसरली गेली होतीच. तालीम, मर्दानी खेळ सरकारच्या आश्रित जेठीकडून त्यांना शिकविले जात. पण तत्कालीन खरें शिक्षण प्रत्यक्ष अनुभवांतूनच मिळे. हीं पेशव्यांचीं मुलें सदा त्यांच्याबरोबर असत. यामुळें दरबारी चालरीत, कारभार करण्याची पद्धत, त्यांत होणारीं खलबतें, इत्यादिकांचा त्यांना निकट परिचय लहानपणापासूनच होई व अल्पवयांतच ते जबाबदारीचीं कामें उरकण्याइतके लायक बनत. बाळाजी विश्वनाथाचे कारकीर्दीत अल्पवयापासून थोरले बाजीरावांना छत्रपतीच्या दरबारांतील आखाडा परिचित होता. हीच गोष्ट नानासाहेबांची. राघोबादादा व जनार्दनबाबा यांनाहि साताऱ्यास राहून पुरंदऱ्यांबरोबर शाहूमहाराजांच्या दरबारांत आणि खाजगी खलबतांत बसण्याची संधि नेहमीं प्राप्त होत असे.

असो, राघोबादादा व जनार्दनबाबा यांच्या शिक्षणाबाबत नानासाहेब कशी दक्षता घेत यासंबंधींची हीं पुढील दोन पत्रें मोठीं उद्बोधक आहेत. पहिलें पत्र नानासाहेबांनीं राघोबाला एका स्वारींतून लिहिलें आहे. तें असें—“ येथून जातेसमयीं जें सुचलें तें तुम्हांस सांगितलें आहे, त्याचें निरंतर स्मरण मनांत असूं देणें. रघुवंश, विदुरनीति, चाणक्य व जें तुम्हांस येत असेल, त्याची नेमपूर्वक चिंतनिका करून थोडेंबहुत शास्त्री यांजवळ नित्य म्हणत जाणें. विराटपर्वापासून पुढे भारत रिकामपणीं वाचीत जाणें. केवळ घोडीं फेरावयाचे छंदास न लागणें. वजनी, कैली, बेरीज करावयाचा सराव बहुत करणें. चिरंजीव भाऊची मर्जी बहुतप्रकारें रक्षण करीत जाणें. घोडीं वेगळीं बांधीत न जाणें. क्षुद्र मनुष्याशीं सहवास कोणी प्रकारेंहि न करणें. मातुश्रीबाई (आजी), ताई

(काशीताई), अनुबाई (आते) याशीं एक दो दिवशीं अर्ध घटकाभर जाऊन बसत जाणें. शरीर प्रकृत नीट नाहीं यास्तव औषध कांहीं नेमेंकरून घेत जाणें. भाऊसमागमें घोडीं फेरावयास जात जाणें. सातारियास जर जावयाची आज्ञा केली, तर चिमणगिरी गंगाधरभटास, भाऊजवळ विनंती करून, बरोबर दिल्हे तर घेऊन जाणें. सातारियास गेल्यावर दोनहि बाईकडे (शाहूच्या राण्या) विना बोलाविल्यावांचून अथवा गोविंदराव यांनीं आपण सांगितल्यावांचून न जाणें. कालानुरूप वयास उचित योग्य वेष करीत असावें. देवपूजा थोडी परंतु एकांती, न बोलतां करीत जाणे. इतकेहि नेमेकरून करावें. आणि गर्व न करावा. निरंतर साधनवृत्तीनें वडिलांची आज्ञा प्रसन्नतेनें मानावी. सावध वर्तावें. सर्व जें मनेंकरून समजेल तें समजावें. वडिलांची मर्जी उत्तम असलिया पुसावें. शिष्यधर्मे असलिया उपयोग आहे. चिरंजीव जनार्दन बहुत कामहि करून पढतात. ते हरएक गोष्टींत अधिक जाहल्यास तुम्ही त्यास मान्यपुरुष कसे व्हाल ? (राजवाडे खंड १ पृ. ९६ टीप)

जनार्दनपंत राघोबापेक्षां लहान पण तो " तुमच्यापुढें जाईल " असें ईर्षा आणण्यासाठीं नानासाहेबांनीं राघोबास हिणविलें आहे.

राघोबादादा वृत्तीनें हूड आणि छांदस. जनार्दनबाबाहि मनस्वीपणांत कांहीं कमी नव्हता. त्याला बाळकृष्णशास्त्री नांवाचे एक गुरुजी पढवावयास ठेविले होते. किती केलें तरी हीं श्रीमंतांचींच पोरें. अशांना शिकवितांना गुरूलाच लघुत्व स्वीकारण्याचा प्रसंग असतो. तथापि एकदां बाळशास्त्र्याला राहवेचना. कारण जनार्दनबाबा नीट पढेना, भलतीकडे पाही, मध्येंच बोले, म्हणून त्याला त्यानें कांहीं शिक्षा केली व रागें भरला. त्याबरोबर जनार्दनानें डोक्यांत राख घातली व या गुरुजीजवळ मी शिकणारच नाहीं, जेवायला घातलें नाहींत तरी चालेल, असा संप पुकारला. गुरुशिष्यांतला हा झगडा बाबूराव राम फडणिसानें नानासाहेबांच्या कानांवर घातला. तेव्हां त्यानें जें कान-उघाडणीचें पत्र लिहिलें तें आम्हांस नवीनच उपलब्ध झालें आहे. सर्वसत्तासंपन्न असतांहि शिष्यानें शिक्षकाची मर्यादा किती आदरपूर्वक संभाळावी याविषयीं त्याचा कटाक्ष पाहण्यासारखा आहे. आधुनिक काळचा विद्यार्थी–शिक्षकसंबंध लक्षांत घेतां तर तो फारच उठून दिसतो. पत्र असें—

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूराव राम स्वामी गोसावी यांसी पो बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी चिरंजीव राजश्री जनार्दन याणीं आम्हांस पत्र लिहिले कीं " आमच्यानें पढवत नाहीं, अन्न घाल तर घ्या " म्हणोन रागें करून लिहिले. ऐसियास याप्रकारें ल्याहावयास कारण काय जाहालें तें सविस्तर मनास आणून लिहिणें. भीड न धरणे. या दिवसामधे याणीं या प्रकारें आम्हांस लिहावें तस्मात् आम्हीं

कोणी सिक्षेची शिकवणूकच न ल्याहावी असा सिद्धांत जाहाला असा दिसतो. तर तुम्हीं त्यास एकांती दोघांस घेऊन बसून साफ पुसणें कीं आम्ही लिहिण्या पढण्या बोलण्याविसीं न ल्याहावें, त्यांचे मनास येईल तें त्याणी करावें, ऐसाच सिद्धांत करून उत्तर पाठविणें. (म्हणजे) आम्ही सर्व सोडून देऊं उगच बसूं. जे त्याचे प्राक्तनीं असेल तें होईल. जर आमचे सिकणें ऐकणें आहे तर आपले मनांत येईल बरें वाईट येकीकडे ठेवून सिष्यपणे चाकरपणे राहावे जे सांगू ते त्याप्रमाणे करावे विस्तार याचा काय ल्याहावा ? कलयुग प्रधान असे हे विनंती.

बाळकृष्णशास्त्री, नीट पढत नाहींत, भलतीकडे पाहातात, मधें बोलतात, येकाग्रचित्त करीत नाहीं, यास्तव रागें भरले. यास्तव वियेचा त्याग करावा असे नाहीं. गुरु आहेत. त्याणीं रागें भरलें पाहिजे. कोणीहि काम येकचित्त करून केलियावांचून सहसा होत नाहीं. येखादे समयीं त्याणी शासन केले तरी सोसून गुरुमर्यादापूर्वक जो सिष्य सहन करतो तोच महापात्र होतो. तुम्हींहि जाणता हे सिष्य होत्साते रागे भरूं लागले तेव्हां त्याणी त्यास सिकवणें उचित नव्हे. विस्तार काय लिहिणें. (अप्रसिद्ध)

अभ्यासाप्रमाणेच क्रीडादिकांच्याहि सर्व सोयी राघोबा-जनार्दनांना नानासाहेबांनीं उपलब्ध करून दिल्या होत्या. नानासाहेबांच्या पदरीं अनेक मल्ल आणि जेठी बाळगलेले असत. त्यांच्या चुरशीच्या कुस्त्याहि दरसाल लावण्यांत येत. नानासाहेबांच्या पदरीं एक मोकाशी नांवाचा ब्राह्मण मल्ल होता. त्यानें तर शाहू महाराजांच्या समोर एका पहिलवानास कुस्तींत जीवें मारल्याचें एक पत्र पेशवे दप्तरांत छापलें आहे. अशा मल्लांपैकीं एकेका मल्लाची बाजू घेऊन राघोबा व जनार्दन यांनीं मल्लांमल्लांच्या झोंब्या लावून हारजित करावी, त्यावर पैजा लावाव्या, असें नेहमीं घडे. त्यासंबंधांत राघोबानें लिहिलेलें २-२-१७४९ चें हें पत्र पाहा—

श्रीशंकर

चिरंजीव राजश्री जनार्दनपंत यासी रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष. तुम्हीं पत्र पाठविले ते पावले. खंडाईत घोडा फेरला. आम्हीं दुरून वर्तमान आइकतो. तुम्हीं आम्हांस न लिहिलें म्हणोन सविस्तर लिहिले. त्यास खंडाईत फेरला व अरास पळवला देखील. मीहि याचसाठी न लिहिले. येथें नाना म्हणतील कीं फुशारकीच्या गोष्टी लिहितात. यास्तवच न लिहिले. तुम्ही लिहिला तो भाव यथार्थच आहे. वरकड सिकारीचे वगैरे मजकूर भेटीनंतर सांगूं. ल्याहावेसे नाहींत. बहुत काय लिहिणे ? महंमद हुसेन याची व ढोल्याची झोंबी लावावी. आज नानापासी मी बोललो कीं महंमद हुसेन पाडील. त्यास तीर्थरूप राजश्री भाऊस सांगून झोंबी लाऊन कोण पाडतो कसे होते ते सविस्तर ल्याहावें. सत्वर झोंबी लाववावी. तीर्थरूपांस कागद वाचून दाखवून लवकर लाऊन कसे होते ते लिहिणें. जाणिजे छ २४ सफर हे आशीर्वाद (पे. द. १८, ले. ५५).

राघोबा व जनोबा जोडीनें असत. तथापि त्यांच्यांतहि हेवेदावे चालत. राघोबाचे ज़िवलग मित्र नाना पुरंदरे. त्याला राघोबा २९ ऑगस्ट १७४८ च्या पत्रांत लिहितो— " आज आम्ही येथें थेवरास चतुर्थी करून जाऊं. उद्या ४ आहे. काल आलो. आज कांही होम जाहला. उद्या साहा ६ तुला होतील. येक सोन्याची, एक कथलाची वगैरे ६ तुला करितील, आणि दुसरे दिवशी जातील. तुम्हीं जनार्दनपंतासी स्नेह फार राखीत न जाणे कां कीं येके दिवसी फारच कृपा करितील, येके दिवसी तोंडावर मारितील. यासाठी कच्चा मनसुबा न करणे हे आशीर्वाद " (पुरंदरे दप्तर भा. ३ पृ. १७१).

राघोबा स्वभावानेंच विषयी व छांदस. लहानपणापासूनच विषय सेवन करीत असे. प्रकृतीची नेहमींच कांहीतरी कटकट. नानासाहेबांनीं वैद्याकडून औषध चालू केलें तरी कुपथ्य करावयाचा. यासंबंधीं पुरंदरे दप्तर भा. ३ ले. १९० फार मनोरंजक आहे. राघोबाला कांहींतरी विकार झाला होता, तेव्हां वैद्यानें दोन पथ्यें सांगितलीं होतीं— एक स्त्रीकडे न जाणें, दुसरें मक्याचीं कणसें न खाणें. पण हीं दोन्हीं कुपथ्यें राघोबानें केलीं. तेव्हां नानासाहेबांची व त्यांची बरीच बोलाचाली झाली. तो सारा मजकूर राघोबानें आपला परम मित्र त्रिंबक सदासिव उर्फ नाना पुरंदरे यास एका खाजगी पत्रांत कळविला. त्याच्या अखेरीस तो वैतागानें लिहितो " तीर्थरूपाच्या मनांत पथ्य करावयाचेच परंतु आम्हीच आपले हिकडे तिकडे करतो. बाहेरील मजकूर लिहावासा नाहीं. आम्ही बरे आहोंत, साऱ्या गोष्टी ठीकच होत आहेत. वरकड मजकूर जनार्दनपंत लिहितातच, मजला फारसे सुचत नाहींत "

राघोबा व जनार्दनबाबा हे चौदा व बारा वर्षांचे इतके लहान असतांहि त्यांना राजकारणी मनसुब्यांतहि केवढें कळत असे हें पाहिलें म्हणजे आज आश्चर्य वाटेल. पु. द. भा. १ मधें ले. १५८ व १५९ हे त्या दृष्टीनें मननीय आहेत.

नानासाहेब मोठमोठ्या मनसुब्याचे वेळींहि या मुलांना स्वतःबरोबर खलबतांत घेत. जन्मापासून लष्करांत फिरण्याचीहि त्यांना सवय. यामुळें बाळाभ्यासानें पेशव्यांचीं हीं मुलें अल्पवयांतच प्रत्यक्ष कारभार हाकणारीं होत यांत नवल नाहीं. १७४८ च्या एका पत्रांत राघोबा लिहितो, " यानंतर तीर्थरूप व भाऊ व आम्ही दोघे वगैरे सारे बसलो होतो, दरबार होता त्यावर नाना व भाऊ व धोंडोबा व मामा व आम्ही व जनार्दन ऐसे एकांतास गेलो. त्यावर आम्हां साऱ्यांस प्रश्न केले, त्याची याद व विल्हेवार उत्तरें लिहिलीं आहेत त्यावरून कळेल. मामास म्हणाले कीं तुम्ही शाहाणे आहां आणि सर्व झाले होणार प्रकृत सर्व ठाऊक आहे, तर बोला. तेव्हा मामा वगैरे सारे बोलले कीं, विचारून सांगून. त्यावर आम्हीं म्हटलें कीं आम्हांस येक सेखचीलीसी युक्त सुचली आहे. तरी काय ती सांगा म्हणाले. सर्व आइकत होते. त्यावर आम्हीं उत्तरें दिलीं."

नानासाहेबांचे प्रश्न असे होते—

(१) आम्हांस (नानासाहेबांस) कर्ज झालें. व

(२) राजाच्या कर्जाबद्दल रुपये द्यावे लागतात.

(३) रघोजी भोसल्याला कर्नाटकचा सुभा मिळणार तेव्हां त्याच्या तेजाचें अवर्धन कसें करावें ?

(४) पैका मिळाला पाहिजे.

(५) माळव्यांतीलहि खंडणी उगवली पाहिजे.

या प्रश्नांना राघोबादादानें (या वेळीं तो अवघा ११ वर्षांचा होता.) पुढीलप्रमाणें उपाययोजना सांगितली :—

(१) पावसाळा झाल्यानंतर तुम्हीं उत्तरेंत फौज पाठवून रघोजीच्या पुत्रास तंबी द्यावी आणि मारावा, येणेंकरून रघोजीचा पराभव दिसेल.

(२) बादशाहानें तुम्हांला तीस लाख रुपये देऊं केले आहेत, त्यांतून तुम्हीं स्वतःचें कांहीं व शाहूचें कांहीं कर्ज वारावें. माळव्यांत फौज पाठवून तेथें मेहनत करून पैका मिळवावा.

(३) मल्हारबा व राणबा येके जागा राहात नाहींत यास कसें करावें असें नानासाहेब म्हणाले. त्यावर राघोबानें म्हटलें कीं, मल्हारबाबा माळव्यांत पाठवूं नयेत आणिक (निराळी) दाहा हजार फौज पाठवावी. त्यावरून तीर्थरूप म्हणाले कीं तुमची सारी फौज किती ? राघोबानें उत्तर केलें कीं, चालीस हजार, पसतीस हजार याप्रमाणें दोघांचा सालजाब.

(४) कोंकणांत जेंजिरा घ्यावयाचें चितांत आहे व तिकडे पहावयाचें चितांत आहे आणि तिकडे सावंत वगैरे जबरदस्त जाहाले आहेत त्याचें कैसें ? असें नानासाहेब म्हणाले. त्यावर राघोबानें म्हटलें कीं, ‘ आपण पाचा हजार फौजेनिसीं तिकडे जावें सुखरुप बंदोबस्त करावा दुसरे राष्ट्र घ्यावयाची इच्छा धरू नये याकाली. ’

(५) ‘ राज्यास कांहीं तूर्त दिल्हे पाहिजे ’ असें नानासाहेब म्हणाले. त्यावर राघोबा म्हणाला कीं, ‘राज्यास तूर्त पाच लाख रुपये द्यावे पुढे ते रुपये आलेयावर द्यावे’ त्यावरून नानासाहेब म्हणाले कीं, ‘ राजा कसा आइकतो ? ’ राघोबा म्हणाला कीं, ‘ असे उत्तर द्यावे कीं पंचवीस लाख आम्हांस तुम्हीं घरी बसविल्यानें कर्ज झालें असे सालकोजी मालकाजी करून करावे. ’

येकूण फौज पंधरा हजाराची वाटली बाकी वीस हजार राहिली ती राघोबा म्हणाले ‘ रघोजीवर कर्नाटकात पाठवावी भाऊबराबर ’ तेव्हां नानासाहेब म्हणाले कीं, ‘ राजा आम्हास कसा कर्नाटकात जाऊ देईल ? ’ राघोबा म्हणाला कीं, ‘ याची तोड उतमसी

दिसत नाहीं. पाच सात तोडी आहेत परंतु त्या साधतील न साधतील हें न कले.' 'त्या कोण कोणत्या ?' तर राघोबा म्हणाला राज्यापासून मागून घ्यावे अथवा नवाबापासून येकदा सुभा सजावा आथवा उगेच जावे, असे उदंड आहे. पर कसे आहे ? परंतु रघोजीचा लेक मारिला म्हणजे सहजच तो वाकेल येकायेकी तो कांहीं कोणाचे राज्य मोडवणार नाहीं.' तर नानासाहेब म्हणाले कीं, 'रघोजीच्या लेकाने अलाबिर्दीस मोडिले आणि पैका वसूल जाहाला तर ?' त्यास राघोबा म्हणाला, 'हे होणेच नाहीं. तथापि याणे मोडिले तर आगोधर आता आलाबिर्दीस कागद लेहून पाठवावा कीं "तुम्हास यद्यपी त्याणे जेर केले तथापि पैका न देणे आणि आम्ही दोहो चहू महिन्या येऊन खामखा मोडून टाकूच" असे ल्याहावे म्हणजे ठीक होईल. तिकडे पंधरा हजार पावेतो मल्हारबाबा वाचून फौज पाठवावी म्हणजे ठीक होईल' असी प्रत्युतरें केलीं.

जनार्दनपंताची आजी म्हणजे बाजीरावाच्या मातोश्री राधाबाई यांनीं जनार्दनपंतास लिहिलेलें पुढील पत्र वाचनीय आहे—

पै. छ. २९ जमादिलावल.

"चिरंजीव राजश्री जनार्दनपंत यासी प्रती मातुश्री राधाबाई अनेक आशीर्वाद उपरी. तुम्ही पत्र पाठविले तें पावले. यानंतर आमची इच्छा आहे कीं तुम्हीं घरास लौकर यावे. दूर देशास गेले आहा याजकरितां सौ. गोपिकाबाई येणार यैसे ऐकितो. तरी तुम्हींहि त्याजबरोबर देशास आले पाहिजे" (पे. द. १८ पृ. ५७ ले. ९४).

राधाबाईचें नानासाहेबास पत्र— "चिरंजीव राघोबा व जनोबा यास पुण्यास पाठविणार त्यास आमचे करमणुकेकरितां पाठविणार असला तरी येथें आमची करमणूक होतच आहे अगत्यच पाठविले पाहिजेत ऐसे नाहीं. तशाहिमध्यें तुमचे चित्तांत पाठवावे ऐसे असलें तरी पाठवावे" (पे. द. १८ पृ. ५७ ले. ९५).

जनार्दनपंत १७४९ सालीं सातारा येथें ज्वरानें वारला. त्यासंबंधीं भाऊसाहेब पेशव्यांनीं शंकराजी केशवास लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे कीं "जनार्दनपंतास आठपंधरा दिवस ज्वर येत होता. त्यास एकाएकीं सन्निपात होऊन भाद्रपद बहुल सप्तमी गुरुवारी सा घटिका रात्रीस देवाज्ञा जाहली." त्यासंबंधीं खुद्द नानासाहेबांचें महादोबा पुरंदऱ्यास एक तांतडीचें पत्र असें आहे—

विनंती उपरी कालपासून जानबास वेथा फार आहे, यास्तव बाबा वैद्यास संध्याकाळचे पाठऊन विसोबा वैद्यास आणवावे व राजेश्वर वैद्याकडीलहि मुलीस उतार पडला असला तरी त्यास आणवावे. परिछिन बाबा वैद्यास दो दिवस पाठऊ परंतु नेहमीं वैद्य जवळ असला पाहिजे यास्तव विसोबास व राजेश्वर वैद्यास आणवणे हे विनंती. (सप्टेंबर १७४९, पु. द. भा. १ ले. २२२)

आणखी एक पत्र— [श. १७६१ आश्विन शु. २ ता. २-१०-१७४९]
राजश्रियाविराजित बालाजीबाबा--

सेवक चिंतो कृष्ण कृतानेक सा. नमस्कार वि. वि. ताा छ १ जिल्काद मुकाम सप्तऋषी ×××× श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी श्रीमंत महाराजे छत्रपतीच्या शरीरास समाधान नाहीं म्हणोन सातारियास आले होते. यैसियास येथें आल्यानंतर श्रीमंतांचे धाकटे बंधु जनार्दनपंतबाबाच्या शरिरास नवज्वराची व्यथा जाली तेणेंकरून भाद्रपद वाा ६ (२१ सप्टेंबर १७४९) देव आज्ञा जाली. तेणेंकरून श्रीमंत बहूत श्रमी आहेत. खासगत श्रीमंतांच्या शरिरासही शीतज्वराची (बाधा), बंधु मेल्यानंतर जाली आहे. अद्याप उतार नाहीं. (भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष ९, ले. ४० पृ. ४२).

वरील दोन पत्रांवरून असें दिसतें कीं, १७४९ च्या सप्टेंबरांत शाहू महाराजांचें दुखणें फार वाढलें म्हणून नानासाहेब पेशवे साताऱ्यास गेले होते. तेवढ्यांतच तेथें जनार्दनबाबाला नवज्वराचा ताप येऊं लागला. नानासाहेबांनीं उपचारांची कोशीस फार केली. परंतु इलाज चालला नाहीं. जनार्दनबाबा वारल्यामुळें नानासाहेबांस फार शोक झाला. आणि त्यांतच त्यांनाहि शीतज्वर लागला. असो.

जनार्दनपंताचा मृत्यु असा झाला. परंतु त्याला कोणीतरी मूठ मारली असा तेव्हां प्रवाद होता कीं काय न कळे; कारण प्रभाकरानें सवाई माधवरावाच्या मृत्यूच्या पोवाड्यांत " जनोबास मारुन मूठ काय मिळाले बा याला " असें म्हटलें आहे. प्रभाकराचे इतर चरण असे—

बाळाजी विश्वनाथ तारक सर्वांना मिळाला। रत्नदीप झळझळीत केवळ कुळांत पाजळला ॥ चाल ॥ राधाबाई ती धन्य सती रावबाजी पुत्र प्रसवली। छत्तीस महिने लढुन वसई पुढें आपानीं वसविली ॥ दक्षण साडे सहा सुभ्यांत सरदेशमुखी वसविली ॥ चाल ॥ नानांची कंची वासना नाहिं राहिली। पुरुषार्थ करून दादांनीं अटक पाहिली ॥ भाऊंनीं कुरुक्षेत्रास कुडी वाहिली ॥ चाल पहिली ॥ रणीं जागा विश्वासरायें ती पाहिली निजायाला। जनोबास मारुन मूठ काय मिळालें बा याला ॥

जनार्दन बाबा वारला तेव्हां चौदा वर्षांचा होता व त्याची पत्नी सगुणाबाई तर केवळ दहा वर्षांचें अर्भक होती. तिला लग्नाच्या हळदीचा डाग तेवढा लागला आणि बाकीचें सर्व आयुष्य तिला कठोर संन्यस्त वृत्तींत घालवावें लागलें. पेशव्यांच्या राजकुटुंबांतील ती असल्यामुळें तिच्या वस्त्रापात्राची व योगक्षेमाची तरतूद अर्थातच फार चांगली राखली गेली असेल. तथापि मनुष्यदेहाच्या स्वाभाविक अपेक्षा–आकांक्षांचा होम करून भुकेल्या पोटीं प्रवाहांतून उलटें पोहत जाऊन, अन्नें जीवितयात्रा कशी तरी संपवणें तिला किती अवघड गेलें असेल हें लक्षांत आणलें म्हणजे अशा स्त्रियांबद्दल मनांत खरोखरीच मोठा आदरभाव निर्माण होतो.

होनाजी बाळाची सुप्रसिद्ध गतभर्तृकेची लावणी ही अशा कष्टमय जीविताची मूर्तिमंत प्रतिमाच आहे.

" धनतर माझें गोत आता तें काय असून नुसतें। पतीरत्न हरपल्यावरि नारीस कोण पुसते। अयोग्य झाले जनीं न पाहती मुख माझें नयनीं। कोणीच शकुन घेईना त्यागिले मज सर्वत्रांनीं॥ श्वानापरि हें जिणें जातसे आयुष्य दिन रजनीं। स्वस्थ आता निर्बंध असावें परमेश्वरभजनीं "

सगुणाबाईनें असेंच देवाधर्मांत उर्वरित सर्व आयुष्य कंठलें. ती पार्वतीबाईप्रमाणेंच सात्त्विक होती. यामुळें पेशव्यांच्या कुटुंबकलहांतहि तिनें कोठला पक्ष घेतला नाहीं. कदाचित् पार्वतीबाई व ही सगुणाबाई यांना पुत्रसंतति असती तर मात्र त्या कौटुंबिक यादवींत ओढल्या गेल्या असत्या. पण दोघींनाहि संतति नसल्यामुळें त्या निर्माल्यवत् होत्या. पार्वतीबाईला इतिहासांत प्रसिद्धि मिळाली ती तीं भाऊसाहेब पेशव्यांची स्त्री म्हणून व विशेषतः भाऊसाहेब पेशव्यांच्या तोतयामुळें पेशवाईलाच गंडांतर उत्पन्न होऊन मोठेंच राजकारण उभें राहिलें म्हणून. सगुणाबाईबाबत तसला कांहींच प्रकार नव्हता. यामुळें इतिहासालाहि ती बव्हंशीं अज्ञातच राहिली.

पतिनिधनानंतर ती पस्तीस वर्षे हयात होती. परंतु तिच्यासंबंधीं स्वतंत्र अशा नोंदी फारच थोड्या आढळतात.

नानासाहेब, भाऊसाहेब व माधवराव यांनीं तिचा आदरानें प्रतिपाल केला.

पतिनिधनानंतर सहा सात वर्षांनीं नानासाहेबांनीं तिला काशीयात्रा घडविली. त्या वेळीं तिचें वय सोळा-सत्रा वर्षांचें होतें. या काशीयात्रेंतच बहुधा ती सोळी झाली असावी. १७५५ सालीं तिची सर्व तरतूद करून देऊन नानासाहेबांनीं दसऱ्याचे सुमारास तिची रवानगी केली. त्यासंबंधीं २९-९-१७५५ रोजीं दिल्ली येथील वकील हिंगणे यांना नानासाहेबानें पुढील पत्र लिहिलें आहे—

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापूजी माहादेव व दामोदर माहादेव गो यांसि सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें विशेष चिरंजीव सगुणाबाई यास श्री [मो. जा.] यात्रेस रा केली असेत बराबर सर्व साहित्य दोन तीनसे राऊत देखील देऊन रा केली आहे. तरी तुम्हीं वजिरास सांगून ताकीद परवाने लागतील ते व गुरुज बारदार देऊन याजकडे पाठवणें. सुज्याउदौलास व बलवडसिंग व प्रयागच्या फौजदार किलेदारास वगैरे यांस ताकीद पत्रें देऊन पाठऊन देणें. येविसी विलंब न लावणें. सगुणाबाईची रवानगी विजया दसमीच्या मुहूर्ते करूं. तुम्हांकडील पत्रें जलद येत ते करणें. येविसी वजिरास थेली पाठविली आहे. ते त्यास देणे जाणिजे. [नि] जरूर जलदीनें पाठवणें छ २२ जिल्हेज

बहूत काये लिहिणें [ब] लेखन सीमा. पौ छ ६ रबिलावल (हिंगणें दप्तर खं. १ ले. १६४)

बाळाजी विश्वनाथापासून पेशवे कुटुंबांतील अनेकांनीं काशीयात्रा केल्या. खुद्द बाळाजी विश्वनाथ (?), त्यानंतर त्यांच्या मातोश्री, त्यानंतर मातुश्री राधाबाई, त्यानंतर काशीताई, इतक्यांच्या काशीयात्रा झाल्या होत्या व त्या वेळींहि त्यांनीं शेंकडों लोकांना काशीविश्वनाथाचें दर्शन करवून सुखरूप परत आणण्याचें श्रेय संपादन केलें होतें.

सगुणाबाईनें भाऊसाहेबास व नानासाहेबास यात्रेंतून लिहिलेलीं कांहीं पत्रें उपलब्ध आहेत. तीं वाचनीय आहेत.

सगुणाबाईचें नानासाहेबास ता. १४-२-१७५६ चें पत्र—रेवातीर हांडे येथील मुक्कामाहून दरमजल झाशीस आलों, तेथें चार दिवस राहिलों. नारो शंकर भेटले. नंतर दरमजल काल्पीस माघ वा ५ स आलों. गोविंद बल्लाळ व हारी विठ्ठल भेटले. उदईक निघोन प्रयागास जाऊं. परदरबारचे कागदपत्र आणावयासी गोविंद बल्लाळ याचे जासूद गेले आहेत व वडिली कागद लेहून दिल्हे ते पहिलेच रवाना केले. परंतु जाबसाल आले नाहींत. यास्तव उदईक निघोन ब्रह्मावर्तास भागिर्थी तीरीं दरमजल जाऊं. सिवरात्र तेथेंच होईल. तों परदरबारी कागदहि येतील. उपरांत पुढें जाऊं. प्रयागी कांहीं गडबड जाहाली आहे. यास्तव गोविंद बलाल व हरि विठ्ठल प्रयागपावेतो येतील. सर्वांकडील वकील व कागद आल्यानंतर गोविंदपंताचा पुत्र समागमें घेऊन त्यास माघारे जावयासि निरोप देऊं. गोविंदपंताचा पुत्र समागमें घेऊन त्यास (हरि विठ्ठलास) माघारे जावयासि निरोप देऊं. गोविंदपंताचे पुत्र कासीपावेतो येतील. या प्रांतांत हरि विठ्ठल याचा लक्ष बहूत आहे (पे. द. भा. ४० पृ. ८९).

पे. द. भा ४० मध्यें अनुक्रम १२४ व १२५ ला सगुणाबाईनें भाऊसाहेबास लिहिलेलीं दोन पत्रें छापलीं आहेत, परंतु त्या पत्रांवर तारखा अनुक्रमें ३०-३-१७५९ व ८-५-१७५९ अशा आहेत. तीं पत्रें अशीं—

चैत्र शु. ३ मंदवार मु. झोंसी नजीक प्रयाग गंगापार सुखरूप पावलो. कुरा जाहाबादेहून कूच करून फाल्गुन वद्य १४ स प्रयागास आलो. त्रिवेणी संगमीं त्रिरात्र राहून तीर्थविधी उरकिला. उपरांत चैत्र शु. द्वितीयेस शुक्रवारी पार उतरून झोसी नजीक मुक्काम केला. उदईक कूच करून पुढें श्रीस जात आहो (पे. द. भा. ४०, ले. १२४).

८-५-१७५९ वैशाख शु. १२ गयेच्या मुक्कामाचें—

प्रयागचे मुक्कामीहून पत्रें पाठविली तीं पावलींच असतील. श्री काशी क्षेत्रास चैत्र शु. ९ स आलो. तेथें ८ रोज राहून तीर्थविधी उरकून तेथून कूच करून दरमजल गयेस वैशाख प्रतिपदेस आलो. तेथील गयावर्जने यात्रेच्या लोकांची व आपली चालीस लागली आहे. येथील गुता लौकरीच उरकून श्रीस माघारे जाऊ (पे. द. भा. ४०, ले. १२५).

सगुणाबाई यात्रेसह माघस्नान करून प्रयागाहून माघ वद्य सप्तमीस निघाली ती फाल्गून शु. १४ स झाशीस येऊन दाखल झाली (१७५७). मथुरेस जाणार होती; परंतु त्या प्रांतीं धामधूम सुरू झाल्यामुळें तो बेत रहित करावा लागला. पठाणांनीं दिल्लींत वर्तुळाकार करून म्हणजे दिल्लीचें वाटोळें करून मथुरा मारिली. आग्र्यासहि पठाणाची फौज आली. त्यामुळें तमाम झाशींतील प्रजा परागंदा झाली. अशा स्थितींत झाशीस ८।१५ दिवस राहाणेंहि कठीण झालें. अंताजी माणकेश्वर, नारो शंकर, समशेर बहादर, गोविंद बल्लाळाचे पुत्र फौजेनिशीं पठाणापासून विसा कोसांवर राहूं लागले. पठाणाची दौड फार. तेव्हां एकंदरींत विचार करून दोन चार दिवस झाशीस काढून सगुणाबाई दरमजल सुरंजेस आली. सुरंजेहून उजनीस जाऊन तेथें त्रिरात्र राहून २३ रजबीं ओंकार मांधात्यास येऊन दाखल झाली. तेथील तीर्थविधि उरकून ती बऱ्हाणपुरास आली आणि मग कासिरीच्या घांटें घांट चढून येवल्यावरून नासिक त्रिंबकास आली.

सगुणाबाई काशीयात्रेंत असतां गोपिकाबाईनें आपल्या धाकट्या भावजयीस पाठविलेलें ता. १७-८-१७५७ चें हें पत्रहि उल्लेखनीय आहे.

चिरंजीव सगुणाबाई यासि प्रति सौ. गोपिकाबाई आसीर्वाद उपरी येथील ता।। भाद्रपद शु. ३ पर्यंत समस्त सुखरूप असो विशेष. तुम्हांकडील वर्तमान बहुत दिवस कळत नाहीं. तरी वरचेवरी सविस्तर लेहून पाठवीत जाणें व आपले शरीर प्रकृती लिहिणे. तुमचे माहेरची सर्व सुखरूप आहेत. आम्ही कर्नाटकाहून आषाढ वद्य ८ स पुणियास आलो. कललें पाहिजे. तुम्हीं सर्व यात्रा करून लौकर येणें. कांहीं काळजी न करणें (पे. द. भा. १८, ले. १०७).

यानंतरच्या काळांत पानपतचें अरिष्ट निर्माण झालें आणि 'गंडस्योपरि पिटिका संवृत्ता' किंवा 'आगींतून निघून फोफाट्यांत' म्हणतात त्याप्रमाणें निजामाची पुण्यावर स्वारी झाली व त्यानें पुणें जाळून बेचिराख केलें. पेशवे कुटुंबाला गड कोटावर जाऊन राहण्याचाहि प्रसंग आला. मे १७६३ च्या एका पत्रांत असा उल्लेख आहे. "वरकड वर्तमान तरी पुणियांतील सर्व माणसें व दाणा ऐसे घेऊन जागा जागा, किल्लो किल्ली गेली. श्री. सौ. आनंदीबाई व रमाबाई व मातोश्री सगुणाबाई व नारायणराव ऐसे किल्ले पुरंदर येथें गेली. मातुश्री गोपिकाबाई मात्र पुणियांत सडी राहिली आहेत. मोगल पुण्यापासून चार कोसांवर येईल तेव्हां निघोन पुरंदरास जाणार (पे. द. भा. ३८, ले. ९६).

यानंतर राक्षसभुवन येथें निजामाचा पराभव करून थोरल्या माधवरावांनीं अधिकारसूत्रें हातीं घेतलीं. चुलत्यास निष्प्रभ करून पुन्हां पेशवाईचा दरारा नानासाहेबाच्या कारकीर्दीइतका सगळीकडे बसविला.

त्यानंतर थोरल्या माधवरावाचा मृत्यु झाल्यावर नारायणराव पेशवे झाले. पण

दादासाहेबानें राज्यलोभानें त्यांचा खून करविला आणि पेशवे कुटुंबांतच यादवी सुरू होऊन बारभाईची स्थापना झाली; व दादासाहेबांचा पाठलाग सुरू झाला. त्या वेळीं नाना फडणविसांची सर्व बुद्धिमत्ता पणास लागली. सर्व संकटांतून पेशवाई त्यांनीं तारली. हैदर, टिपू, इंग्रज, कोल्हापूरकर या सगळ्यांचा पराभव झाला. आणि असंख्य संकटांतून जन्मलेल्या कृष्णाप्रमाणें सवाई माधवरावाला लोकांनीं देवरूप अवतार मानून उत्सव साजरे केले.

सवाई माधवरावाचा जन्म पुरंदरावर झाला. त्याच्या लालनपालनाची जबाबदारी घरांतील वडील पोक्त्या स्त्रिया म्हणून पार्वतीबाई व सगुणाबाई यांच्यावरच होती. तें काम त्यांनीं यथायोग्य पार पाडलें. त्या काळांतील सगुणाबाईसंबंधींच्या नोंदी सांपडतात त्या अशा—

६ एप्रिल १७७५ रोजीं सवाई माधवराव यांचा वर्धापन-संस्कार झाला. त्या वेळीं महिपतराव त्रिंबक पुरंदरे व सखाराम बापू बोकील यांजकडून गंगाबाई व सगुणाबाई यांना लुगड्यांचे आहेर करण्यांत आले. मातुश्री गंगाबाइस ११५ रुपयांचें लुगडें व तीन रुपयाचा एक खण व सगुणाबाईस ११२॥ रुपयांचें लुगडें दिलें. सखारामबापूंचाहि आहेर त्यासारखाच होता (सवाई माधवराव पेशवे रोजनिशी खं. १ पृ. ९३.).

सगुणाबाईसंबंधीं दुसरी नोंद अशी—

" १२-२-१८७४ कुणबिणी सरकारच्या यांनीं कसबे पुणे येथें कुणबिणी विकत घेतल्या आहेत.

१ फुली निा सौ. बाई हिणें.

१ तुळशी निा मातुश्री सगुणाबाई हिणें.

एकूण दोन कुणबिणी १४० रुपयास विकत घेतल्या." (स. मा. रो. खं. ३ पृष्ठ २४९).

या नोंदीचा अर्थ असा. तुळशी नांवाची जी सगुणाबाईच्या दिमतीस असलेली कुणबीण तिनें स्वतःकरतां एक कुणबीण विकत घेतली. म्हणजे गुलामाला गुलाम विकत घेण्याचा अधिकार होता. सामाजिकदृष्ट्या ही नोंद महत्त्वाची होय.

सवाई माधवराव दोन तीन वर्षांचे झाल्यानंतर कायमचे पुण्यास राहूं लागले. पुढे लौकरच त्यांच्या मातोश्री गंगाबाई वारल्या. मग नानांनींच त्यांच्या लालनपालनाचा व शिक्षणाचा बंदोबस्त केला. सवाई माधवराव बुद्धीनें बरे तथापि लहान वय असल्यामुळे आणि आपण मालक, धनी आहोंत याची जाणीव झाल्यामुळें पुष्कळ वेळां पोरकट उच्छृंखलपणा करीत. त्यासंबंधीं शेंकडों नोंदी पारसनिसांनीं मिळविलेल्या सवाई माधवरावांच्या दिनचर्यांतून उपलब्ध आहेत. येथें सगुणाबाईबाबत त्यांचेकडून जो पोरकटपणा घडला तो प्रकार असा—

विज्ञापना परवा शु. १२ चे दिवसी मातुश्री माहेरास जाणार होती. यास्तव गणेश दरवाजा उघडावयाची परवानगी मागावयास श्रीमंताकडे खिजमतगार आला होता. त्या दिवसी परवानगी जाली नाहीं. सबब राहिली. काल प्रातःकाली दरवाज्याची परवानगी घ्यावयासी दुसरेयाने आला होता, परंतु परवानगी न होय. दोन तीन घटिका खोलंबाविले होते. आपली स्वारी वाड्यांत येत्ये असे समजताच परवानगी दिल्ही. बाईसाहेबाची स्वारी गेल्यावर दरवाजा लावविला. त्याजवर सायंकालचे च्यार घटिका दिवसास स्वारी आली ते समई दरवाजा उघडावयाकरिता गणेशपंत बाईकडील आले, परवानगी न होय. बाईसाहेबाची पालखी दरवाज्याजवळ येक घटिका उभी होती. फार प्रेत्ने करून परवानगी जाली. त्याजवर आज स्वारी माहेरास जाणार तेव्हां कोणी कोणी बाईजवळील म्हणों लागले कीं दरवाजा उघडावयाची परवानगी श्रीमंताची होत नाहीं यास्तव नानास सांगोन येकंदर पुसोन ठेवावे. त्याजवर बाई बोलिली कीं, नानास पुसावे इतका लौकिक करावा त्यांत जीव नाहीं. च्यार दिवस लग्नकार्य आहे तो दिल्ली दरवाज्याचे वाटेनें जाऊ. याप्रो जाले. आज दिल्ली दरवाज्याने स्वारी गेली. (या नोंदीवरून पेशव्यांच्या बायका गणेश दरवाज्यांतून जावयाच्या यावयाच्या असा परिपाठ दिसतो.)

असो. यानंतर एक दोन वर्षांतच सगुणाबाई पुण्यांतील शनवारवाडा सोडून वडुथास कृष्णातीरीं कायमची राहाण्यास म्हणून गेली. वडुथास कृष्णातीरीं शकुंतेश्वराचें रम्य स्थान आहे. पहिले बाजीराव साहेबांनीं वडूथचें शकुंतेश्वराचें देवालय व तेथील घाट बांधला. नानासाहेबाच्या कारकीर्दींत सर्व राज्यकारभार पुण्यास आला. तोंपावेतों मुख्य राजधानी सातान्यासच होती व शाहूमहाराजांजवळ प्रधानपंत म्हणून पेशव्यास कायमचें राहावेंच लागे. ते स्वारी शिकारीस गेले आले तरी किंवा पुण्यास म्हणजे त्यांच्या इनामगांवीं ते मुक्कामास जाऊन राहिले तरी त्यांना जातीनिशीं वर्षांतून दोनचारदां सातान्यास राजकारणकारभारासंबंधें जावेंच लागे. त्यांचे मुतालीक पुरंदरे तर नेहमींच सातान्यास दरबारीं असत. पेशव्यांचा अर्थात् वाडाहि मोठा सातान्यास होता. पुण्यास राहून पुण्याजवळच्या बनेश्वरसारख्या रम्य स्थळीं सईरसहलीला नानासाहेबानंतरचे पेशवे जात. याप्रमाणें थोरल्या बाजीरावाच्या व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत पेशवे सातान्यास असले म्हणजे वडूथच्या शकुंतेश्वरास जात.

पेशव्यांचा सरकारी वाडा व सरकारी बागा वडुथास होत्या व तेथें सगुणाबाईनें राहावयाचें ठरविलें. यामुळें तेथें तिच्या राहणीची, तिच्या खर्चावेचाची, साहित्यसामानाची आणि शिपाई शिबंदीची, तिच्या इतमामानुरूप नाना फडणविसांनीं कशी चोख व्यवस्था करून दिली होती, तें स. मा. रो. भा. १ पृ. ९८–९९ मधील नोंदीवरून चांगलें ध्यानांत येतें.

लग्न झाल्यापासून सगुणाबाई बहुधा नेहमीं पुण्यांतच राहिली. शनिवार वाड्यांत प्रत्येक खाशाचें स्वतंत्र वसतिस्थान पृथक् पृथक् असे, त्याप्रमाणें सगुणाबाईचेंहि होतें.

जनार्दनपंतबाबाकडे जी हवेली असे तीच पुढें हिची झाली. शनवारवाड्याचा जो मनोळीकरांचा नकाशा म्हणून प्रसिद्ध आहे, त्यांत सगुणाबाईच्या वसतिस्थानाची जागा दाखविलेली नाहीं. परंतु पारसनीससंग्रहांतील सवाई माधवरावाच्या दिनचर्यांचा जो रुमाल आहे त्यांत सगुणाबाईच्या निवासस्थानाचा उल्लेख बऱ्याच वेळां आलेला आहे.

उदाहरणार्थ—ज्येष्ठ वद्य १ रविवासर (१५-६-१७८३) दोन प्रहरीं मातुश्री सगुणाबाईसाहेब यांचे दिवाणखान्यांत हवदावर धाकटा पाल पाण्यांत टाकून येक घटिकापर्यंत श्रीमंत खेळत होते. मग तेथून सौ. रमाबाई यास बोलाऊन आणून दोन घटिका येक जागा तसबिरा पाहावयासि बैसले होते.

ज्येष्ठ वद्य १४ मंदवासर (२८-६-१७८३) आज दोन तीन दिवस हौदांत गलबत घातलें आहे. तेथें आपण चौसोपीत बसोन जवळची मंडळी वगैरे यास गलबतात बसवून वादळ करवितात.

सुा सबा समानीन मया व अलफ (२८-६-१७८६)—आषाढ मास, शु. ३ सौम्यवासर सायंकाळचे साहा घटिका दिवसापासून तीन घटिकापर्यंत सातखणी बंगल्याचे तिसरे मजल्यावर कबू जनावर वानरासारखे आहे तें मोकळे करून बकुळीच्या झाडावर सोडले होते आणि सभोवते गडी करून त्याजला हुसकीत. एक दोन वेळा पळोन गेले तें धरून आणून पुन्हां तसेंच करू लागले. कबू उडी टाकावयासी गेला तों तिसरे मजल्यावरून खाली सगुणाबाई राहात असत त्या जाग्यावर फरसावरी पडला, वाचला आहे. फारच खेळ चालिला आहे.

सगुणाबाईच्या दिमतीस आचारी, सिष्ये, कुणबिणी, हुजरे, पुजारी, पुराणिक अशी मंडळी असून तिचा कारभार पाहण्यासाठीं गणेशपंत नांवाचा एक विश्वासू कारकून नेमून दिलेला होता. ८ मार्च १७८१ च्या दिनचर्येंत पुढील उल्लेख आहे. या वेळीं सवाई माधवराव सात वर्षांचा असून त्याचा मुक्काम पुरंदरावर होता.

सुा त्रयोदशीस सायंकाली गणेशपंत श्रीमंत मातुश्री सगुणाबाईकडील पुण्याहून आला, त्याणे वर्तमान सांगितले कीं बाजारी वर्तमान पुण्यांत आइकिले कीं इंग्रजाकडील पत्रें आली आहेत, सलूख होणार. त्यावरून श्रीमंत बोलिले कीं आणखी दोन ठाणी घेतली तत्राप चिंता नाहीं. परंतु सलूख करावयाचा नाहीं. मारून टाकू. लढाई करावी. कायावाचामनेकरून सलूख करीत नाहीं याप्रमाणें बोलिले.

असो. १७८३ सालीं सगुणाबाई वारली. तें साल पेशवे कुटुंबास अनिष्टच होतेंसें दिसतें. कारण पार्वतीबाई १६ ऑगष्टला वारली, नंतर १३ नोव्हेंबरला सगुणाबाईचा काळ झाला, आणि ११ डिसेंबरला दादासाहेबांनीं देवलोक पाहिला. सगुणाबाईचें देहावसान वह्रथ येथें मात्र झालें नाहीं; तर तें नाशकाजवळ मौजे जगदीशपूर उर्फ जलालपूर येथें कार्तिक वद्य ४ थी गुरुवारीं झालें.

सगुणाबाईला लिहितां वाचतां चांगलें येत असे; व तिनें खास स्वतःचा असा धार्मिक पोथ्यापुस्तकांचा संग्रहहि चांगला केला होता. १७८३ सालीं ती वारल्यावर तिची लायब्ररी सरकारच्या पुस्तकशाळेकडे जमा करण्यांत आली. त्याची याद पे. द. भाग ३२ मध्यें छापली आहे. त्यांत पुढील पोथ्या आढळतात :—

१. अध्यात्मरामायण.
२. योगवासिष्ठ.
३. हरितत्त्वमुक्तावली.
४. कर्णामृत.
५. शतकमूल.
६. टीकाकर्षणामृत.
७. पंचदशी.
८. द्वैत-विवेक.
९. वाक्य-विवेक.
१०. भूत-विवेक.
११. तत्त्व-विवेक.
१२. पंचकोशविवेक.
१३. चित्रदीप.
१४. नाटकदीप.
१५. ध्यानदीप.
१६. तृप्तिदीप.
१७. ब्रह्मानंद विषयानंद.
१८. भागवताचे स्कंध.
१९. गणेशसहस्रनाम.
२०. विष्णुसहस्रनाम.
२१. वासुदेवस्तोत्र.
२२. जन्मरहस्य.
२३. यमगीता.
२४. द्वादश अध्यायी भागवतांतील.
२५. सूर्यनामावली.
२६. कृष्णअष्टशतनामस्तोत्र.
२७. देवी अष्टशत नामावली.
२८. सिवाष्टकस्तोत्र.
२९. सप्तशतींतील देवीकवच.
३०. गौरीदशक.
३१. द्रौपदीकांतस्तव.
३२. गजेंद्रमोक्ष.
३३. शिवसहस्रनामावली.
३४. अध्यात्मरामायणांतील रामस्तोत्र.
३५. बृहन्नारदींतील विष्णुस्तुति.
३६. आदित्यहृप्यस्तोत्र.
३७. रामस्तोत्र.

तिच्या या पुस्तकशाळेंत दोन तीन अपूर्व चिजा होत्या. एक म्हणजे ताइतांत घातलेली व अत्यंत बारीक अक्षरांत जडगिरी कागदावर लिहिलेली गीता, व दुसरें तसेंच ताइतांत घातलेलें भागवत. त्याप्रमाणेंच सचित्र गीतेचें एक पुस्तकहि होतें.

१ पहिले उपेक्षित हिन्दु मिशनरी *

(श्री· विनायकराव करमळकर, पुणें)

लेखाचे शीर्षकावरून श्रोत्यांना थोडें नवल वाटावयाचा संभव असल्यानें त्याचा प्रथमारंभास थोडा खुलासा केलेला बरा. प्रस्तुत संक्षिप्त चरित्राचे नायक हे विष्णु भिकाजी गोखले अर्थात् विष्णुबोवा ब्रह्मचारी होत. त्यांचा जन्म इ. स. १८२५ मध्यें झाला आणि मृत्यु १८७१ मध्यें झाला. त्यांना केवळ ४६ वर्षांचें आयुर्मान लाभलें. त्यांना दिवंगत होऊन आज ९३ च वर्षें झालीं म्हणजे उणें पुरें एक शतक अद्याप लोटलें नाहीं. हा काल ऐतिहासिकदृष्ट्या अगदीं अल्प असूनहि आजच्या पिढीस त्यांची यथार्थ माहिती नसावी, त्यांतहि विशेषतः अखिल भारतीय हिन्दुसभेचे कार्यकारी मंडळास ही जाणीव नसावी याचें सखेद आश्चर्य वाटतें !

'पाखंड मताचें खंडन करून वैदिक धर्माची पुनः स्थापना करावयाचा आदेश आपणांस ईश्वरी संदेशानें प्राप्त झाला असल्याचें बोवा आपल्या आत्मचरित्रांत नमूद करितात· अशा स्थितींत त्यांचें यथोचित स्मारक त्यांचें कार्यक्षेत्र मुम्बापुरींत नसावें किंवा भारतीय हिन्दुसभेच्या कोणत्याहि अधिवेशनप्रसंगीं 'विष्णुबुवानगर' किंवा 'विष्णुबोवा ब्रह्मचारी महाद्वार' यासारखी तात्पुरती पुसट आठवणीदाखल दखलहि कृतज्ञताबुद्धीनें घेतली जाऊं नये ही स्थिति अगदीं लाजिरवाणी म्हटली जाईल. प्रस्तुत लेखक त्यांना उद्देशूनच 'पहिले उपेक्षित हिन्दु मिशनरी' असा हेतुगर्भ शब्दप्रयोग या लेखास देत आहे. बोवांचें उपनांव गोखले. ते काश्यपगोत्री चित्तपावन कोकणस्थ ब्राह्मण होत. त्यांच्या मातोश्रीस एकंदर ११ अपत्यें झालीं त्यांत बोवांचा क्रम दहावा. त्यांचा जन्म ठाणें जिल्ह्यांत, तालुका राजापुरी, निजामपूर पेटा, मुक्काम शिरवलींत झाला. वयाचे ५ वे वर्षींच त्यांचे वडील वारले. लहानपणीं थोडेबहुत वैदिक अध्ययनाबरोबर बोवांनीं गुरें चारणें, खेती काम, जंगलांतून लांकडें आणणें, असलीं कौटुंबिक कामें गरिबीमुळें केलीं. लहानपणीं ११॥ वर्षें त्यांनीं उमेदवारी केली. बोवांचें अक्षर चांगलें असल्यानें व तत्कालीं नोकरी प्राप्त व्हावयास तीच एक विशेष योग्यता असल्यानें व ते वयाचे ९ वे वर्षीं परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यानें शिरवलीपासून दूर महाड येथें कस्टमखात्यांत नोकरी मिळाली. ते महाडास कोणा गांधीचे दुकानीं व्यापारी हिशेब देवघेव शिकले. वयाचे १४ वे वर्षी ते जहाजमार्गें रत्नागिरींत संगमेश्वर बंदरीं २ महिने राहिले. तदनंतर ठाणें जिल्ह्यांत साष्टी मुक्कामीं, त्याउपरांत वसई, कल्याण, भिवंडी, उरण मुक्कामीं त्यांची नौकरी झाली. सेवाकालांत जो वाचनाचा नाद लहानपणीं होता तो टिकून राहिला. त्यांत त्यांनीं थोडेंफार भगवद्गीतेचें अध्ययन केलें. विवाहयोग्य वय

* संमेलन ५१ वें, श. १८८६ (इ. १९६४)

असल्यानें मातोश्री-बंधूंकडून थोडीफार गळ पडून लग्नाचा आग्रह झाला. पण पूर्वजन्म-संस्कारपूर्वक बोवांनीं आमरण ब्रह्मचारीच राहावयाचा निश्चय केला. या जोमदार तारुण्याचे काळीं समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें 'देवाच्या सख्यत्वासाठीं पडाव्या जिवलगासी तुटी' किंवा 'सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं मिळेना कदा कल्पनेचे नि मेळीं' या श्लोकोक्तीप्रमाणें आचरण ठेवावयास सुरुवात केली. मानवी आयुष्याचें सार्थक आत्मानुभवांतच आहे अशी खूणगांठ पटून त्यांनीं वैराग्यपूर्ण ग्रंथांचें वाचन जारी ठेविलें. ते अखंड रामनाम जप करीत. साधुसंतांचीं दर्शनें घेणें, सत्संगीं काळ सार्थकीं लावणें, या वागणुकीचा इष्ट तो परिणाम होऊन त्यांनीं नेसूं धोतरें फाडून ते कौपीनधारी झाले आणि संसारास आखरी तिलांजलि देऊन ते अरण्यवासी झाले. यापूर्वीं कांही दिवस २० वे वर्षी त्यांचा वास नाशिक-पंचवटीस असतां त्यांना महाकाली, महासरस्वती, महालक्ष्मी दर्शनें झालीं. तसेंच शिवपार्वती, राम व दत्तात्रय प्रेरणापूर्वक त्यांनीं सप्तशृंगीची वाट धरली.

नाशिक दिंडोरी जवळील सप्तशृंगी देवी हें पुरातन महासिद्ध शक्तिपीठ म्हणून प्रसिद्धच आहे. या ठिकाणीं व आसपासचे अरण्यांत ते केवल नग्नावस्थेंत कंदमूळ खाद्य व निर्झरोदक पान करून उग्र तपश्चर्यापूर्वक कित्येक वर्षे राहिले. परमार्थांत गुरुची आवश्यकता नितान्त समजली जाते व तदनुसार त्यांनीं कित्येक तथाकथित साधूंचे मंत्रोपदेश घेतले. पण समाधान होईना. गुरूचे शोधांत असतांना त्यांना बहुतेक लोक लफंगे, गंडवणारे, कोणी भांग, दारू, गांजेकसी, कोणी किमयेचे फंदांत चारित्र्यहीन, कनककामिनीचा त्याग नसलेले, एवंच शिष्यचित्तापहारक ऐवजीं शिष्यवित्तापहारकच आढळले. यामुळें त्यांस वीट आला व स्वपुरुषार्थपूर्वकच त्यांनीं एकांतिक ईशकरुणापूर्वक साधनेस आरंभ केला. त्यांच्या सुप्रसिद्ध **वेदोक्तधर्मप्रकाश** या ग्रंथांत आपला कोणी मानवी गुरु नाहीं असें असंदिग्ध शब्दांत त्यांनीं लिहून ठेविलें आहे. त्यांच्या तपस्या व साधना यांचा मागोवा आपणांस त्यांच्या ग्रंथावरूनच मिळावयाजोगा आहे.

आत्मप्रयत्नपूर्वक मनननिदिध्यासानें आपणांस अंगुष्ठमात्र सिंदुरारुण शक्तितेज दिसलें व उजवे हातीं प्रवालमाला व डाव्या हाताची अभयमुद्रा अशा दिव्य जगन्मातेचें दर्शन झाल्याचें बोवा नमूद करितात. आपला संप्रदाय द्वादशकलात्मक दत्तसंप्रदाय होय असें ते आवर्जून सांगतात. त्यांच्या ग्रंथांत ते दत्तात्रय व दाशरथी रामाचें समीकरण मांडतात, म्हणजे या दोघांत अभेद कल्पितात. बोवा गौरवर्ण, रुबाबदार असत. त्यांची मुद्रा ईषत् हास्यमिश्रित पण शान्त असे. 'ईश्वरी कृपेनें हजारों मनुष्यांचे सभेंत मला ज्या समयास जें पाहिजे तेंच सुचतें. हाच माझ्यांत मुख्य गुण असून मला कोणाच्याहि कोठल्याहि प्रश्नाचें तत्काळ हजरजबाबपूर्वक समाधान करितां येतें' असें ते स्पष्ट सांगत. युक्ति, अनुभव व शास्त्रयुक्त मी बोलत असल्यानें मला बोलण्यांत कोणी जिंकील असें नाहींच नाहीं असें त्यांचें स्वाभिमानपूर्वक पण आत्मविश्वासपूर्वक लिहिणें आहे.

सर्व बोलणें आत्मप्रचीतीचें व निर्भयपूर्वक आहे. बोवांस खुशामतीचें अगदीं वावडें

असे. इतकें कीं त्यांची मजल कांहीं वेळां अतिरेकी फटकळपणांत झाली आहे. आधुनिक युगांत **बुद्धिप्रामाण्या**वर अतिरेकी भर आहे, तो शतकापूर्वी साध्या बुद्धिवादावर नव्हता; अशा समयीं बोवांनीं तथाकथित साधुसंतांचे व थोरांमोठ्यांचे नांवावरील ग्रंथ-निविष्ट गोष्टी व चमत्कार कपोलकल्पित भाकडकथा आहेत व सदर ज्ञानी माणसांचें ज्ञान सर्वसाधारणास आकलन न झाल्यानें त्यांचा मोठेपणा सिद्ध करावयास रचलेल्या खोट्या गोष्टी आहेत असें म्हणण्यांत त्यांचें असाधारण धाष्ट्यं दिसून येतें व यास ते रामदासकृत दासबोधाच्या दहाव्या दशकाच्या सातव्या समासाचा दाखला देतात. कर्मकाण्ड, स्पृश्यास्पृश्य, जातिनिर्बंध, व्रतेंवैकल्यें, उपासतापास, देहदंडनाचें तप या गोष्टी व या काळांत बुद्धीस न पटणारा जातिनिर्बंध ते मानीत नसत. त्यांचे (गीतोक्त जाति गुण-कर्मावर अधिष्ठित असाव्या, जन्मतः नसाव्या) मतें जाति-धंद्यावर वडिलोपार्जित रूढिगत झाल्या यावर कटाक्ष असल्यानें ते मुसलमान, क्रिरिस्ताव यांचे हातचें खाद्य निःशंक खात ! तथापि मद्य, मांस व मादक द्रव्यें यांचा वापर ते चुकूनहि करीत नसत. एवढेंच नव्हे तर कोणीं मनुष्यानें केला तर तो त्यांस अजीबात खपत नसे. अखिल मानवजातीस वनस्पत्याहारच युक्त असून तेंच ईश्वरी मनोगत असल्याचें ते वाद्यास पटवून देत. यासंबंधीं त्यांची विचारसरणी बुद्धीस हमखास पटणारी असल्यानें ती त्यांच्या ग्रंथांतून वाचावयास मिळते. कथनीप्रमाणें करणी म्हणजे बोले तैसा चाले हें तर त्यांच्या चरित्राचें ध्रुव वाक्यच होय. त्यांना शिष्यसांप्रदायाचा तिरस्कार होता. अर्थात् सज्जनाचे मनांत त्यांचेविषयीं आदर वाटे व यामुळेंच वायफळ वितंडवादी त्यांस वचकून असत.

त्यांनीं बरेच ग्रंथ लिहिले, ते सर्वच आज उपलब्ध नाहींत. श्री. शंकर गणेश दाते-कृत मराठी ग्रंथसूचींत **वेदोक्तधर्मप्रकाश,** गणपत कृष्णाजी छापखान्यांत शके १७८१ मधें छापल्याची नोंद आहे. याखेरीज **पद्यात्मक ओंवीबद्ध भावार्थसिंधु, ख्रिस्तीमतखंडन, भगवद्गीतेवरील सेतुबंधनी टीका, सुखदायक राज्य-प्रकरणीं निबंध** इत्यादि नांवें आहेत. यांतील कांहींचीं एकापेक्षां अधिक संस्करणें झालीं असून तीं निरनिराळ्या प्रकाशकांकरवीं झालेलीं आहेत.

वेदोक्तधर्मप्रकाशाचीं २४ विस्तृत प्रकरणें असून त्यांत वेदोक्त धर्माचा साकल्यानें विचार केला आहे. बोवांना मुख्य वेदप्रामाण्यच मान्य होतें. तथापि आर्य-समाजी अवतारवाद व पुराणें खोटीं ठरवून केवळ कर्मकाण्डीय यज्ञीय संस्था व वैदिक देवतांचा स्तवच मानतात तसें बोवांचेबाबत नसून ते अवतारवाद व पुराणें मानतातच व उपासनेचे दृष्टीनें याची परम आवश्यकता प्रतिपादतात. उपास्यांचा अनियम असून त्यांत अभेद असल्याचें त्यांचें सांगणें आहे. त्यांची अनेकानेक साधनावर श्रद्धा आहे. हठयोग व राजयोग त्यांनीं आत्मसात् केला होता, व या ग्रंथांत साधकास त्यांचें अनुभ-

विक मार्गदर्शन सामावलेलें आहे. म्लेंछ मताचें खंडन सदर ग्रंथांत आढळून येतें. अनेकानेक मतांचे लोकांस त्यांत बुद्धिप्रामाण्यावर अजोड बोध आहे. नास्तिकांशीं वाद करून त्यांना नामोहरम करण्यांत बोवा वादकुशल होते. वेदांतील सृष्टीचे नियम व त्यांचीं सुबुद्ध प्रमाणें देण्यांत आलीं आहेत. बोवा साकार व निराकार उभयविध देवस्वरूप मानतात. पण रामदासी दंडकाप्रमाणें 'सगुण रक्षून निर्गुण बोलिजे' या पद्धतीचे अनुसार बोवांनीं अभेद साक्षात्कार म्हणजे अपरोक्षाऽनुभूतीपावेतों मजल मारली आहे. त्यांचा बोध अनुभवाचा सहज सरळ आहे. बाप व मुलाचा संवाद व आई व मुलीचा संवाद यांत धार्मिक-सामाजिक प्रश्नांचीं कां व कसें याबद्दलचीं मार्मिक उत्तरें सांठविलेलीं आहेत. सदर ग्रंथांत सर्वसाधारण मंत्रशास्त्र व जुजबी ज्योतिषशास्त्राची चर्चा जिज्ञासूंस सहजीं प्राप्त होते. या संक्षिप्त निबंधांत जागेचे अभावीं सर्वच गोष्टींचा खल करतां यावयासारखा नाहीं. तथापि एकंदर धार्मिक-सामाजिक विचार सर्वंकष असल्यानें मुख्य ग्रंथ मननपूर्वक वाचावयास पाहिजे. वेदोक्तप्रकाश हा ग्रंथ बोवांनीं वयाचे ३४ वे वर्षी लिहिला. या वेळीं गतकली ४९६० वर्षें होता. आज त्यास ५०६६ वर्षें होत आहेत. **भावार्थसिंधु** हा ग्रंथ ओंवीबद्ध. यांत योग व तत्त्वज्ञानविषयक साक्षात्कारसंबंधीं माहिती असून जीवन्मुक्त मनुष्याची राहणीहि समजविलेली आहे. सदर ग्रंथ लिहिणेंपूर्वी बोवांनीं भावार्थरामायणाचीं ३ पारायणें पंढरपूर मुक्कामीं केलीं होतीं. हा ग्रंथ शके १७७७ माघ शुद्ध १० शुक्रवारीं समाप्त झाल्याची नोंद आहे. सदर ग्रंथ त्यांनीं पंढरपुरासच लिहिला. ग्रंथाची रचना केवळ वीस दिवसांतच झाली. कर्म, उपासना, ज्ञानकांडाचा योग्यतेनुरूप उपदेश यांत असून, सत्संग, सद्गुरूची ओळख, गुरुभक्ति व भक्तिद्वारां आत्मनिवेदन अर्थात स्वरूपसिद्धि, आत्मलाभ कसा करून घ्यावा याचें मनोज्ञ वर्णन यांत आढळतें. ध्यानयोगद्वारां दूरदर्शन व श्रवण कसें होतें तें यांत सांगितलें आहे; पण उपासनेचें प्राधान्य चित्तनिरोध व बुद्धिविकासच बोवा मानतात.

कपट, जालसाजी व झांशेबाजी यांबद्दल बोवांना विलक्षण चीड असून त्यांचें बोलणें पोटतिडिकेचें आहे. ब्रह्मचारी बोवांची शिकवण विश्वप्रेम व विश्वहिताची असून जागतिक बंधुभाव त्यांना अभिप्रेत आहे. लोककल्याणांतच आत्मकल्याण आहे असें ते ठासून प्रतिपादन करतात. अव्वल इंग्रजींत ख्रिस्तानुयायी पाद्री यांनीं आपला धर्मप्रचार जोमानें चालविला होता हें सर्वश्रुतच आहे. हिन्दु धर्मांतील खालच्या अस्पृश्य वर्गास धर्माचें साधारणहि ज्ञान नसे. रूढिप्रिय लोकाचारांवर त्यांची भिस्त असे. अनेक वेड्या समजुती त्यांचे अंतःकरणांत कायम घर करून असत. अशा वेळीं या दलित समाजांतून मुहमदधर्मानुयायांनीं व ख्रिस्ती लोकांनीं फार लोक बाटविले! आर्थिक हलाखीची स्थिति असल्यानें नोकरी व द्रव्य व समान वागणुकीचे देखाव्यावर हें धर्मांतर झालें. अशा हिंदुधर्मीय समाजांत अनंत जाति व खानपानविषयक व रोटीबेटीबंदी इत्या सर्रास वापर होता. वरचा सुशिक्षित ब्राह्मणवर्ग या दलित समाजाकडे केवळ उपेक्षित

बुद्धीनेंच पाहात होता. अशा वेळीं बोवांनीं स्वतः बायबलचें अध्ययन करून या लबाडीचे धर्मांतरास चांगलाच सामना दिला. बोवांचीं व्याख्यानें बंदिस्त जागेंत मुंबईस प्रौढ सुशिक्षितांकरितां होत. आपल्या व्याख्यानांस त्या काळीं एक आणा शुल्क लावणारे प्रथम हिन्दुधर्मप्रचारक बोवाच होत. त्यांत अस्पृश्य व ख्रिश्चन लोकांस मज्जाव असे. तथापि बोवांनीं समुद्रकांठीं चौपाटीवर सार्वजनिक धार्मिक व्याख्यानें द्यावीं त्यास सर्व प्रकारचा जातिनिरपेक्ष लोकसमूह उपस्थित असे. पाद्री धर्मगुरूकडून अजाण हिन्दु कोंकरें आपल्या कळपांत ओढावयाच्या प्रयत्नांस बोवांचा मुख्यतः विरोध सुरू झाला व त्यांच्या सभा व बैटकीजवळ बोवांनीं मुद्दामच हेतुपूर्वक आपलें ठाण मांडावें व त्यांच्या मतलबी प्रचारास बुद्धिवादानें समर्पक उत्तरें द्यावींत व असले अश्लाघ्य प्रयत्न हाणून पाडावे असा खाक्या सुरू केला. परधर्मीय परकीय राज्यसत्तेस हें मानवण्यासारखें नव्हतें. अर्थात् १८५७ चे सालांत त्यांच्या व्याख्यानांस बंदी करण्यांत आली. पाद्र्यांशीं जाबसाल करण्यांत बोवा निष्णात असल्यानें पाद्र्यांना आपला गाशा गुंडाळावा लागे. अशाप्रमाणें विष्णुबोवा ब्रह्मचारी यांनीं त्यांचे मनांत आपल्या अस्तित्वानें भीति निर्माण केली होती. अखंडसावधानपूर्वक जागरूकच असावें अशी त्यांची शिकवण असे. मुंबईतील निरुपद्रवी व शांततेंत जीवन व्यतीत करणारा पारशी समाज व तो धर्म यांबद्दल बोवांस सहानुभूति व प्रेम असे. झरतुष्ट्र व झेंद अवेस्ता हे वेदोक्त धर्मानुयायीच होत. मात्र देशपरत्वें त्यांची शिकवण कांहींशी भिन्न झाली असें ते म्हणत. अर्थात सर जमशेदजी भाई बारोनेट व जनार्दन रामचंद्र या भिन्न धर्मीयांकडून त्यांना सारखाच आदर व मान मिळत असे. **भगवद्गीतेचें भाषांतर** तर पेस्तनजी फ्रामजी कामा या परोपकारी सज्जनानेंच छापविलें आहे.

आजचा खरा समाजवाद कसा असावा याबाबत एक शतकपूर्व या तत्त्वज्ञानी, धार्मिक, सामाजिक व्यक्तीचीं मतें अभ्यसनीय अशीं आहेत. बोवांचा '**सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध**' म्हणून लहानसाच निबंध आहे. त्यांत या स्थित्यंतराचीं बीजें अनुस्यूत आहेत. हा निबंध वाचला असतां बोवांचे दूरदृष्टी धोरणाबद्दल खरोखरच नवल वाटतें. ' सर्वांचें उत्पन्न एकच असावें, सामुदायिकरीत्या प्रत्येकानें श्रम करून आपणांस अवगत असणाऱ्या विषयांत उत्पादन करावें. गरजेप्रमाणें एकाच कोठारांतून अन्न व इतर वस्तु न्याव्या, स्वयंवरपद्धतीनें खात्याचे मार्फत लग्नें व्हावीं, कांहीं विशिष्ट मार्गांनीं घटस्फोट असावेत व पुनर्विवाह व्हावेत; विधवाविवाह त्यांना मान्य होता. पांच वर्षांची प्रजा झाली म्हणजे ती राज्याचे ताब्यांत द्यावी; त्या खात्यातर्फे सदर बालकाचा कल व योग्यता पाहून ती ती विद्या शिकून त्यांत त्यानें निष्णात व्हावें; वृद्धावस्थेमध्यें निर्वाहासाठीं चरितार्थवेतन राजसत्तेकडून मिळावें; बोवांस जातिभेद पसंत नसे, कारण तो गुणकर्मावर अधिष्ठित नसून जन्मतःच मानला जातो हा त्यांत दोष आहे. व्यवसायामुळें जाति ठरल्या व तोच जात्यभिमान वरिष्ठ व कनिष्ठ मानण्याकडे प्रवृत्ति झाली; पोट व अवयव

या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें अवयवांचें अहमहमिकेचें भांडण लागतां उपयोगी नसून सर्व पोटाकडे म्हणजे राजसत्तेकडे जावें; त्यानें गरजेप्रमाणें सर्व विभागून योग्य वांटणी करावी. जुनी राज्यसंस्था राजाकरवीं टिकविणें म्हणजे प्रस्तुत युगांतील Benevolent Dictatorship च होय. राजनीति बिघडली हें दाखविण्याची निशाणी म्हणजे उच्च-नीच भेदांवर अधिष्ठिलेला जातिभेद असें बोवा बिनदिक्कत सांगतात. त्यांचा हा निबंध आजहि विचारप्रवर्तक व अभ्यसनीय आहे.

वेदोक्तधर्मप्रकाश या ग्रंथांत त्यांना आत्मलाभ स्वपुरुषार्थपूर्वक प्रत्यक्ष ईश्वराकडून म्हणजे दत्तात्रयाकडून झाला असें म्हटलें आहे. कोणत्याहि मानव गुरुचा त्यांत ओझरताहि उल्लेख नाहीं. पण पालनपुरास भावार्थसिन्धूची एक मराठी प्रत आतांच उपलब्ध झाली असून तिचा गुजराथी गद्यानुवाद सीताराम रावजी जुन्नरकर या कायस्थ, गुर्जरस्थ पण महाराष्ट्रीय माणसानें केला आहे. त्यांत बरींच अशुद्धें व अनभिज्ञ भाषाप्रयोग होते. ग्रंथ मुंबईंत शिळा छापावर विक्रम संवत् १९१४ म्हणजे इ. १८५८ मध्यें छापला गेला आहे. त्यांत अर्थाचा फेरफार न करितां केवळ अशुद्धें वगळून व शुद्ध गुजराथी भाषेंत श्री. सुरेंद्रनाथ रंगनाथ धारेखान संपादित गुजराथी लिपींत तोच गद्यानुवाद उत्थान कार्यालयाकडून बडोद्यास प्रकाशित झाला. सदर ग्रंथाचे तिसऱ्या भागाचे गद्य ९९-१०० परिच्छेदांत, जीवन्मुक्त राहणीसंबंधीं उल्लेखांत, चौथ्याचे गद्य परिच्छेद १०१ ते १०३ यांत व पांचवे भागाचे ग्रंथसमाप्तीचे शेवटील १०९ ते ११२ गद्य परिच्छेदांत बोवांनीं आपल्या पारमार्थिक गुरुचा स्पष्ट उल्लेख असंदिग्ध शब्दांत लिहिला असल्यानें कोणत्याहि शंकेस मुळीं अवसरच राहात नाहीं.

ही परंपरा अशी—श्रीरामाकडून महान् ऋषि ब्रह्म–अत्रि–दत्तात्रेय–त्रिविक्रमाचार्य अर्थात् नारायण बावा—सखाराम बावा अर्थात् कालियाबावा—व त्यांचेकडून ब्रह्मचारी बोवा अर्थात् विष्णु बोवा ब्रम्हचारी यांना निर्वाणस्थिति प्राप्त झाली. याप्रमाणें सद्गुरु सखाराम बोवांचे कृपेमुळें व त्यांच्या संप्रदाय राहाणी करणी मार्फत लोक हो ! मी स्वस्वरूपनिराकारस्वरूपाचें सहज ऐक्यपण पावलों असें बोवा स्पष्ट लिहितात.

मात्र हा उल्लेख पांचव्या भागाचे समाप्तींत ११२ गद्य परिच्छेदांत भावार्थसिन्धु ग्रंथकर्ता विष्णुबोवांचे गुरु नारायण बावा होत असा हस्तदोषानें वा परात्परगुरुस अधिक मान द्यावयाचे इच्छेनें झाला असावा.

मुंबईंत ७ वर्षें त्यांचीं धर्मपर व्याख्यानें झालीं. शेवटली सभा लोहार चाळींत

आत्माराम बापूजी दळवीकडे झाली. इ. १८५६ मध्यें द्वारकेस जावयास त्यांचें आगमन मुंबईंत झालें. त्यांना वेदप्रतिपाद्य विषयावरील विचारपरिप्लुत व्याख्यानें द्यावयाचा आग्रह झाला यामुळें त्यांना मुंबईंत थांबावें लागलें. इ. १८५७ मध्यें सुप्रसिद्ध शिपायांचें बंड (कांहींचे मतें स्वातंत्र्यसंग्राम) झालें त्यांत व्याख्यानास आळा बसून व्यत्यय आला. १८६१ मध्यें ते मद्रासला गेले. तेथून कलकत्ता व मग काशीस विश्वनाथ-दर्शनास गेले. तेथून परत कलकत्ता करुन ते मुंबईस परतले. इ. १८७१ अर्थात् विक्रम संवत् १९२७ माघ वद्य १४ शिवरात्रीस शनिवारीं रात्रौ एक वाजतां काळपुळीचा आजार होऊन विठ्ठलवाडीचे मंदिरांत त्यांनीं मर्त्य शरीराचा त्याग केला व ते स्वस्वरूपीं समरसले. मृत्युपूर्वी दोन घटिका त्यांनीं आपली वाणी बंद केली. भगवद्गीतेवरील सेतु-बंधनी टीकेचा १८ वा अध्याय या वेळीं लिहिला जात होता.

" अहंवृत्तिधारक ज्ञानापूर्वीचा मी निराकार सनातन परब्रह्म असल्याबद्दल बोवांची खात्री " असल्यानें जीवन्मुक्ताचें शरीर मृत्यूनंतर नरकांत पडलें काय किंवा कोल्ह्या-कुत्र्यांनीं खाल्लें काय त्यास जिवंतपणीं याचा यत्किंचित् विषाद असत नाहीं. ह्यास अनु-सरून त्यांनीं आपलें प्रेत कचरापेटींत टाका असें पूर्वीच सांगितलें होतें. पण संस्कार-पूर्वक दाह होऊन रक्षा वाळकेश्वरीं रामकुंडांत टाकली गेली. मृत्युसमयीं अंतर्वृत्ति बेदिल होऊन आत्मधारणा व्युत्थान पावते असें त्यांनीं लिहून ठेविलें आहे. त्यांचा फोटो १८५६–५७ चे इलस्ट्रेटेड लंडन न्यूजमध्यें आलेला असल्याचें कळतें. सदर लेखकास तो पाहावयास मिळाला नाहीं. प्रस्तुत लेखाबरोबर दिलेला **फोटो ब्लॉक** तरुणपणाचा मूळ भगवद्गीता भाषांतरांतील व त्यावरून भावार्थसिंधु गद्यानुवादांतील असून याच्या **अस्सलपणाची ओळख** भारत इतिहास संशोधक मंडळांतील सभासदांनीं उपोद्बलक ऐतिहासिक पुराव्यानें ठरवावयाची आहे. एरवीं थोड्या स्थूल शरीरयष्टीचें, पंचेवजा धोतर लपेटलेलें, हातांत सोटा असलेलेंच चित्र लोकांचे आठवणींत आहे.

फोटोसंबंधीं हा इशारा द्यावयाचें कारण असें कीं, मागें अयोध्याप्रसाद म्हणून एका कॉन्ट्रॅक्टरचा फोटो तो बंडाचा पुढारी नानासाहेब पेशवे म्हणून याच इलस्ट्रेटेड लंडन न्यूजमध्यें छापला गेला व त्यावरुन पुतळा होऊन तो रीतसर तेव्हांचे माझे मित्र उत्तर-प्रदेश बांधकाम मंत्री श्री. विचित्र नारायण शर्मा यांचे हस्तें बिठूर अर्थात् ब्रह्मावर्त येथें उद्घाटित व्हावयाचा होता, पण त्यांना वेळींच लिहून मीं हा समारंभ स्थगित करविला, हें होय.

बोवांची गुरुपरंपरा

निरंजनस्वामी (गिरनार येथील गुहेंत वास्तव्य.)

|

त्रिविक्रमाचार्य नारायणमहाराज जाळवणकर. (दत्तसाक्षात्कारी. सप्तसिन्धुकर्ते
(पूर्वजन्मीं हिरण्यगर्भाचार्य) समाधितत्त्वोपदेश, गुरुअष्टक इ.)

१ नारायणबावा देवरुखे ब्राह्मण रत्नागिरीस नारायणपेठेंत राहात.	२ सखारामबोवा* अर्थात् कालियाबावा कल्याणचे (जिल्हा ठाणें) धौम्यारण्य गवालियरजवळ.	३ लक्ष्मणबोवा. गोपाळमंदिर. आडवा बाजार, इंदूर (पादुका व चिमटा आहे.)	४ जयराममहाराज वास्तव्य देवास (गंडकींतील काळ्या पाषाणाची दत्त-मूर्ति.)
राधाकृष्ण राघोबा तोरणे	(१) विष्णुबोवा गोखले ब्रह्मचारीबोवा.	(१) बलभीमबोवा साडेकर	
बाबामहाराज टाकी (पिता)	(२) धारचे दिवाण– बापूजी रघुनाथ दिघे, त्यांची पत्नी नानीबया व पुत्र रघुनाथभाऊ कनिष्ठ पुत्र (यांचेजवळ परमगुरूचा पत्रव्यवहार आहे.)	१ काथवटे २ श्री. भागीरथीबाई ठकुताई–वैद्य ३ गणपतराव तांबे (कविवर्य तांबे यांचे कनिष्ठ बंधु)	
दादामहाराज टाकी (पुत्र) जोगेश्वरी मुंबई सद्भक्ति प्रकाशन			

---

* विष्णुबोवांनीं भावार्थसिंधूची रचना केली त्या वेळीं सखारामबोवा जिवंत होते; मात्र धौम्यारण्य सोडून काशीस वास्तव्य होतें, भावार्थसिंधु ग्रंथरचना शके १७७७ माघ शुद्ध १० शुक्रवार, पंढरपूर. सर्व ग्रंथ २० दिवसांत लिहिला.

१० नामा पाठककृत द्रौपदीवस्त्रहरणाख्यान*

(डॉ. वसंत पारखे, एम्. ए., पीएच्. डी., डोंबिवली)

नामा पाठकाच्या व्यक्तिपरिचयाबद्दल आपणांस आजपर्यंत अत्यल्प माहिती उपलब्ध झालेली आहे. हा कवि हरि पाठकाचा पुत्र असून कान्हो पाठकाचा नातू होता. या पाठक मंडळीचें आडनांव राजपाठक असें असून ही पाठकमंडळी पुणें जिल्ह्यांत असलेल्या खेड तालुक्यांतील केंदूर या गांवची राहणारी. कान्हो पाठकांची समाधिसुद्धां केंदूरलाच आहे. हे कान्हो पाठक ज्ञानेश्वरसमकालीन असून शके १२१२ त ते हयात असल्यामुळें त्यांचा नातू नामा पाठक याचा काल शके १३०० च्या आसपासचा ठरतो, अशी माहिती श्री. वि. का. राजवाडे आपणांस देतात;[1] परंतु नामा पाठकाच्या या शकाविषयीं शंका वाटते.

परंपरेप्रमाणें कान्हो पाठक हा वडवाळसिद्ध नागेशाचा शिष्य समजला जातो. या वडवाळसिद्ध नागेशानें आपल्या 'संकटहरणीशिवग्रन्थ' या छोटयाशा ओवीबद्ध ग्रंथांत रचनापूर्तीचा जो निर्देश केलेला आढळतो तो असा[2]—

मिती मार्गेश्वर वद्य बीज । गुरुवारीं लिहिला सहज ।
लिहितां स्वात्मकार्य माझें । करी अज्ञाना ज्ञानसिद्धी ॥ ३६
शके तेरासें तेरा १३१३ ॥

जर कान्हो पाठक, शके १३१३ त हयात असलेल्या वडवाळसिद्ध नागेशाचा शिष्य असेल तर, साधारणतः शके १४०० चा काल हा नामा पाठकाचा समजावा लागतो. ह. भ. प. ल. रा. पांगारकर पण नामा पाठकाचा काल निर्मळ पाठकानंतरचा परंतु एकनाथापूर्वींचा मानतात; कारण त्याचा उल्लेख एकनाथांनीं आपल्या संतमालिकेंत केलेला आढळतो म्हणून[3] ! परंतु एकनाथांची (निदान त्यांच्या नांवावर मोडणारी !) ही संतमालिकासुद्धां एकनाथकालीन असावी काय, याविषयीं मनांत संदेह उत्पन्न होतो !

ही संतमालिका कै. तुकाराम तात्यांनी एकनाथ महाराजांच्या गाथेंत प्रविष्ट केलेली आहे. परंतु त्यांनी संपादित केलेली गाथा आतां अत्यंत दुर्मिळ झालेली असल्यानें त्यांत नामा पाठकाचा निर्देश झालेला आहे तो एकनाथांचा अभंग (?) वाचकांच्या

---

*संमेलन ५१, वें श. १८८६ (इ. १९६४)

(१) भा. इ. सं. मं. अहवाल; श. १८३२ पा. ७२.
(२) भा. इ. सं. मं. वा. इ. वृत्त; श. १८३५ पा. ४०
(३) म. वा. इ. खंड २ रा, पा. ३६

जिज्ञासापूर्तीसाठीं खालीं देत आहें. तो अभंग असा[४]:—

विठ्ठल निर्गुण निर्विकार। विठ्ठल सगुण संताकार॥
अवतरला मनोहर॥ परात्पर सांवळा॥ ध्रु॥
विठ्ठल संताचें रूपडें। प्रत्यक्ष पाहातां नेत्रापुढें॥
त्यासी न जाणती मूढें। विषयजाळीं गुंतली॥ ध्रु॥
मुक्ताबाई सकळ तनू। दिव्य दीप्ती तो हा भानू॥
प्रभा वटेश्वरू जगजीवनू। अति लावण्यु शोभतसे॥ २॥
ज्ञानदेव मुखकमळ। निवृत्तिदेव मुगुट झळाळ॥
सोपानदेव तो निढळ। आदिपुरुष रायाचे॥ ३॥
मुकुंदराज परमावधारीं। श्रवण देवाचे निर्धारीं॥
नेत्र चांगा विसोबा खेचरी। सोहं प्रकाश वरी झळकतसे॥ ४॥
वडवाळसिद्ध नागेश नासापुट। नामा कबीर दोन्ही होंट॥
जिव्हा महा मुग्दलभट। निंबा घांट गर्जतसे॥ ५॥
बाहुदंडा चोखामेळ। बहीरा पिसा वक्षस्थळ॥
जनमैत्र नागा कंठनाळ। जोगा माळ प्रेमाची॥ ६॥
हृदयारविंद योगी जन। आच्यूत सारंग दोन्हीं स्तन॥
उदर तो रेणुकानंदन। नाभी नरसिंह भारथी॥ ७॥
पाठकनामा कटी प्रदेश। मुधा पीतांबर सुरस॥
चरणारविंद रोहिदास। आणि सुरदास सांवता॥ ८॥
नारा महादा गोविंदा विटा। ह्या देवाच्या शुद्ध घंटा॥
जोति तोरड गोरा सेना सजना। तोरड एका जनार्दन॥ ९॥

भक्तवत्सल विठ्ठलाला ज्या भक्तांनीं अलंकृत केलेलें आहे त्यांचीं नांवें या अभंगांत श्रीएकनाथमहाराजांनीं गुंफिलेलीं आहेत. यांतील निंबा ऊर्फ निंबराज हे एकनाथांनंतर प्रसिद्धीस आले. हे नाथांचे शिष्य असून हे भजन करीत असतां यांच्या खांद्यावर विठोबा नाचला असें म्हणतात[५]! एकनाथांनंतर प्रसिद्धि पावलेल्या संताचें नांव—आणि आपल्या शिष्याचेंहि नांव एकनाथांनीं या अभंगांत दिलें असल्यानें, हा अभंग प्रक्षिप्त वाटतो. निंबा ऊर्फ निंबराजांचा काल इ. स. १६०० च्या सुमाराचा आहे. तेव्हां नामा पाठक १५ व्या शतकांतील कवि मानावा लागतो.

---

(४) श्री. एकनाथमहाराजांच्या अभंगांची गाथा; संपादक कै. तुकाराम तात्या इ. स. १९०३; अभंग २०५ पान १८७.

(५) मध्ययुगीन चरित्रकोश-पान ७२० निंबराज पाहा.

नामा पाठककृत द्रौपदीवस्त्रहरणाख्यान

या कवीच्या द्रौपदीवस्त्रहरणाख्यानाचा परिचय येथेंच प्रथम करून दिला जात आहे. नामा पाठकाच्या द्रौपदीवस्त्रहरणाख्यानाचें हस्तलिखित तंजावर सरस्वतीमहाल लायब्ररी येथें मला पाहाण्यास मिळालें असून[६] त्यानुसार या आख्यानाचा परिचय करून दिला जात आहे.

व्यासमहाभारताच्या सभापर्वांत द्रौपदीवस्त्रहरणाचा कथाभाग वर्णिलेला असून तेथील कथासूत्र आपल्या आख्यानासाठीं नामा पाठकानें घेतलें आहे. या आख्यानाचा विशेष असा आहे कीं, ज्याप्रमाणें कालिदासानें आपल्या 'शाकुंतल' या अमर काव्यासाठीं महाभारतांतील कथासूत्र तेवढें घेऊन बाकी सर्व कृति स्वतंत्र निर्माण केली त्याचप्रमाणें नामा पाठकानें केलेलें आहे. मूळ कथासूत्र महाभारतांतलें पण आख्यान मात्र स्वतंत्र रचलेलें. हें आख्यान अर्थात् ओवीबद्ध असून त्याच्या एकूण ३१३ ओव्या आहेत. म्हणजे ज्या कांहीं एकूण कवींनीं या द्रौपदीवस्त्रहरणकथाभागावर आपली काव्यरचना केलेली आहे त्यांत नामा पाठकाइतकी दीर्घ रचना कोणाचीच नाहीं असें दिसून येतें.

नामा पाठकाचा काल म्हणजे महाराष्ट्रांत, ज्ञानदेवांनीं लावलेल्या व नामदेवांनीं जोपासना केलेल्या भागवतधर्मास बहर येण्याचा काल! या कालखंडांत केवळ महाराष्ट्रच नव्हे तर सबंध भारत भक्तीनें दुमदुमत होता. विशेषतः श्रीकृष्णभक्तीस या काळांत प्राधान्य मिळालेलें होतें. नामदेवाच्या 'पुंडलीक वर दे'च्या घोषानें महाराष्ट्र गर्जत होता, तर कनकदास व पुरंदरदासांच्या वाणीनें कर्नाटक दुमदुमत होता. चैतन्यप्रभूंच्या 'हरिबोल'नें बंगाल गाजत होता तर उत्तर हिंदुस्थानांत सूरदासांच्या गायनावर लुब्ध होऊन प्रत्यक्ष श्रीकृष्णच त्यांच्यासमोर येऊन बसत होता! आणि राजस्थानांत जन्मलेल्या मीराबाईची 'मीरा के प्रभु गिरधर नागर'ची गोड लकेर कोण विसरेल? हे सर्व संत साधारणतः समकालीन असून सर्व कृष्णभक्त होते आणि त्यांचा आपापल्या प्रांतावर अत्यंत प्रभाव पडलेला असल्यामुळें सर्व हिंदुस्थान या सुमारास कृष्णभक्तीनें प्रभावित झालेला होता असें स्पष्ट दिसतें. कृष्णभक्तीच्या प्रभावांतून या कालाचें वाङ्मयदेखील सुटलेलें नाहीं यांत नवल तें काय?

नामा पाठकाचें द्रौपदीवस्त्रहरणाख्यानसुद्धां या तत्त्वास अपवादात्मक ठरणारें नाहीं. या ठिकाणीं त्याला श्रीकृष्णाचें गुणगान गाण्यास अधिक संधि मिळालेली असल्यानें तो येथें श्रीकृष्णसंकीर्तन केल्यावांचून कसा राहील? या द्रौपदीवस्त्रहरणाख्यानांतील पुष्कळसा भाग श्रीकृष्णपर आहे. येथें नामा पाठकानें श्रीकृष्णाचें 'आराध्यदैवत' म्हणून स्तवन केलेलें आहे, श्रीकृष्णाच्या मूर्तीचें सौंदर्य वर्णन केलेलें आहे. त्याच्या योगनिद्रेचेंहि वर्णन

(६) सरस्वतीमहाल लायब्ररी तंजावर; हस्तलिखित क्रमांक ८६८.

येथें येतेंच. शिवाय मदत करण्यासाठीं धांवत जाणारा भक्तवत्सल श्रीकृष्ण येथें वर्णिलेला आहेच; द्रौपदीस सभेंत मदत करण्यासाठीं आलेल्या, दुष्टांना न दिसणाऱ्या पण भाविक भक्तांनाच केवळ दिसणाऱ्या श्रीकृष्णाचें रूप या ठिकाणीं वर्णन केलेलें असून, द्रौपदीला अनेक वस्त्रें लेवविणाऱ्या श्रीकृष्णाची अद्‌भुत लीलासुद्धां ह्या कवीकडून कथित केलेली दृष्टोत्पत्तीस येते.

आख्यानाची नांदी

आपल्या कथेला आरंभ नामा पाठकानें, प्राकृत ग्रंथकारांच्या शिरस्त्याप्रमाणें गणेशस्तवन, शारदावंदन आणि गुरुजनांचें पूजन करीत व द्रौपदीवस्त्रहरणाख्यानाचें माहात्म्य वर्णन करीत केलेला आहे. आपल्या गुरूला नमन करीत नामा पाठक म्हणतो—

मग णमस्कारुनी गुरुराया। णीर्मल मती जी व्होवीया ॥
शरणागत स्त्रोतीया ॥ त्याच्या पाया दडवत ॥ ६ ॥
जे अणुभवाचे सागर। जे श्रवणसुखाचे माहेर ॥
जे दीणाचे कल्पांतर। त्याचा अभय कर मस्तकी ॥ ७ ॥
तेणे प्रसादे कुस्ण चरीत्र। कथा अैकवी पवीत्र ॥
व्यासवचन वीचीत्र ॥ जे भारती बोलीले ॥ ८ ॥

अशा प्रकारें गुरूचा आशीर्वाद मिळाल्यावर नामा पाठक आपल्या कथेचें माहात्म्य वर्णन करून नंतर कथा सांगण्यास प्रारंभ करतो.

पांडवांच्या राजसूय यज्ञाच्या वेळेस दुर्योधन इंद्रप्रस्थास हजर होता. त्या वेळेस पांडवांचें ऐश्वर्य पाहून त्याचे डोळे दिपून गेले. यज्ञसमाप्तीनंतर तेथून हस्तिनापुरास परत आल्यावर तें त्यांचें राज्य कसें आपलेंसें करावें म्हणून दुर्योधन विचार करूं लागला व त्यानें आपली सभा बोलावली.

कर्णु आणी वीकर्णू। शकुणी आनि दुस्वासनु ॥
आनीक थोर थोर येउन। सभेमाजी बैसले ॥ २० ॥
सभेसी आले सोमदंतु। आस्वथामा जयद्रथु ॥
भीस्म आनी द्रोणसुतु। यैसे वीर बैसले ॥ २१ ॥
सभा घनवटली अपार। महावीर थोर थोर ॥
ते वेळे दुर्योधन पुसे विचार। तुम्ही आवघी सागावा ॥ २२ ॥

परंतु सर्व सभेनें शकुनीला बोलवावें अशी दुर्योधनास विनंती केल्यावरून, दूत पाठवून त्याला पाचारण करण्यांत आलें व त्यालासुद्धां सल्ला विचारण्यांत आला. तेव्हां—

येरु सागे वीचारु। बळे णातुडे व्रकोदरु ॥
युध करीता आर्जुन वीरु। तोही कवणा नातुडे ॥ २८ ॥

फशे करावे कपट। खेलु खेलावा सारीपाट॥
तेणे पाडव वीर अदट। आतुडती जुतकर्मी॥ २९॥
धर्मासी वेसन जुतकर्माचे। खेळता खेळ हारवील साचे॥
सहज क्लेस तुटती तुमचे। यैसी माझी प्रतीइ॥ ३०॥

शकुनीनें सभेंत सांगितलेली मात सर्वांनाच पटली! दुर्योधनानें त्याचा भला, भला, म्हणून गौरव केला तेव्हां शकुनीच्या मनास अत्यंत आनंद झाला व तो म्हणाला–

खेलु खेलावा नेटाचा॥ डाव टाकावा राज्याचा॥
अपहार करुनी सर्वस्वाचा॥ धर्मवाचा गोवीजे॥ ३३॥
वीदुरु पाठवीजे पाचारु॥ परी हा कळो नेदावा वीचारु॥
अैसा करुनी सप्रधारु॥ मग बोलाउ पाठवीले॥ ३४॥

बोलावणें गेल्याबरोबर विदुर धांवत सभेंत आला. तेव्हां, आपली व पांडवांची पुष्कळ दिवसांत भेट झाली नाहीं म्हणून तुम्ही स्वतः पांडवांकडे जाऊन त्यांना घेऊन यावें असें दुर्योधनानें त्यास सांगितलें. विदुर त्याप्रमाणें त्यांना आणावयास निघाला असतां वाटेंत तो विचार करूं लागला कीं, दुर्योधन कोणत्या कार्यास्तव पांडवांना बोलावणें करीत आहे? कोणती अनिष्ट गोष्ट त्यानें योजिली आहे? असा विचार करीत जात असतां त्याला दुर्योधनानें पांडवांना बोलावणें पाठविल्याचें कारण उमगून आलें.

म्हणे कासीयासी बोलाविले। कवन कार्य कुडे रचीले।
मग वीदुरा जाणवले। हे हो भले नव्हे॥ ४०॥
म्हणे होणार ते न चुके। जे लाहीले सकर्म रेखे।
त्यासी आडवे कवन ठाके। मग मौनेची चालीला॥ ४१॥

जातां जातां मार्गांत त्याला अनेक मोठमोठालीं अरण्यें लागलीं, उपवनें दृष्टीस पडलीं. तीं ओलांडल्यावर पांडवांच्या अमरपुरीचें दर्शन विदुराला झालें. नामा पाठक त्या नगरीचें वर्णन करतो—

लंघुणी वने उपवने थोरे। पुढे देखीले पौलीका पागारे॥ कळस झळकती आपारे। अमरपूरी यैसी पैं॥ ४२॥ म्हणे कैसे हो नगर॥ सर्व सुखाचे सेजार॥ कीं ब्रह्मविद्येचे भाडार॥ फुटले आकुर चैतन्यो॥ ४३॥ कीं सर्वही सुखचि दीसे। मज दावीले कृपावेसे॥ 'की स्वानुभवाची मानसे॥ येक वाढली समुदाये॥ ४४॥ की ब्रह्मवृक्षासी फुटले कोभ। तेणे दाटतसे नभ॥ तैसे कलस स्वयंभ॥ आपेआप सोभतसे॥ ४५॥ पूर्वी समुद्रमंथन केलें॥ तैं चौदा रत्न प्रसवलें॥ तेथुनी आमुतबीदु उसळले॥ ते पसरले भुतळीं॥ ४६॥ तेची बीज कणीका फुटली॥ तेचि हे भुतळी पसरली॥ तेची पताकामीसे मीरवली॥ नानारंगी परीयेसा॥ ४७॥ हेलाव तिचीयेन मीसे॥ मुत्काची सोभा प्रकासे॥ वैकुंठीची रचना यैसी तैसे॥ नगर सोभतसे॥ ४८॥ वेकुंठपुरुपती आत्मसुख॥ रचीली हे नगरीका॥ ते

मज मतीमंदा येका ॥ वाचा केवी वर्णवे ॥ ४९ ॥ सोभती राजबीदी राजसा ॥ परी तेथे सात्वीकाचा ठसा ॥ जन चीतीती रुसीकेसा ॥ हृदई स्मरण करीताती ॥ ५० ॥ राजस तामस तेथे णाही ॥ नगरी सात्वीकाची पाही ॥ सच्चीदानंद ज्याचा हृदइ ॥ तेथे दोनी कैची पैं ॥ ५१ ॥ जो आमुत्काते मुक करी ॥ तो वर्तत आसे त्या माजारी ॥ हरी ज्याचे हृदयाभीतरी ॥ ते आनुभवीये जानती ॥ ५२ ॥ मढ मंडप सीवालय । धर्मशाळा बरवीया ॥ पुराण कथा नित्य जया ॥ वेद ध्वनी गर्जती ॥ ५३ ॥ सप्तखणी दामोदरे ॥ पंचखणी मनोहर ॥ तीखणी सुंदरे ॥ दुखणी तेथे आथीली नाह्री ॥ ५४ ॥ जरा वार्धक्य नाही ॥ देखा तरुण लोक सर्वही ॥ हरीदास आणी सात्वीक पाही ॥ यावाचुनी आन नेणती ॥ ५५ ॥ आध्यात्मनीष्टा सर्वजन ॥ त्यांसी नीत्य स्मरण दर्शन ॥ अनुवाच्य हे वचन ॥ सर्वथा आन नेणती ॥ ५६ ॥ यैसे सुदर ते नगर ॥ जेथे नादतसे सारंगधर ॥ बोल्रेची करावे फार ॥ तरी वेदा न कळेची ॥ ५७ ॥ नदीया तडाग कुप ॥ बावीया पोखरणी समीप ॥ व्रक्षाचे दीसती मडप ॥ छाया भुमी सोभतसे ॥ ५८ ॥

अशा त्या सर्वसुखसंपन्न व हरिकृपा असलेल्या, इंद्रप्रस्थांत विदुर आला व पांडवांची भेट घेऊन त्यानें आपल्या आगमनाचा हेतु त्यांना निवेदन केला. धर्मालाहि विदुराप्रमाणेंच दुर्योधनाच्या मनांत कांहीं काळेंबेरें असावें असें वाटलें. त्याचप्रमाणें या वेळेस त्याला श्रीव्यासांनीं केलेला उपदेशहि आठवला—

व्यासदेवी सागीतीली णीती ॥ तुम्ही नव जावे हस्तनापुराप्रती ॥ हृदई धरुनी कुस्णमूर्ती ॥ इंद्रप्रहस्तीच राहावे ॥ ६४ ॥ दुस्टाचे मुख न पाहावे ॥ आनी दुर्बुधीसी णातळावे ॥ आधर्मासी स्रवण न करावे ॥ न पहावे पाप द्रीस्टी ॥ ६५ ॥ उचलोन कोठे नव जावे ॥ असग सगती ण बैसावे ॥ वर्म कोन्हाचे न बोलावे ॥ आनी न खेळावे जुतकर्म ॥ ६६ ॥ उत्तर पैजेचे णोबलावे ॥ हेळण वैरीयाचे न करावे ॥ अधर्मासी नातळावे ॥ यैसे व्यासदेवी सागीतले ॥ ६७ ॥

आपल्याला व्यासांनीं सांगितलेली नीति जेव्हां धर्मानें विदुराला सांगितली आणि दुर्योधनाचीं दुष्कृत्यें वर्णन केलीं तेव्हां, 'श्रीकृष्ण तुमचें रक्षण करीत असतां तुम्हांस भय कसलें ?' असें धर्मास सांगून दुर्योधनाच्या शब्दास मान द्यावा अशी विनंती विदुरानें त्याला केली. कुंतीनेंसुद्धां धर्माला निश्चितपणें जाण्यास सुचविलें तेव्हा सर्वांनी निघण्याची तयारी केली. मग—

वेगी रथ पाळाणीला ॥ धर्मु बंधु सहीत आरूडला ॥ मणी आदी पुरुस स्मरीला ॥ सेजी द्रोपदी बैसवीली ॥ ७२ ॥ देखा कुजर मदोन्मत ॥ आस्व भूमी नृत्य करीत ॥ दळभार घोश गर्जत ॥ वाधे अमीत्य वाजती ॥ ७३ ॥ शंख भेरी मृदंग काहाळा ॥ टाळ घोळ सुंती मेळा ॥ कुस्ण नामाचा येक वेळा ॥ मंगळ तुरे वाजती ॥७४॥ पताका चामरे ढळती ॥ छेत्रे नानापरी झळकती ॥ डंबर ढाळ गगण चुंबीती ॥ भाट वर्णीती परोपरी॥७५॥

आमीत्य रथाचे घडघडाट ॥ जवळील वीर सुभट॥ काळासी करीती कुठपीठ ॥ वीर सुभाट आर्जुनासारीखे ॥ ७६ ॥ यैसा सेणेसी परीवारला ॥ धर्मराज हो चालीला ॥ जैसा गगणी सूर्ये उगवला ॥ तैसा मीरवला दळभारू ॥७७॥ वेगी आले हस्तणापुरा ॥ हरुसे जाला जे स्वरा ॥ मग तो येऊण सामोरा ॥ आळींगन दीधली ॥७८॥ द्रोपदी राउळांगण प्रवेशेली ॥ ते भानुमतीया आलींगली ॥ सर्वेची गांधारी भेटली ॥ बहुत हरुशे तयासी ॥ ७९ ॥ बरवे चरण प्रक्षाळण केले ॥ पाचही पांडव पुजीले ॥ राउळांगणामाजी णेले ॥ मग भोजने सारीली ॥ ८० ॥ कर्पुरे सहीत दीधले वीडे ॥ समस्तासी वेगाडे ॥ जेवादी चंदन कस्तुरी पुढे ॥ परीमळ द्रव्ये दीधली ॥ ८१ ॥ वस्त्रे आळंकार अमीत्ये ॥ आगीक जाबुनद बहुत ॥ दुर्योधन आसे समर्पीत ॥ पाडवासी परीयेसा ॥८२॥ मग आमृत वचने बोलीले ॥आमुचे भाग्ये उदेले ॥ बहुता दीवसा साभालीले ॥ राऊळ आले येथवरी ॥ ८३ ॥

अशा प्रकारें पांडवांचें आगतस्वागत दुर्योधनाकडून केलें गेलें व तो दिवस विश्रांति घेण्यांत निघून गेला. दुसऱ्या दिवशीं आपलीं प्रातःकर्में उरकल्यावर धर्मराज आपल्या चार बंधूंसह सभेंत येऊन बसला. त्या ठिकाणीं अन्य कौरववीरसुद्धां आलेले होते. या सर्वांची सभेंत धर्मचर्चा चालू झाली. कांहीं वेळ चर्चेंत घालविल्यावर दुर्योधनानें चर्चा बंद करून मनाची जरा करमणूक व्हावी, आलेला आळस झडून जावा म्हणून कांहीं खेळ खेळावा असें सभेस सुचवून नंतर भीमास, "आपण सारीपाट खेळूं या" अशी गळ घातली ! तेव्हा कांहीं जण म्हणाले, " नको ! नको ! भीम बलवान् असल्याने तो कपटानें खेळेल !"

तें ऐकून भीमास राग आला. त्यानें सांगितलें, " आम्ही फांसे टाकतों, तुम्ही पाहावें आणि ' नेमाचें ' उत्तर द्यावें ! " अशा रीतीनें फांसे आणण्यांत आले व डाव सुरू झाला.

या डावांत कपटी दुर्योधनानें शकुनी आणि दुःशासनाच्या सल्ल्यानें कपटी फांसे आणविले व त्यानें डाव जिंकला. तें पाहून भीम खवळला व त्यानें मेघगर्जना केली. आकाशालादेखील त्या मेघगर्जनेनें कंप सुटला. मग दुर्योधनाची काय कथा ! त्याला फार भीति वाटूं लागली. मग दुर्योधनास बाजूस सारण्यांत आलें. भीमासहि बाजूस जाण्यास सांगून शकुनीनें खेळाचीं सूत्रें आपल्या हातांत घेतलीं व भीमाच्याऐवजीं धर्मास खेळण्यासाठीं पाचारण केलें !

पुनः दुसरा डाव चालू झाला. शकुनीनें अनीतीनें खेळण्यास सुरुवात केली; व त्यांत धर्म हरूं लागला. या खेळांत धर्म प्रथम देश, दुर्ग, भांडार हरला; नंतर त्याच्या अवघ्या राज्याचें हरण केलें गेलें. तदनंतर आपण जर डाव पुनः हरलों तर १२ वर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास या अटीवर धर्म पुनः द्यूत खेळला व हरला !

आतां सर्वस्व गेल्यामुळें धर्म स्तब्ध राहिला. सर्व सभा तटस्थ झाली ! अशा परिस्थितींत निर्वाणीचा उपाय म्हणून धर्मानें आपल्या भावांसह द्रौपदी पणास लावली

आणि त्यांतहि तो हरला ! तेव्हां खेळ बंद झाला ! धर्मानें शरमेनें मान खालीं घातली ! सर्व सभेंत खळबळ माजली. भीष्म-द्रोण-विदुर सभेंत धांवत आले. त्यांना पांडव दीन होऊन बसल्याचें दृश्य दिसलें ! कर्माची गति गहन असते, अनाकलनीय असते, म्हणूनच धर्माची मति फिरण्याचें आश्चर्य घडलें !

मग दुर्योधनानें दुःशासनास द्रौपदीला सभेंत घेऊन येण्याची आज्ञा केली. त्यानेंहि राणीवशांत जाऊन द्रौपदीला त्याप्रमाणें सभेत येण्यास सांगितलें. तेव्हां द्रौपदी म्हणाली—

आहो ऐका दुस्वासना ॥ तुम्ही तऱ्ही आनीजे मना ॥ सभेसी नेतां परांगना ॥ लाज तुम्हा लागेल ॥ ११० ॥ मज तेथे कासया नेता ॥ कोण कार्यें सांगा त्वरीता ॥ आहो मी पांडवाची कांता ॥ यैसे नीरुते जानावे ॥ १११ ॥ तुम्ही सोमवैसी राजे थोर ॥ सांडा आभीमान अवीचार ॥ येणे कीर्ती लोकांतर ॥ काय मी खेल तुमची ॥ ११२ ॥ तुम्ही सीकवीता आणीकासी ॥ परी आनुचीत घडले तुम्हासी ॥ कपटे जींतीले पाडवासी ॥ कोण पुरशार्थ साधीला ॥ ११३ ॥ पोटी बाधोनी पाशान ॥ अक्षोभ जळी तरले कोन ॥ करुणी इगळाचे अथरूण ॥ सुख कोण पावला ॥ ११४ ॥ भुजगाचे पुसी दीधलीया पावो ॥ आणी तया कैचा उरला ठावो ॥ वीचारे साडवला रावो ॥ तुम्ही वुधी सीकवा ॥ ११५ ॥ दुस्ट कर्मे कवण तरला ॥ कवन काळेसी जयो पावला ॥ वीस घेउनी आमर जाला ॥ यैसे अैकीले नाही ॥ ११६ ॥

द्रौपदीचें हें जहाल वचन दुःशासनाला झोंबलें; पण तो तिला म्हणाला, “ …तु धीट वो वाजट ॥ कीती बोलसी णीकट ॥ सोडी सोडी वो खटपट ॥ म्हणोनी केसी धरीयेली ॥ ११७ ॥ ” तेव्हां तिला अत्यंत विषाद वाटला. तिला वाटलें—“ बापरे कर्मा बळीवंता ॥ पंचानन सींव्हाची काता ॥ कोल्हे कैसे गाजीताती ॥ ”

दुःशासनानें तिला वेणीस धरून फरफटत सभेंत नेलें. पुढें दुःशासन आणि मागें फरफटत येणारी द्रौपदी ! तें दृश्य पाहून कौरवांच्यांत हास्याचा गदारोळ उडाला. दुर्योधनानें तिला पाहिलें मात्र ! त्याच्या मनांत अभिलाषा उत्पन्न झाली व तो द्रौपदीला म्हणाला—‘ हे सुंदरी, ये ! माझ्या जानूवर येऊन बैस !’ तें दुष्ट वचन ऐकतांच द्रौपदीनें गर्जना केली—

अरे दुस्टा दुर्जना दुर्योधना ॥ हे काय अलं रे तुझीया मना ॥ तु रे परावीया अंगना ॥ पापदृस्टी पातोसी ॥ १२५ ॥ अभीळासीता रे परनारी ॥ तुज कस्ट होतील रे भारी ॥ आरे तु पापीया दुराचारी ॥ काय णीस्टुर बोलीलासी ॥ १२६ ॥ तुझीये माडीवरी बैसो काळु ॥ तुझे दुस्टी लागो रे ईंगोळु ॥ पडो वीजु न लागता वेळु ॥ डसो काळु जीव्हेसी ॥ १२७ ॥ जे मीरवे भीमा करी ॥ ते कळवली रे नोवरी ॥ ते बैसे तुझीये जानुवरी ॥ तणे संगे सुक पावसी ॥ १२८ ॥ यैसीये गदेचा घावो ॥ पाहेल तुझीये माडीचा ठावो ॥ इतुके अैकोणी दुर्योधन रावो ॥ कोपेंकरुनी खवळला ॥ १२९ ॥

तो म्हणाला—

धरा धरा ईस मारा ॥ बहुत बोलीली रे सैरा ॥
वस्त्रे हीरोनी नग्न करा ॥ या भ्रतारा देखत ॥ १३० ॥

दुर्योधनाची ती क्रुद्ध वाणी ऐकून द्रौपदी श्रीकृष्णाचा धांवा करूं लागली—

म्हणे कुस्णा कमळनयेना ॥ वीस्वव्यापका मनमोहना ॥ अनाथनाथा नारायेणा ॥ अझुनी का न पावसी ॥ १३५ ॥ पाहाता तुझी रे वाट ॥ मनामाजी वाटती कस्ट ॥ तुजकारणे फुटे कठ ॥ हृदये होते दो ठाई ॥ १३६ ॥ जयजय कुस्णा भगवंताते ॥ कल्पव्रक्षे कल्पलते ॥ सच्चीदानदे पर्न भरीते ॥ वैकुठपीठनीवासीनी ॥ १३७ ॥ मुर्ती मात्रे अर्थसहीते ॥ स्पुर्ती मात्रे ब्रह्मचरीते ॥ चैतन्यमात्रे सर्वगते ॥ सर्वसाक्षी तु कुस्णे ॥ १३८ ॥ पीसें आल्वी दाही दीशा ॥ साडुनी देह्याची आशा ॥ तैसी आळवी रुसीकेशा ॥ म्हणे जगदेशा पाव वेगी ॥ १३९ ॥ धाव धाव यादवराया ॥ सोईरीया बंधु जी सखया ॥ वेगी पावे तु भाईया ॥ झनी वेळ लावीसी ॥ १४० ॥ जासी आनीकाचीया काजा ॥ की आव्हेर करुनी रे माझा ॥ कुस्णा राखे माझी लज्जा ॥ आपुली पैजा साभाली ॥ १४१ ॥ सखा जीवलग सागाती ॥ वीतगोत धनसंपती ॥ पाव पाव यैसीये आकाती ॥ झन वेळ लावीसी ॥ १४२ ॥ तुची माझी बापमाये ॥ गणगोत आत्मा होये ॥ आझुणु तुज का करुणा नये ॥ आगे कुस्णे जननीये ॥ १४३ ॥ सुंदरे सावळे डोळसे ॥ कुस्ण वृंदावननीवासे ॥ योगीमानस-राजहंसे ॥ कोठे गुंतलासी माउलीये ॥ १४४ ॥ कोठे गे तुझा वोरस गेला ॥ कवणे तुझा धावा केला ॥ काये गे माझा वीसर पडीला ॥ तेनेची गुन जनणीये ॥ १४५ ॥ तु भक्ताची माउली ॥ की मुनीजणाची साउली ॥ तेथेची गे वस्ती केली ॥ मग माझे स्मरन नव्हेची ॥ १४६ ॥ की गे भक्ताचे हृदई ॥ राहीलीस आनदाचे डोही ॥ माझा वीसर पडीला गे पाही ॥ तेणेची गुणे जननीये ॥ १४७ ॥ राजसभेमाझारी ॥ कौरव जेवीता वो कुसरी ॥ व्रीडे नीघाले ते आवस्वरी ॥ तै तुझे म्या मुख पाहीले ॥ १४८ ॥ त्या वो समस्ता देखता ॥ भुजा रचीलीया आनंता ॥ लज्या राखीली गोपीनाथा ॥ आता का वेळु लावीसी ॥ १४९ ॥ होसी बंधु रे सोईरा ॥ जतन करीसी उंतरा ॥ पावे वेगी गा दातारा ॥ करुणाघना मुरारी ॥ १५० ॥ तरी मी पाहो कोणाची वास ॥ कोण पुरवील माझी आस ॥ झनी तु होसी गे उदास ॥ आगे कुस्णे जणणीये ॥ १५१ ॥ कुस्णे कुस्णे कमळनयेने ॥ वीस्वव्यापक मनमोहणे ॥ तु पाव वेगे करुनाघना ॥ कोठें गुंतलीस माउलीये ॥ १५२ ॥ अैसी जीवाचीये करुणा ॥ तुज का न ये कमलनयेना ॥ नीस्टुर जालासी जगजीवना ॥ का वेगी न पवसी ॥ १५३ ॥ ... करुना रसे बोभायेली ॥ दीर्घस्वरे नीधी उमटली ॥ तेणे मेदनी थरारीली ॥ खळबळी सुटली समुद्रा ॥ १५८ ॥ करुनाशब्दे अतीसये जाला ॥ तेने उदीले आंतराळा ॥ स्वर्ग मृत्य पाताळा ॥ करुनारसे डोलतसे ॥ १५९ ॥ त्रीकुट फोडुन आदळला ॥ जेथे श्रीकृष्ण होता पहुडला ॥ नीधा उमटला तेथे पैं ॥ १६० ॥

ज्या वेळेस द्रौपदीची कारुण्यानें भरलेली आर्त हांक त्रिभुवनास भेदून श्रीकृष्णाच्या कानीं पडली त्या वेळेस तो क्षीरोदकाच्या पृष्ठभागावर मोत्यांच्या मंचकावर योगनिद्रा घेत

पहुडला होता. रुक्मिणी चरण चुरत होती; नारद ब्रह्मवीणा घेऊन भक्तिगीत गात होता, श्रीहरि ब्रह्मसुखाची समाधि अनुभवीत होता. द्रौपदीची ती आर्त हांक ऐकल्याबरोबर भक्तवत्सल श्रीकृष्ण लगबगीनें उठला आणि त्याच्या चक्षूंसमोर दुर्योधनाकडून गांजळी जात असलेली द्रौपदी दृष्टीस पडली ! तेव्हां त्याला स्तब्ध राहावतें कसलें ?

मग लगबग जाली देवासी ॥ बैसले साडीले आवघीयासी ॥ द्रीस्टी न पाहेची गरुडासी ॥ वेगी रुसीकेसी धावनीला ॥१८८॥ गरुडे देखोनी द्रीस्टी ॥ तोहीं धात्रे पाठोपाठी ॥ म्हणे कोन्हाकारणे जगजेठी ॥ आजी मज वीसंबला ॥१८९॥ तव तो उद्वोगे लवलाहे ॥ गरुड मागे धावताहे ॥ लाउनी मगाचे पाये ॥ तऱ्ही नातुडे गोपाळु ॥१९०॥ रुक्मीनी म्हणे नारदासी ॥ काय संकट पडीले देवासी ॥ की धावीले आकांतासी ॥ कोन्या भत्काकारने ॥१९१॥ पाहा हो भत्काची कारने ॥ देव केले वो धावने ॥ भक्तालागी नारायेने सगुन रुप धरीयेले ॥१९२॥ भक्तालागी भुलला ॥ म्हणोनी देव धावीनला ॥ की पाडवाचा शेब्द ऐकीला ॥ देव कानी अवचीत ॥१९३॥ की ते द्रौपदी सुंदरी ॥ कोन्ही गाजीली दुराचारी ॥ म्हणोनी धावीनले मुरारी ॥ गरुड पाठीशी टाकुन ॥ १९४ ॥ दडवा दडवी हरी धावतु ॥ तैसाची गरुड मागे मागे येतु ॥ मनाचे पाये लावीतु ॥ परी नातुडे गोपाळा ॥१९५॥ येउनी द्रौपदी जवळी अनतु ॥ पुढा उभा तीस्टतु ॥ पीतांबर मुखावरी वारितु द्रौपदीचे परीयेसा ॥१९६॥ म्हने झणे वस्त्र आवुडीती ॥ धरीली भक्ताची काकुलती ॥ म्हणोनी पीतांबरु श्रीपती ॥ द्रौपदीवरी टाकीला ॥ १९७ ॥

त्या पीतांबरामुळें धरणीचें अंग थरारलें. सुगंधी सुवास सुटला. तेव्हां द्रौपदीनें नेत्र उघडून पाहिलें तों तिला श्रीकृष्णाचा पीतांबर दिसला ! तिचा कंठ सद्गदित झाला. धर्मानेहि तो पीतांबर पाहिला व त्याच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला ! तदनंतर, भीम पार्थ, नकुल, सहदेव यांनाहि कृष्ण आल्याचें जाणवलें; पण कोणीहि कोणाजवळ बोललें नाहीं ! नामा पाठक म्हणतो—

आला गेला हे भक्ती ॥ बाग व्यापकु श्रीपती ॥ की ते हृदईची ध्यानमुर्ती ॥ तेथचि प्रगटली ॥ २०३ ॥ जो आतबांह्य व्यापुनी भुमी ॥ जो राहीला स्थावर जंगमी ॥ म्हणोनी सेब्द होतसे व्योमी ॥ हा उन्मेषु जयाचा ॥२०४॥ परे परते जव पाहे ॥ आनी परेसी व्यापुनी राहे ॥ तो हा पस्यतीस होये ॥ रुपवंतु ॥२०५॥ मध्यमे जो वीस्तारु ॥ ज्यांपासुनी फुटे सब्दांकुरु ॥ मग शब्द होउनी साकारू ॥ वैखरीसी ये ॥२०६॥ परी तो शब्दातीत परब्रह्म पुतळा ॥ शब्द वागेस्वरी ज्याची कळा ॥ जीवाची जीवन कळा ॥ परी अवघीया तु ॥ २०७ ॥ कार्य क्रीया आणि कर्ता ॥ हे आवघी ज्याची सत्ता ॥ हाची वर्नीता वेदांता ॥ परि आनुभवा आकळला ॥२०८॥ त्याही दर्शना आगोचरु ॥ म्हणोनी चालवीती मछरू ॥ परमात्मा आपरांपरु ॥ परी भक्तीसी भुलला ॥ २०९ ॥ पांडवजन प्रतीपाळकु ॥ यैसा नामाचा घोसु ॥ मग तो येउनी यादवकुळटिळकु ॥ आळगीले समस्तासी ॥२१०॥ चै भुजी कुवाळीली ॥ आवस्थे करूनी कस्टली ॥ कृष्ण मेघशामे नीव-

चीली ॥ आमृत दस्टी पाहोनी ॥२११॥ दुर्जनाची द्रीस्टी तांतळी ॥ वरी आमृत कुस्ण-द्रस्टी जाली ॥ देखोनी मुर्तीत सावली ॥ मग वीसरली ते दुख ॥ २१२॥ जैसी ठेवा कृपनासी ॥ निधान सापडे आनायासी ॥ मग तो आठवी दरीद्रसी ॥ तैसे द्रौपदीसी पै जाले ॥२१३॥ की प्राकृता होये ज्ञानसीधी ॥ की योगी राहे समाधी ॥ वीसरे चीताची आदी ॥ तैसी ते द्रौपदी तटस्त ठेली ॥२१४॥

श्रीकृष्णानें द्रौपदीचा भक्तिभाव बघितला आणि तिच्या भक्तीमुळें तो तिच्या पाठीशीं उभा राहिला. ज्याचें सारसर्वस्व परमेश्वरापाशीं एकवटलेलें आहे त्याची दृष्टि प्रपंचांत भ्रमत नाहीं. त्याच्यावर परमेश्वराची निरंतर कृपादृष्टि असल्यामुळें तो कधींहि दुःखी नसतो. तेव्हां परात्पर श्रीकृष्णाचें रूप पाहून पांडवांच्या मनास हर्षच झाला. द्रौपदीच्या पाठी-मागें उभ्या असलेल्या श्रीकृष्णाचें रूप कोणास मोहविणार नाहीं ? नामा पाठक वर्णन करतो--

सावली डोळस सगळ मुर्ती ॥ बाही बाहेवट सोभती ॥ मुखावरी स्वेदकण दाटती ॥ पुस्टी वीरगुंठी सुटली ॥२२५॥ कंठी मुक्ताफळाचे हार ॥ गळा वैजयंती मनोहर ॥ सुंदर वेल्हाळु उदर ॥ कौस्तुभमणी शोभतसे ॥ २२६ ॥ रत्नजडित कंठी मेखला ॥ वीर कंकणे मुद्रीका नीर्मला ॥ बाहुदंडभुजा सरळा ॥ नखे सोज्वळ ॥२२७॥ शंख चर्क गदा पद्म ॥ मंडीतमुर्ती मेघशाम ॥ श्रीवछलाछनाचे पाद उत्तम ॥ हृदई मीरवतसे ॥२२८॥ पीताब-राची झळाळा ॥ जेवी वीजूचे घनपटल ॥ सुगंध धावतसे परीमळ ॥ दीसे झळाळ रंगाची ॥ २२९ ॥ चरणी तोडर बीदाचा ॥ की तो समुदाव वेदाचा ॥ अवस्वरू देखोनीया सुखाचा ॥ वांकी रूपे गर्जती ॥ २३० ॥

त्या गजबजलेल्या कौरवसभेंत द्रौपदीच्या मागें येऊन उभा राहिलेला श्रीकृष्ण, कौरव मात्र पाहूं शकत नव्हते ! ज्यांची दृष्टि प्रपंचांत गुरफटलेली आहे ते हें सुंदर रूप कसें पाहूं शकणार ?

क्रोधानें संतप्त झालेला दुर्योधन, दुःशासनावर रागावला ! अजूनहि तूं उभा कां ? तेव्हां दुःशासनानें द्रौपदीस विवस्त्र करण्यासाठीं तिच्या निरीस हात घातला व ती ओढली—तेव्हां—

आंतील पदरु वेगळा केला ॥ तव भीतरी दुजा देखीला ॥ सुगंध परीमळ घोळला ॥ तोही आसुडीला लवलाहे ॥ २३६ ॥ तव भीतरी देखीली पीवळा ॥ पत्रवेलीचा पाटोला ॥ धारवट पुतळीयाचा ॥ फुले कीमीरी कलहाई काळानीळा ॥ सुरेख पाटाउ ॥ २३७ ॥ पदरी मुक्त शोभती ॥ २३८ ॥ सोनेसळे आनी सेवंती रंगाचा ॥ काळा कल्हेरी मेचुचा ॥ मुगवी सुरंगे चुबचुबी ॥ रंगाची नक्षेत्रे वरी कळंबी ॥ गंगासागरी आनी कुसंबी ॥ नीखळ सुध मुक्ताफळाची ॥ येके कनक पात्र शुशोभीत ॥ २३९ ॥ नवरत्न जाळीयाची ॥ येक करळे गोपाळवाणी ॥ चुबचुबीत रंगाचीया वेलीची ॥ शुध नीले जडीयेले ॥ २४० ॥

खाणी ॥ न कळे वीचीत्र करनी ॥ हस्तलीखीत गोजीरे ॥ २४१ ॥ रंग बाहाल्य आती साजती ॥ गरुड रूपे झळकती ॥ दीव्य वस्त्राची पाहाता गती ॥ तेही नीगुती सोभतसे ॥ २४२ ॥ वस्त्रे नाना चीत्रीव उमाळे ॥ तैसी नानापरीची पटकुळे ॥ तेही नीघती सोज्वळ ॥ दुर्योधन भोवडी डोळे क्रोधे करुनी परीयेसा ॥ २४३ ॥ मग तो हुंकारे गर्जतु ॥ दुस्यासनु वस्त्रे आसुडीतु ॥ तव भीतरी क्षीरोदकु देखतु ॥ सुभ्रवर्ण नीर्मळ ॥ २४४ ॥ पीवळा लाजव बोटधारी ॥ रत्न जडीली पदरी पदरी ॥ म्हनती कैसी बुधीवंत सुंदरी ॥ विस्मो करीती कौरव ॥ २४५ ॥ आनीकही आसुडती वस्त्रे ॥ तव गर्भसुती देखती वीचीत्रे ॥ सेलारी सकरे पवीत्रें ॥ तेही आगाध नीघाली ॥ २४६ ॥ पातळ पापेचे परीकर ॥ वीचीत्र सुताचे आरुवार ॥ तगटी लखलखीत पदर ॥ तेही अगणीता नीघाली ॥ २४७ ॥ मग ते टोकेखर पातळा ॥ बरवे लांब रुंद बाहाला ॥ कस्तुरी काळे नीळा ॥ वाघंबरी गुंजावर्णी ॥ २४८ ॥ चीकवी पोफळीया येकवटा ॥ चीनधारीया धोवटा ॥ येकापरीस येक नीटा ॥ कोन्या पेठा नीपजलीया ॥ २४९ ॥ शुत्ध सुवर्ण ताराची ॥ चीत्रवीचीत्र पुन्याची ॥ आनी मयुर राज-हंसची ॥ पुतळीया झळकती पालवी ॥ २५० ॥ पीत शामवर्ण देखा ॥ सुभ्र कुसुंब्या नाही लेखा ॥ कुस्णवर्ण सुध भुमीका ॥ आणी हीरवी तेही पे ॥ २५१ ॥ पदरी लीहीले घोडे शाहाडे ॥ पदरा आड पदर पडे ॥ पाउल न दीसे उघडे ॥ या दुर्जना पाहावया ॥ २५२ ॥

अशा प्रकारें वस्त्रावर वस्त्रें निघूं लागलीं असतां दुर्योधन मनांत हबकला ! सर्व सभेच्या नजरा कुंठित झाल्या ! द्रौपदीला सहस्र भुजांनीं वस्त्रें पुरविणाऱ्या सारंगधराची लीला कोण वर्णू शकणार ? ' द्रौपदी पतीव्रता सीरोमणी ॥ सत्त्वधीर्याची खाणी ॥ सुक्षेम-रुप देव येउनी ॥ चरीत्र पाहे तयाचें ॥ २५९ ॥ ' दुर्योधनाला भगवंताचा महिमा कसा कळणार ? त्याचा क्रोध वाढला व त्यानें दुःशासनास वस्त्रें ओढण्यास पुनः सांगितलें ! तेव्हां—

दुस्यासनु वस्त्र आसुडीता ॥ देखे पीतांबरु झळकता ॥ जैसे मेघी वीद्युल्लता ॥ त्यांहुनी आधीक झळाल ॥ २६२ ॥ मग नामांकीत सुंदर ॥ साजीरी आती मनोहर ॥ रामकुस्ण आपारे ॥ माधव माना की ते ॥ २६३ ॥ काही नारायेन नामाची ॥ अच्युतानत केसेवाची ॥ मुरारी हरी गोवींदाची ॥ शुशोभती वस्त्रो ॥ २६४ ॥ गोपाळ गाई मुर्ती सर्वगडे ॥ चतुरभुज अस्टभुज देव्हडे ॥ गोकुळ मथुरा वृंदावने पुढे ॥ यैसी नीघती जाली ॥ २६५ ॥ मग नीघाली आयोध्या नगरी ॥ गोपुरे कलसु सुवर्ण हारी ॥ सुंदर दीसती कुसरी ॥ मग द्वारावती नीघाली ॥ २६६ ॥ कैसी नीघती शेख चक्रनामे ॥ आयोध्या सोभती गदापद्म उत्तम ॥ ते देखोनीयां द्रोण भीस्मे ॥ मग विदुरा जानवीले ॥ २६७ ॥

अशा रीतीनें द्रौपदीचीं वस्त्रें फेडतां फेडतां दुःशासनाचे हात थकले. सभेंत दोन्हीकडे वस्त्रांच्या गगनचुंबी पर्वतप्राय राशी दिसत होत्या. तेव्हां दुर्योधनानें त्यास ' पुरे आतां ! '

असें म्हणत वस्त्रें भाण्डारांत ठेवण्यास सांगितलें. तेव्हां एक नवलाव घडला! तीं सर्व वस्त्रें गुप्त होऊन तेथें एकहि वस्त्र उरलें नाहीं.

मग द्रौपदीनें दुर्योधनाला परत खेळाचा डाव मांडण्यास सांगितला. परत तेच कपट फांसे आणले गेले व खेळ चालू झाला. द्रौपदीनें फांसे हातांत घेतले, श्रीकृष्णाचें मनांत स्मरण करीत डाव टाकला आणि त्यांत ती जिंकली! प्रथम तिनें आपणांस सोडवून घेतलें, मग धर्म व भीम, तदनंतर पार्थ आणि शेवटीं नकुल व सहदेव यांनाहि तिनें डाव जिंकून मुक्त केलें. ती परत जेव्हां डाव टाकूं टाकली तेव्हां शकुनी म्हणाला कीं, हिचे फांसे वेगळेच दिसतात! या फाशांनीं ती आपणां सर्वांस जिंकून घेईल! तेव्हां कौरवांनीं तो डाव मोडून टाकला.

अशा प्रकारें या कठीण आपदेंत श्रीकृष्णानें पांडवांचें सत्त्व राखलें! दुर्योधन सभेंतून निघून गेला. त्याच्या मागोमाग भीष्म व द्रोण पण उठले. मग पांडव चित्रशाळेंत आले; तेव्हां तेथें त्यांना श्रीकृष्णाचें दर्शन घडलें—

तनु सावळी मनोहर॥ चरनी वांकी आनी तोडर॥ चतुर्वेद श्रुतीसर॥ वांकी रुसे गर्जती॥२८१॥ घोटी नीलीयाची गाठी॥ कुंकुमवर्ण टाचा गोमटी॥ इद्रनीळ तारा गोमटी॥ तैस्या ब्रह्मभुवनीचे स्तंभ॥ तैसे चरणद्वय स्वयंभ॥ तेजोन्मय कौस्तुभ॥ सुरंग रुळती दोहीं बाहीं॥२८३॥ मुक्तीसी पालवीती कैसे॥ दोन्ही सुरंग ढळती कैसे॥ वरी मेखळा कैसी दीसे॥ जैसी मेघी वीद्युल्लता॥२८४॥ ब्रह्मसीधुचा आवर्ती॥ वरी त्रीवेली सुसोभती॥ मुखमध्ये येक चतुर्भुज आकुती॥ तीन्ही वोघे त्रीभुवनीचे॥२८५॥ सोभे वक्षेस्थळ वीशाळ॥ चक्राकार स्थनमंडळ॥ करी शंखचक्रगदाकमळ॥ शुषोभती आयुधे॥२८६॥ कोकीळा अकुती कंठ वेल्हाळा॥ कौस्तभ वैजयेती माळा॥ जैसी नभी तेज बंबाळ॥ शेसी सुर्ये नक्षत्र॥२८७॥ कुंडले शोभती स्रवनी॥ जैसे गुरु भार्गव दोन्ही॥ ते आतमनीस्ट म्हणोनी॥ दोन्ही कर्णी मीरवती॥२८८॥ जैसे सुनीळ ब्रह्म॥ ते नेत्रद्वय शुभ्रशाम॥ तेथे बीबले हे सकलव्योम॥ चंद्र सुर्ये नामे प्रकासे॥२८९॥ सुमन कलीका प्रकारे॥ चीताकुती धनुस्याकारे॥ नासापुटे साजीरी साकारे॥ दोन्ही भ्रूलता मीरवती॥२९०॥ यावरी औठपीठ गोल्हाट॥ हेची ब्रह्मभुवनीची वाट॥ तेजोमय मुकुट॥ तेजे द्रीस्टी व्याकुळली॥२९१॥ त्यावरी सुमन मीरवती॥ वरी भ्रमर रुणझुणती॥ स्वानुभवाची बोध प्रसगती॥ तैसी ढळति आनंदे॥२९२॥ यैसा साकार मनोरम्या॥ कपोळी ढळती स्वेद ध्रमे॥ की ते मुक्त कणीका उतम॥ रोम कुपी झळकतसे॥२९३॥ यैसा स्वेदबीदु कपोळी॥ टीळकु भसला भाळी॥ वीरगुटी पुस्टीवरी मोकळी॥ उटी सोभे आगीची॥२९४॥ भक्त कृपाद्रीस्टी न्याहाळी॥ आखंड आसे त्याजवळी॥ त्यावरी धरुनी साउली॥ करकमली आपुलेनी॥२९५॥ यैसा देखोनी भगवंत॥ पाडवासी ढळती आस्रुपात॥ कंठ दाटला सद्गदीत॥ तेणे वैखरी खुटली॥२९६॥

या वर्णनाबरोबरच नामा पाठकाचें द्रौपदीवस्त्रहरणाख्यान संपतें. येथपर्यंतच्या परिचयांत नामा पाठकाच्या द्रौपदीवस्त्रहरणाख्यानाच्या अनेक ओव्या मुद्दाम दिलेल्या आहेत ! या काळांतील मराठी वाङ्मय फार थोडें उपलब्ध असल्यानें या ओव्या भाषाभ्यासासाठीं उपयोगी पडाव्यात, अशी आशा वाटते !

नामा पाठकाप्रमाणेंच मुक्तेश्वरानें सुद्धां आपल्या सभापर्वांतून या प्रसंगावर रचना केलेली आढळते. ही मुक्तेश्वरी रचना आणि नामा पाठकाचें हें आख्यान जर आपण तौलनिकदृष्ट्या अभ्यासिलें तर त्या अभ्यासांत आपणास दोन्ही रचनेंत खूपच साम्य आढळून येतें.

मुक्तेश्वरानें नामा पाठकाच्या या आख्यानांतील पुष्कळशा ओव्या, किंचितशा फरकानें, अर्थबदल न होऊं देतां उद्धृत केलेल्या आढळतात. उदाहरणार्थ :—

नामा पाठक : ‘ पंचानन सिंहाची कांता ’

मुक्तेश्वर : ‘ द्रौपदी पाच सिंहाची भाज ’ (अ १५।३)

नामा पाठक : ‘ उचलोन कोठे नव जावे ’

मुक्तेश्वर : ‘ कोठें नव जावें उचलून ’ (अ १३।५३)

नामा पाठक : ‘ जे मीरवे भीमा करी । ते कळवली रे नोवरी ’

मुक्तेश्वर : ‘ भीमाकरीं जे केळवली । गदा नोवरी सगुणाथली ’ (अ १५/११२)

नामा पाठक : ‘ वस्त्रे हीरोनी नग्न करा । या भ्रतारा देखत ’

मुक्तेश्वर : ‘ नग्न करा हिरोनि वस्त्रें । पांचही पुरुषां देखतां ’ (अ १५/११७)

नामा पाठक : ‘ म्हणोनी पीतांबर श्रीपती । द्रौपदीवरी टाकिला ’

मुक्तेश्वर : ‘ पीतांबर टाकिला द्रौपदीवरी । ’ (अ १५/१९७)

नामा पाठकाच्या या आख्यानांत आणि मुक्तेश्वरी रचनेंत अशा प्रकारचें साधर्म्य असलेलीं अनेक उदाहरणें देतां येतील ! परंतु विस्तारभयास्तव आणखी तीं उद्धृत करीत नाहीं.

हें साधर्म्य जसें आपणांस ओव्यांच्या रचनेंत आढळतें तसेंच तें कथाशयांत पण आढळून येतें. दोन्ही कवींनीं भानुमतीचा उल्लेख करणें, भीमाच्या आरोळीनें द्यूतांत फासे पांडवांच्या बाजूनें पडणें, रजस्वला द्रौपदीस कौरवसभेंत ओढून आणलें जात असतां हास्याचा गदारोळ उठणें, पीडित द्रौपदीची आर्त हांक वैकुंठांत जाऊन भिडल्यावर श्रीकृष्णाची धांदल उडून रुक्मिणी, नारद इत्यादिकांना सोडून त्याचें कौरवसभेंत आगमन होणें; इत्यादि कथाभाग दोन्ही कवींनीं सारखाच वर्णिलेला आढळतो !

कौरवसभेंत द्रौपदीचें वस्त्रहरण होत असतां अनेक वस्त्रें तिच्या अंगावरून निघालीं.

या विविध वस्त्रांचें वर्णन मुक्तेश्वरानें वैपुल्यानें दिलेलें आढळतें.[७] या वर्णनावरून निष्कर्ष काढतांना प्रा. द. सी. पंगु म्हणतात,[८] "मुक्तेश्वरानें नमूद करून ठेवलेल्या अनेक तऱ्हेच्या व विविध रंगांच्या तलम वस्त्रसंपत्तीनें आपल्या देशांत तत्कालीं उत्पन्न होणाऱ्या कुशल कारागिरीकडे आपलें लक्ष वेधतें !" मुक्तेश्वरावर प्रकाश टाकीत त्याच्या वास्तव्या-विषयीं मत मांडतांना प्रा. पंडित आवळीकर, मुक्तेश्वरास कलबुर्गी लुगडीं चांगलीं माहित होतीं, असा निष्कर्ष डॉक्टर सॅलेटोर यांनीं पुरविलेल्या माहितीनुसार काढतात ![९]

परंतु आश्चर्याचा भाग असा कीं वस्त्रहरणाच्या या प्रसंगाचा सांगाडा मुक्तेश्वरानें नामा पाठकाच्या द्रौपदीवस्त्राहरणांतून स्वीकृत केलेला दिसतो ! त्यामुळें मुक्तेश्वरानें ह्या सर्व वस्त्रांचा निर्देश ऐकीव माहितीवर तर केला नसावा ना ? अशी शंका मनास चाटून जाते ! मुक्तेश्वरानें दिलेलीं कांहीं प्रसिद्ध स्थळांचीं नांवें नामा पाठकाच्या रचनेंत सुद्धा आढळतात.

तेव्हां मुक्तेश्वरानें, नामा पाठकाच्या द्रौपदीवस्त्रहरणांतील कल्पना जशाच्या तशा घेऊन त्यांचा आपल्या प्रतिभेनें आविष्कार केलेला असून त्यांत केवळ लीलाविश्वंभराच्या पंचायतनस्वरूपाची व त्रिमूर्ति-स्वरूपाची स्वतंत्र भर घातलेली आहे, असें स्पष्ट जाणवतें !

मुक्तेश्वर हा एक शृंगारप्रिय कलासक्त कवि होता. जात्याच त्याची प्रवृत्ति रसिक असल्यानें त्यानें आपलें आख्यान कलात्मक सौंदर्यानें नटविलेलें आहे. उदाहरणार्थ—

'ढळतां वक्षःस्थळींच्या पदरा। पाणितळें पयोधरां। आच्छादूनि आक्रंदे ॥' १५।७५

किंवा 'कर्दलीस्तंभप्राय सुकुमार । सरळ जानू विशाल सुंदर' १५।१०६.

अथवा 'होऊनि आरूढें अंकासनीं। भोग भोगीं हेमसदनीं। शक्रमणीसारिखे' १५।१४९

शिवाय मुक्तेश्वराची वृत्ति पुराणिकाची नसल्यामुळें व तो जरी संतकुळांत जन्माला आला असला तरी तो स्वतः संत नसल्यामुळें प्राकृत महाभारत रचितांना त्याच्या मनावर अथवा भारती रचनेवर कसलेंच नैतिक बंधन पडूं शकलें नाहीं ! त्यामुळें त्याच्या महा-भारताची रचना कांहीं ठिकाणीं संभोगशृंगाराची अथवा बीभत्सतेची कांस धरतांना आढळते ! उदाहरणार्थ—

पांडवप्रताप पुरुष तरणा । नववधू कौरवसेना ।
शृंगारिली परिसंघट्टणा । युद्धसुरता न थारवे ॥ ११४ ॥

---

(७) मुक्तेश्वरकृत सभापर्व (पंगु प्रत) अध्याय १५ ओव्या २०४–२४३

(८) तत्रैव प्रस्तावना पान १२

(९) म. सा. प. वर्ष ३३, अंक १२९, पान २३

गळालें अभिमानाचें वास । अधैर्याचे मोकळे केस ।
रणशय्यासनीं त्रास । पावोनियां पळाली ॥ ११५ ॥
कर्ण सैंधव पयोधर पीन । मर्दितां झाले आरक्तवर्ण ।
शकुनी कंचुकी आवरण । पडिलें कोठे नेणवे ॥ ११६ ॥
शस्त्रधारातीक्ष्ण दांतीं । चुंबितां मुख आंतलें क्षिती ।
झाली रूपाची उपहती । कौरवसेना वधूची ॥ ११७ ॥

आदिपर्व, अध्याय ४४-

अथवा, अंगीं चंदनसुपरिमळें । तळवा लोपूनि पाणितळें ।

मर्दन करितां कुचयुगुलें । सुखानंदे निवतसे ॥ सभा. १५।१७४ ॥

परंतु नामा पाठक हा वृत्तीनें पुराणिक होता, असें ' पाठक ' या नामाभिधानावरून स्पष्ट होतें. त्याला सार्वजनिक ठिकाणीं पुराणादि धार्मिक ग्रंथांचें पठण करावयाचें असल्यानें संयम पाळणें अतिशय जरूरीचें होतें. त्यामुळेंच नामा पाठकाच्या द्रौपदी-वस्त्रहरणाख्यानाची रचना सोज्ज्वळ आणि संयमित झालेली दिसून येते ! नामा पाठकाची रचना जरी साधी, अनलंकृत असली तरी ओघवती आणि सजीव आहे हें द्रौपदीनें केलेल्या संभाषणावरून दिसून येईल. नामा पाठकाच्या विशिष्ट वृत्तीमुळेंच भक्तवत्सल श्रीकृष्णाचें वर्णन वैपुल्यानें केलें गेलें असावें !

याच चर्चेत जरा बाजूस जाऊन सुद्धां मुक्तेश्वराच्या याच आख्यानांतील एका ओवीचा परामर्श घेतल्यास चूक ठरूं नये !

द्रौपदीची भरसभेंत विटंबना होण्यास प्रारंभ झाला असतां, ती श्रीकृष्णाचा धांवा करूं लागते. द्रौपदी म्हणते—

बौद्धरूपिया जगदीशा ! । कौरवीं मांडिली माझी हिंसा ।
करुणाकरा ! कृष्णा ! परेशा । प्राणरक्षक मज होईं ॥ सभा. १५।१४६ ॥

या ओवींत बुद्धावताराचा जो उल्लेख द्रौपदीच्या मुखीं येतो तो बुद्धविहाराच्या दर्शनामुळेंहि सुचणें शक्य आहे, असें प्रा. पंडित आवळीकर मुक्तेश्वरावर प्रकाश टाकतांना म्हणतात.[१०] परंतु त्यांचा हा तर्क सयुक्तिक वाटत नाही.

जेव्हा दुर्योधनानें दुःशासनास द्रौपदीस भरसभेंत विवस्त्र करण्याची आज्ञा दिली तेव्हां लज्जारक्षणार्थ, शेवटचा उपाय म्हणून ती परमेश्वराला विनवूं लागली ! द्रौपदीनें आपल्या धाव्यांत, निरनिराळे अवतार घेऊन भक्तांना तारणाऱ्या जगच्चालक, विश्वपालक परमेश्वराचें स्तवन केलेलें आढळतें. या धाव्यामध्यें ती, मत्स्य, कुर्म, वराह, नारसिंह,

(१०) म. सा. प. वर्ष ३३, अंक १२९ पान २३

वामन, राम, इत्यादि अवतारांचा उल्लेख करून ओघाओघानेंच बौद्धावताराचाहि उल्लेख करीत आहे.

महाभारतकालामध्यें बुद्धाला दशावतारांत स्थान लाभलेलें नव्हतें. त्यांची दशावताराविषयीं—

मत्स्यः कूर्मो वराहश्च नारसिंहोऽथ वामनः ।
रामो रामश्च रामश्च कृष्णः कल्की च ते दश ॥
मोक्षधर्म–१२–३२६ B. O. R. I. Edition.

अशी होती.

परंतु कालांतरानें मात्र निरनिराळ्या पुराणांनीं गौतमबुद्धाचें प्रभावी व्यक्तिमत्त्व पाहून त्याला दशावतारांत समाविष्ट करून घेतलें. उदाहरणार्थ—

मत्स्यः कूर्मो वराहश्च नरसिंहोऽथ वामनः ।
रामो रामश्च कृष्णश्च बुद्धः कल्की च ते दश ॥ वराह पुराण ॥[११]

अथवा—

ततः कलौ संप्रवृत्ते संमोहाय सुरद्विषां ।
बुद्धो नाम्नाञ्जनसुतः कीकटेषु भविष्यति ॥ शब्दकल्पद्रुम[१२], भागवत पुराण.

हीच पुराणांतील दशावतारी कल्पना मुक्तेश्वरानें आपल्या भारतांत वापरली आहे असें दिसून येतें. मुक्तेश्वरानें आपलें भारत रचतांना केवळ त्यास महाभारताचाच उपयोग करून घेतला आहे असें नसून इतर अनेक ग्रंथांचाहि उपयोग, आपल्या भारतनिर्मितीसाठीं त्यानें वैपुल्यानें करून घेतलेला आढळतो.

एक एक अक्षराची भीक । जीर्ण कवीतें मागूनि देख ।
मी सर्वज्ञ कविनायक । ऐसें म्हणविलें लौकिकीं ॥ सभा. ५/१७९ ॥

ही मुक्तेश्वराची उक्ति केवळ विनयाचेंच निदर्शक नसून ती वस्तुस्थितिदर्शक सुद्धां आहे.

मुक्तेश्वरानें बुद्धाचा उल्लेख 'अवतारी' व्यक्ति म्हणूनच केला आहे याविषयीं निर्विवाद पुरावा याच आख्यानांत पुढील एका ओवींत आढळतो. द्रौपदीवस्त्रहरण होत असतां निघणाऱ्या वस्त्रांचा निर्देश करतांना मुक्तेश्वर म्हणतो—

मत्स्य कुर्म वराह व्यक्ती । नरसिंह वामन भार्गवमूर्ती ।
रामकृष्ण बौद्ध कलंकी । दशरूपांचीं पट्टकुळें ॥ सभा. अ. १५।२२८ ॥

(११) प्रि वा. शि. आपटे शब्दकोश, भाग १ ला (अ–क) प्रसाद प्रकाशन (१९५७) पान २४५.
(१२) शब्दकल्पद्रुम (प्रका. मोतीलाल बनारसीदास, दिल्ली १९६१) पान १२४.

या ठिकाणीं मुक्तेश्वरानें ' बौद्ध ' म्हणजे बुद्धाला चक्क दशावतारांत स्थान दिलेलें दिसून येतें. अतएव प्रा. पंडित आवळीकर समजतात त्याप्रमाणें द्रौपदीच्या मुखीं येणारा बुद्धावताराचा उल्लेख मुक्तेश्वराला बुद्धविहाराच्या दर्शनामुळें सुचला असावा असें मानतां येत नाहीं ! असो.

नामा पाठकाच्या या रचनेंतच ज्ञानेश्वरकालीन वाक्प्रचार किंवा शब्दप्रयोग सुद्धां वापरले गेल्याचें आढळतें. उदा. बीजे करणे, कुडें रचणें, राऊळांगण, राऊळ, पालाणीले इत्यादि शब्द पाहावेत. नामा पाठकाच्या या आख्यानाची भाषा प्रसादयुक्त असून सर्वांना आकलन होण्यासारखी आहे. या रचनेंत जरी त्याचें पांडित्य आपणांस दिसत नसलें तरी त्यांतील कांहीं ओव्यांना ' वाक्–प्रचाराचें ' तेज प्राप्त झाल्याचें दिसून येतें. उदा. ' होणार ते न चुके । जे लाहीले सकर्मरेखे, ' ' असग सगती ण बैसावे । वर्म कोन्हाचे न बोलावे, ' ' उतर पैजेचे गो बलावे । हेळण वैरीयाचे न करावे, ' ' अधर्मासी नातळावे, ' ' पंचानन सींव्हाची काता । कोल्हे कैसे गाजीताती, ' इत्यादि ओव्यांचा निर्देश या संदर्भांत करतां येईल. नामा पाठकाचें हें कथानक धांवतें आहे. ओघवान आहे. परंतु त्याच्या असफाईदार आणि अनलंकृत भाषेमुळे व त्रुटित काव्यशक्तीमुळे (Poetic fancy) तें आपणांस नीरस वाटतें.

नामा पाठकाच्या द्रौपदीवस्त्रहरणाख्यानांतील भाषेचा भाषिकदृष्ट्या विचार करीत असतांना आपणांस अनुस्वारांची अनुपस्थिति फार तीव्रतेनें जाणवते. उदाहरणार्थ सगती (संगती), गाजीताती (गांजीताती), सागे (सांगे), पाडव (पांडव), मडप (मंडप), कुजर (कुंजर), वगैरे. परंतु नामा पाठकानें कांहीं ठिकाणीं मात्र अनुस्वारांचा वापर केलेला आहे ! उदा. इंद्रप्रहस्तीचे, बंधु, शंख, मृदंग, डंबर, कल्पांतर, सोमदंतु, वगैरे शब्द पाहावे. भाषाशास्त्राच्या दृष्टीनें त्याच्या काव्यांत विश्लेष (दुस्वासन, आस्व), वर्णविपर्यय (दडवा दडवी, दवडा–दवडसाठी,) किंवा आमुत्क (' आमुक्त ' या शब्दासाठीं) तसेंच वर्णलोप (मुक–मुक्त साठीं) इत्यादि भाषाचमत्कृति आढळून येते. तेव्हां नामा पाठकाच्या द्रौपदीवस्त्रहरणाख्यानाच्या अनेक उताऱ्यांमुळें १५ व्या शतकांतील मराठी भाषेचा अभ्यास करण्यास सोपें जाईल असा विश्वास वाटतो.

आपल्या द्रौपदीवस्त्रहरणाख्यानाच्या शेवटीं नामा पाठक म्हणतो—

परी मज नामाचे आर्त । नामा पाठक शरणागत ॥
पुढील रसाळ ऐका ग्रंथ । जे कां चरीत्र श्रीकृष्णाचे ॥ ३१३ ॥

॥इती श्रीमाहाभारते वैशपायन जन्मोजय सवादे सभापर्वणी वस्त्राहरण कथा समाप्ती॥ या अंतींच्या उल्लेखावरून त्यानें महाभारताच्या सभापर्वावर रचना केली असावी असें वाटतें. तेव्हां नामा पाठकाच्या भारतीरचनेचा शोध घेतला जावा.

११ तथाकथित ' मंत्रगीते ' चा कर्ता : तुका पांडुरंगदास*

(श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे, पुणें)

' मंत्रगीता ' हें नांव फसवें

सन १९५० मध्यें श्री. वा. सी. बेन्द्रे यांनीं तुकारामांच्या अभंगात्मक गीतानुवादाची संशोधित आवृत्ति प्रकाशित केली[1] आणि हा अभंगात्मक गीतानुवाद देहूकर तुकारामांचा आहे, असें सिद्ध करण्यासाठीं ११५ पृष्ठांची प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली. श्री. बेन्द्रे यांनीं या गीतानुवादाचें नामकरण ' मंत्रगीता ' असें केलें आहे. तुकोबांकडून प्राप्त झालेल्या स्वप्नबोधाचें वर्णन करतांना बहिणाबाईनें केलेला पुढील उल्लेख या नामकरणाचा आधार आहे :

त्यांही पायांवरी ठेविलें मस्तक ।
दिधलें पुस्तक **मंत्रगीता** ॥[2]

बहिणाबाईनें उल्लेखिलेली ' मंत्रगीता ' म्हणजेच प्रस्तुत अभंगात्मक गीतानुवाद होय, असें श्री. बेंद्रे यांचें आग्रहाचें म्हणणें आहे. परंतु त्यांच्या या म्हणण्याला निश्चित आधार कांहींच नाहीं. तुकोबांनीं स्वप्नबोधाच्या वेळीं बहिणाबाईला दिलेली ' मंत्रगीता ' त्यांनीं स्वतःच रचली होती, हें कशावरून ? गीता आणि भागवत हे वारकऱ्यांचे मान्य ग्रंथ असल्यामुळें आणि त्यांतल्या त्यांत गीता ही मराठी भक्तिपरंपरेच्या विवेकनिष्ठेचें विशेष पोषण करणारी असल्यामुळें भागवतधर्मीय तुकोबांच्या साधनेंत आणि उपदेशांत गीतेची प्रतिष्ठा विशेष असणें स्वाभाविकच आहे. त्यांनीं अनेकवार गीतेचा महिमा गायिला आहे आणि आपल्या शिष्यांना गीतेचें पठण करावयास सांगितलें. यावरून त्यांनीं स्वतः गीतेवर टीका रचली असलीच पाहिजे, असें मानणें—निश्चित स्वरूपाच्या आधाराशिवाय—योग्य नव्हे.

दुसरें असें कीं, ' मंत्रगीता ' या नांवांतील ' मंत्र ' हें पूर्वपद मंत्रात्मक रचना-वैशिष्ट्याचें द्योतक आहे. ' मंत्रभागवत, ' ' मंत्ररामायण, ' ' मंत्रगजानन ' इत्यादि ग्रंथ—

---

* संमेलन ५१ वें, श. १८८६ इ. (१९६४)

१. ' श्री संतश्रेष्ठ तुकाराममहाराजकृत श्रीमद्भगवद्गीतेचा अभंगात्मक अनुवाद अथवा मंत्रगीता ' : संपादक वा. सी. बेन्द्रे. प्रकाशक वि. वि. पाटणकर, पुणें. १९५०. द्वितीयावृत्ति : १९६२.

२ ' बहिणाबाईचा गाथा ' आत्मचरित्रात्मक अभंग क्र. २५.

ज्यांच्या नांवांत 'मंत्र' हें पूर्वपद आहे—मंत्रात्मक रचनावैशिष्ट्यांनीं युक्त आहेत. श्री. बेन्द्रे ज्याचें नामकरण 'मंत्रगीता' असें करतात, तो प्रस्तुत अभंगात्मक गीतानुवाद मंत्रात्मक रचनावैशिष्ट्यानें युक्त नाहीं. देहूकर तुकोबांनीं जर 'मंत्रगीते'ची रचना केलेली असेल, तर ती 'मंत्रगीता' अजून उपलब्ध व्हावयाची आहे.

अपसमजाची प्राचीनता

या अभंगात्मक गीतानुवादांत बहुतेक ठिकाणीं 'तुका म्हणे' अशीच सर्वपरिचित नामसुद्रा असल्यामुळें हा गीतानुवाद देहूकर तुकारामांचा आहे, असा अपसमज होणें स्वाभाविक आहे. हा अपसमज शंभर–सवाशें वर्षांइतका जुना आहे. भा. इ. सं. मंडळाच्या हस्तलिखित-संग्रहांत या अनुवादाच्या ज्या अनेक प्रती आहेत, त्यांपैकीं एका प्रतीच्या[3] प्रारंभीं गद्यांत लिहिलेला प्रास्ताविक मजकूर आहे. त्या प्रास्ताविकांत म्हटलें आहे कीं—

" ... त्याचा (गीताग्रंथाचा) आर्थ बहुत सखोल ... त्यांतील आर्थबोध न हो तेव्हा **श्रीहारीने ... लोकात देहुकर तुकाराम हा आवतार धारण करून सातसे मुख्य श्लोक श्रीव्यासकृत त्याजवर सातसे अभंग आर्थबोध मऱ्हाष्ट्र भाषेत जनउध्धरास्त (व) केले ...** "

ही प्रत शके १७७६–१७७७ मध्यें नकललेली आहे. हा गीतानुवाद देहूकर तुकोबांचा आहे, अशा समजुतीनें केलेला जुन्यांत जुना एकमेव स्पष्ट उल्लेख वरील प्रतीच्या प्रारंभीं असतांना, श्री. बेंद्रे यांच्या नजरेंतून तो कसा सुटला, कोणास ठाऊक! कारण त्यांना इतकाहि आधार उपलब्ध झालेला नाहीं. श्री. बेंद्रे यांनीं आपलें प्रतिपाद्य सबळ करण्यासाठीं दिलेल्या सर्व पुराव्यांहून वर उल्लेखिलेला दुबळा पुरावा अधिक बलवान् आहे. यावरून श्री. बेंद्रे यांचा सिद्धान्त किती पोकळ आधारांवर उभा आहे. याची कल्पना येईल.

खऱ्या कर्त्याला डावलण्याचें चातुर्य

प्रस्तुत गीतानुवाद श्री. बेंद्रे यांच्या पूर्वी अनेकांनीं अनेकवार प्रकाशित केला होता. त्या सर्व पूर्वप्रकाशित आवृत्त्यांचा इतिहास त्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत दिलाच आहे. सन १९३१ मध्यें वीस मराठी टीकांसह गीतेचा पहिला अध्याय बेळगांवाहून प्रकाशित झालेला आहे,[4] त्यांत पहिल्या अध्यायापुरता प्रस्तुत अभंगात्मक अनुवादहि समाविष्ट

३. भा. इ. सं. मंडळ हस्तलिखितसंग्रह, पोथी क्र. २९, ३०२. (लेखनारंभ : माघ शु. ९ श. १७७६; लेखनसमाप्ति : आषाढ कृ. ८ श. १७७६.)

४. श्रीमद्भगवद्गीता, भाग पहिला : अध्याय पहिला : संपादक रामचंद्र स्वामीराव नाईक, जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, कल्याण रामचंद्र अंबेवाडी. प्रकाशक : रामचंद्र स्वामीराव नाईक, बेळगांव. १९३१.

आहे. या ग्रंथाच्या संपादकांनीं प्रस्तुत अभंगात्मक गीतानुवादाच्या कर्त्याविषयीं प्रस्तावनेंत केलेला खुलासा असा आहे : " या ग्रंथांतील तुकाराम पांडुरंगदास हे साधुवर्य तुकाराम नव्हेत. हे जातीनें देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून नगर जिल्ह्यांत जामखेड पेट्यांत खर्डे येथें राहत असत. यांचें नांव तुका विप्र बोरवनकर अगर अंजनवतीकर असें आहे. हे आपणांस तुकाराम पांडुरंगदास असें म्हणवीत. या पांडुरंगदास नांवावरून ही गीताटीका प्रसिद्ध साधुवर्य तुकाराम यांच्या नांवावर मोडली जाऊं लागली. त्यांची मूळ वृत्ति कुलकर्णीपणाची होती. मूळ आडनांव क्षीरसागर असें होतें. पांडुरंगाचे एकनिष्ठ भक्त होते, म्हणून आपणांस पांडुरंगदास असें म्हणवीत असत. हे जन्मांध होते असें म्हणतात. आपली परंपरा ज्ञानदेव–सच्चिदानंदबाबा ×××× तुकाराम अशी देतात. खर्डेनजिक बेलेश्वरीं त्यांची समाधि असून तेथें श्रावणमासीं यांचा उरूस भरत असतो. हे तुकाराम अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत शाहूमहाराजांच्या अमदानींत हयात होते. यांचा मूळ ग्रंथ श्री. तात्यासाहेब कुलकर्णी, क्षीरसागर, मुक्काम खर्डे, यांजकडे आहे. ही सर्व माहिती आम्हांस श्री. अमृत बापूजी रसाळ, हेडमास्तर, राहुरी, जि. नगर, यांजकडून मिळाली. "[५]

वरील माहिती ज्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत आलेली आहे, तो ग्रंथ श्री. बेंद्रे यांच्या संपादनसामग्रींत समाविष्ट आहे. परंतु आश्चर्य असें कीं, श्री. बेंद्रे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत अभंगात्मक गीतानुवादाच्या कर्त्याचा निर्णय करण्यासाठीं ज्या अनेक तुकारामांची माहिती देऊन त्यांना बाजूला सारलें आहे, त्या तुकारामांच्या नामावळींतून उपरिनिर्दिष्ट बेलेश्वरचे तुका पांडुरंगदास वगळले आहेत. तुका पांडुरंगदासांचें नांव चर्चेत आलें, तर आपल्या प्रतिपाद्यावर 'मूले कुठार' पडणार, या आशंकेनें त्यांचें नांव वगळतांना श्री. बेंद्रे यांनीं एक 'संशोधकीय दक्षता' मात्र घेतली आहे. संपादनसामग्रीचें विवरण करतांना त्यांनीं प्रस्तुत ग्रंथाविषयीं लिहिलें आहे: " माझ्या हातीं या ग्रंथाचे सुटेच कागद आले. पहिल्या अध्यायाचीं २४२ पृष्ठें असून, नंतर ५-६ पानें परिशिष्टें असावींत."[६] म्हणजे ज्या प्रस्तावनेंत वरील माहिती निर्दिष्ट आहे, ती प्रस्तावनाच श्री. बेन्द्रे यांच्या हातीं आली नाहीं ! संहितेचीं २४२ पृष्ठेंच त्यांना पाहावयास मिळालीं. पुढें ५-६ पानें परिशिष्टें असावींत, हा केवळ संशोधकीय द्रष्टत्वाचा चमत्कार म्हणावयाचा. स्वीकृत विषयाच्या सामग्रीचें संकलन करण्याच्या बाबतींत ज्यांचा विशेष लौकिक आहे त्यांनीं, सहजप्राप्य अशा या ग्रंथाची प्रस्तावना आपणांस पाहावयास मिळाली नाहीं, हें दाखविणें आग्रहांतून निर्माण झालेलें दिसतें.

तुका पांडुरंगदास आणि तुका विप्र वेगळे

श्री. रा. स्वा. नाईक आदि संपादकांना श्री. रसाळ यांजकडून मिळालेल्या माहि-

५. उपरिनिर्दिष्ट ग्रंथ, प्रस्तावना, पृ. ३.

६. 'मंत्रगीता', प्रस्तावना, पृ. ५५.

तींत तुका पांडुरंगदास आणि तुका विप्र अशा दोन तुकारामांचा परस्पर घोटाळा झालेला आहे. मडगांव येथें झालेल्या मराठी साहित्य संमेलनांत श्री. भा. प. बहिरट यांनीं याच विषयावर वाचलेल्या निबंधांत हा घोटाळा जशाचा तसा स्वीकारला आहे. या घोटाळ्याचा उलगडा करण्यासाठीं सन १९६३ च्या प्रारंभीं मी स्वतः खर्डे, बेलेश्वर आणि मोहरी या जवळ-जवळच्या तीन गांवीं[७] जाऊन आलों.[८] तेथे केलेल्या प्रत्यक्ष पाहणींतून आणि संबंधित व्यक्तींच्या भेटींतून उपलब्ध झालेल्या माहितीमुळें या घोटाळ्याचा स्वच्छ उलगडा करतां आला.

अभंगात्मक अनुवादाचे कर्ते तुका पांडुरंगदास हे होत; तुका विप्र नव्हेत. तुका विप्र हे तुका पांडुरंगदासांचे समकालीन असले तरी ते त्यांच्यानंतर (पौष व. १४ शके १७१४) समाधिस्थ झाले. तुका विप्रांची समाधि खर्ड्यापासून दहा मैलांवर असलेल्या अंजनवतीस आहे. मोहरीच्या (खर्ड्याच्या नव्हे) क्षीरसागरांचा आणि अंजनवतीच्या विप्रांचा नातेसंबंध आहे. तुका पांडुरंगदास हे मूळचे सातारा जिल्ह्यांतील अडगूण (अडगूण-कडगूण, ता. खटाव) या गांवचे अथर्ववेदी ब्राह्मण. त्यांचें मूळ आडनांव पुरंदरे असें होतें. त्यांच्या पित्याचें नांव भास्कर. लहानपणापासूनच ते देवीची आणि दत्ताची उपासना करीत. त्यांच्या उपासनावेडामुळें वडिलांनीं त्यांना लहान वयांतच घराबाहेर हाकलून दिलें. ते खर्ड्याजवळ बेलेश्वरें या स्थानीं येऊन अनुष्ठान करूं लागले. एकवीस दिवसांच्या अनुष्ठानानंतर त्यांना दत्तदर्शन झालें. त्यांचे गुरु पांडुरंग हे मोहरीच्या क्षीरसागर घराण्यांतील होते. तुका पांडुरंगदासांची समाधि बेलेश्वर येथेंच असून, तेथें त्यांच्या उपासनेंतील देवी आणि एकमुखी षड्भुज दत्त आहे.[१०] तुका पांडुरंगदास हे वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी चैत्र वद्य ११, सोमवार, शके १६७४ (अंगिरा नाम संवत्सर) या दिवशीं समाधिस्थ झाले. त्यांच्या बंधूंचा वंश बेलेश्वरीं नांदतो आहे. सुलतानजी निंबाळकर हे तुका पांडुरंगदासांचे शिष्य होते.

तुका पांडुरंगदासांचे गुरु मोहरी गांवचे

वर उल्लेख केलाच आहे कीं तुका पांडुरंगदासांचे गुरु पांडुरंग हे मोहरीच्या क्षीर-

---

७. खर्ड्यापासून मोहरी तीन मैल अंतरावर आहे आणि बेलेश्वर सहा मैल अंतरावर आहे. मोहरीपासून बेलेश्वर (पखरूड, ता. भूम, जि. उस्मानाबाद) पांच मैल दूर आहे.

८. ही संशोधनयात्रा मीं महाराष्ट्र राज्य पुराभिलेख आणि पुरातत्त्व मंडळाचा सदस्य या नात्यानें केली.

९. हें स्थान एकांतरम्य आहे. मंदिर उंच टेकडीवर आहे. मंदिरांतील उपासनाक्रमाशीं संबंध असलेल्या तीनचार घरांशिवाय अन्य वस्ती नाहीं.

१०. बेलेश्वरीं वासुदेव तीर्थस्वामी (समाधि : श. १७५९) आणि सच्चिदानंदस्वामी (समाधि शके १८०७) या दोन साधूंच्या समाध्या आहेत.

-सागर घराण्यांतील होते. या घराण्यांत सतराव्या शतकाच्या अखेरीस चित्सुखाश्रम नामक एक साधु होऊन गेले. मोहरी गांवाबाहेर जवळच हे चित्सुखाश्रम[११] आणि यांचे गुरु परमहंस नारायणाश्रम[११] या दोघां साधूंचें समाधिमंदिर आहे. या समाधिमंदिरासमोरच्या आवारांत पांडुरंगाची समाधि आहे. ही समाधि लहानशीच असून, तिच्या माथ्यावर एका कमळांत

श्री गुरु
पांडुरंग

अशीं अक्षरें खोदलेलीं आहेत. हे साधु जन्मांध होते असें म्हणतात.

ग्रंथसंग्रहाची वाताहत

बेलेश्वर येथें आतां हस्तलिखित ग्रंथ मुळींच नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी उपेक्षित अवस्थेंत पडलेला आणि वाळवीनें चाळणी केलेला ग्रंथसंग्रह मंदिराच्या आवारांतील विहिरींत विसर्जित केला, असें वंशजांनीं सांगितलें. श्री. रसाळ यांनीं अभंगात्मक गीतानुवाद खर्डे येथें ज्या श्री. तात्यासाहेब क्षीरसागरांकडे असल्याचा निर्देश केला आहे, ते त्या वेळीं बेलेश्वर देवस्थानाची व्यवस्था पाहात असत. त्यामुळें त्यांनीं आपल्या अखत्यारींत बेलेश्वराहून प्रत मिळविणें शक्य होतें. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ज्यांच्याजवळ ही बेलेश्वराची प्रत होती, ते श्री. तात्यासाहेब क्षीरसागर आज हयात नाहींत आणि त्यांना मागें कोणीच नसल्यामुळें त्यांच्या सर्वच घराची वाताहत झालेली आहे. क्षीरसागरांच्या संग्रहांतील ही प्रत उपलब्ध होऊं शकली असती, तर कदाचित् तेवढ्या पुराव्यानेंहि संशोधकांचें पूर्ण समाधान होऊं शकलें असतें. तुका पांडुरंगदासांच्या शिष्यांचीं घराणीं पखरूड, वडगांवनळी, परांडा, बार्शी, इत्यादि गांवीं पसरलेलीं आहेत. त्यांच्याकडे प्रस्तुत ग्रंथाचीं हस्तलिखितें आहेत काय, त्याचा शोध घ्यावयास हवा.

गीतानुवादांतील गुरुनिर्देश

अभंगात्मक गीतानुवादाचा कर्ता हा पांडुरंगशिष्य असल्याचा स्पष्ट अंतरंग-पुरावा आहे. गीतानुवादाचा कर्ता असलेले तुकाराम हे आपणांस 'श्रीगुरुपांडुरंगदास', 'पांडुरंगदास' किंवा संक्षेपानें 'गुरुदास' व 'दास' या बिरुदानें उल्लेखितात. (पहा : अभंग क्र. २२५, ३८८, ४७६, ४७९, ५८६, ६११, ६३५, ७२२, ७२३, इत्यादि.)

---

११. हरिवरदाकार कृष्णदयार्णव हे मोहरी येथें परमहंसस्वामींच्या पुण्यतिथीच्या उत्सवास गेले असतांना, त्यांनीं तेथील उपस्थित सज्जनांच्या समोर हरिवरदेच्या उत्तरार्ध-रचनेचा आरंभ केला. मोहरीच्या निवासकाळांत त्यांनीं रचलेली चित्सुखाश्रमांची आरती तेथील नित्योपासनेंत प्रचलित आहे. मोहरीचें संस्कृतीकरण ते 'मुरलीधर' (मोहरी = पावा, मुरली) असें करतात.

श्रीगुरुपांडुरंगापायीं । गुरुदास ठेवी डोई ॥

असा गुरुनामनिर्देश गीतानुवादांत अनेकवार निःसंदिग्ध स्वरूपांत आला आहे. असें असतांना श्री. बेंद्रे मात्र आपणांस बाधक असलेल्या या निर्देशांचा विपर्यस्त खुलासा देऊन आपल्या स्वकपोलकल्पित कल्पनांच्या पुष्टीसाठीं भ्रान्त आणि भ्रामक प्रयत्न करतात. प्रस्तुत संदर्भांतील त्यांचें स्पष्टीकरण 'वाचनीय' आहे. ते लिहितात : 'गुरु, दास व शिष्य हेहि शब्द विशेषार्थानें योजले आहेत. आत्मा, कृष्ण व पार्थ यांव्यतिरिक्त ईश्वर किंवा देव असा सामान्यपणें उल्लेख करावयाचा झाला तर तेथें गुरु, सद्गुरुसारखे शब्द योजले आहेत. जेथें भक्त किंवा मोक्षार्थी म्हणून म्हणावयाचें असेल, तेथें दास किंवा शिष्य म्हटलें आहे. कांहीं ठिकाणीं गुरुऐवजीं पांडुरंग असें विशेषार्थानें लिहिलें आहे. **या** दास व गुरु **शब्दांचा उपयोग विशेषनामार्थी नाहीं, हें लक्षांत घेतलें म्हणजे घोटाळा उडणार नाहीं.**'[१२] (जाड ठसा माझा.) हे शब्द विशेषनामार्थी नसून, विशेषार्थी आहेत, हें वाचकांनीं लक्षांत कां घ्यावयाचें, तर तसें वाचकांनीं लक्षांत घेणें हें श्री. बेंद्रे यांना सोयीस्कर आहे, म्हणून. तसें वाचकांनीं लक्षांत न घेतां त्या शब्दांनीं सरळ सरळ द्योतित होणारा अर्थ लक्षांत घेतला, तर श्री. बेंद्रे यांच्या कल्पनारंजित सिद्धान्ताच्या बांधणींत पायाशींच घोटाळा उडणार आहे. श्री. बेंद्रे यांच्या या स्पष्टीकरणावर अधिक भाष्याची जरुरी नाहीं.

'देवीनें दाविला गुरु पांडुरंग'

भा. इ. सं. मंडळाच्या हस्तलिखित-संग्रहांत असलेल्या अभंगात्मक गीतानुवादाच्या प्रतींपैकीं एका प्रतींत[१३] प्रारंभीं ९२ अभंगांचें विस्तृत मंगलाचरण आहे. (श्री. बेंद्रे यांनीं संपादिलेल्या संहितेंत मंगलाचरण मुळींच नाहीं.) या मंगलाचरणांत—

देवीनें दाविला । **गुरु पांडुरंग** ।

असा गुरुचा आणि गुरुप्राप्तीला कारणीभूत झालेल्या देवीकृपेचा निर्देश आहे. तुका पांडुरंगदासांच्या उपासनेंत देवीला स्थान असून, त्यांच्या समाधिमंदिरांत देवीची मूर्ति आहे, ही माहिती मीं मागें दिलेलीच आहे. पुनः पंधराव्या अध्यायाच्या प्रारंभीं—

नमून साष्टांगी कुळदेवी अष्टांगी ।
लोभ ते कष्टांगीं करूं रिघे ॥[१४]

असें देवीला केलेलें नमन आहे. अर्थात् या स्पष्ट निर्देशांची वासलात लावणें 'पराविद्येंतील विशेषार्थज्ञां'ना केव्हांहि शक्य आहे.

---

१२. 'मंत्रगीता', प्रस्तावना, पृ. ६९.

१३. भा. इ. सं. मंडळ हस्तलिखितसंग्रह, पोथी क्र. ४१, ९८. अभंग क्र. ९१.

१४. 'मंत्रगीता', अभंग क्र. ५६४.

श्री. बेंद्रे यांचीं भ्रामक प्रमाणें

प्रस्तुत गीतानुवाद हा देहूकर तुकारामांचाच आहे, हें ठरविण्यासाठीं विरुद्ध जाणारे निःसंदिग्ध पुरावे डावलणें अथवा त्यांचा विपर्यास करणें आणि आपल्या मताच्या पुष्टीसाठीं भ्रामक प्रमाणें पुढें करणें अशी दुहेरी पद्धति श्री. बेंद्रे यांनीं हाताळली आहे. त्यांच्या प्रमाणांचें स्वरूप पाहिल्यावर आपणांस माझ्या या विधानाचें प्रत्यंतर येईल :

(१) "कांहीं कर्मठ विचारांची मंडळी अभंगांत उच्च विचारांचा प्रश्न आला कीं, हा या देहूकर तुक्याचा नाहीं; दुसऱ्या कोणा तरी एखाद्या तुका नांवाचा उल्लेख करून, त्याचा असावा म्हणून सांगतात व दिशाभूल करीत असतात."[१५] असें बेंद्रे यांचें म्हणणें. यांतून त्यांना असें सूचित करावयाचें आहे कीं, गीतानुवाद उच्च विचारांनीं भरलेला असल्यामुळेंच त्याचें कर्तृत्व देहूकर तुकोबांना न देण्याचा कर्मठांचा आग्रह आहे. म्हणजे याचा अर्थ असा होतो कीं, तुकोबांच्या सर्वमान्य रचनेंत उच्च विचारांच्या अभंगांचा अभाव आहे. श्री. बेन्द्रे यांनाहि, मला वाटतें, हें मान्य होणार नाहीं.

(२) याच संदर्भात श्री. बेन्द्रे म्हणतात कीं, "गीतानुवादांत वर्णिलेल्या लेखकाच्या प्रवृत्ति, पारमार्थिक साधनवैशिष्ट्य, उपासना, मंत्र वगैरे वैशिष्ट्यें देहूकर तुकोबांच्या बाबतींतच लागू पडतात, इतरांस नाहींत, हें थोड्याहि विचारान्तीं सहज पटण्यासारखें आहे."[१६] श्री. बेन्द्रे यांचें हें विधान पुष्कळ विचारान्तीहि पटण्यासारखें नाहीं. मराठी भक्तिपरंपरेंतील मान्यवर पूर्वसूरींच्या साधनेंत आढळत नसलेल्या अशा कोणत्या विशेष गोष्टी तुकोबांत आढळतात, तें श्री. बेन्द्रे यांनीं स्पष्ट केलेलें नाही. मराठी भक्तिपरंपरेचीं सर्वसाधारण वैशिष्ट्यें सर्वच संत मंडळींत विद्यमान आहेत.

(३) श्री. बेन्द्रे यांचें यापुढील प्रमाण तर आणखीच चमत्कृतिपूर्ण आहे. ते म्हणतात, "तुकोबांचें म्हणणें कीं, ज्या वह्या बुडविल्या त्यांतील कवित्व देवानें बोलविलें.[१७] सर्वच गीतानुवाद तुका-मनुष्याचा नाहीं. सर्व लेखक एके काळीं आपल्या लेखनाच्या स्फूर्तीचें श्रेय देवाकडे अगर चरित्रकार चरित्रनायकाकडे देतात. परंतु तुकोबांचें म्हणणें तशा स्वरूपाचें नसून तें साक्ष म्हणून दिवाणापुढें अट्टाहासानें मांडलें

---

१५. 'मंत्रगीता', प्रस्तावना, पृ. ७१.

१६. 'मंत्रगीता', प्रस्तावना, पृ. ७५.

१७. श्री. बेन्द्रे यांचा असा आग्रह आहे कीं, इंद्रायणींत बुडविलेल्या वह्या सर्वसाधारण अभंगांच्या नसून या अभंगात्मक गीतानुवादाच्या होत्या. पारमार्थिक अनुभवाचें प्रकटीकरण स्फुट अभंगांत करणें हा शूद्राचा अपराध नसून, वेदतुल्य गीतेचा अनुवाद करणें हा अपराध होता, म्हणून गीतानुवादाच्याच वह्या ब्राम्हणांनीं बुडविल्या, असें श्री. बेन्द्रे यांचें स्पष्टीकरण आहे.

गेलें आहे."[१८] श्री. बेंद्रे यांच्या या विधानांतून असें व्यक्त होतें की, आपल्या कृतीचें श्रेय देवाकडे देण्याची तुकारामेतर लेखकांची प्रवृत्ति केवळ सांकेतिक उपचाराची असून, तुकोबांच्या बाबतींतच ती प्रामाणिक ठरते. श्री. बेन्द्रे यांचें हें मत संतचरित्रांच्या अभ्यासकांना भाष्याविनाच गफलतीचें वाटणारें आहे.

(४) तुकोबांची गाथा आणि प्रस्तुत गीतानुवाद यांतील वैचारिक साम्यावर श्री. बेन्द्रे यांनीं विशेष जोर दिला आहे.[१९] परंतु गीता हा सर्वच मराठी भक्तिपरंपरेचा प्राणपोषक ग्रंथ असल्यामुळें कोणाहि संताच्या वाणींत गीतेचा प्रभाव दाखवितां येईल. ' गीता-भागवत करावें श्रवण ' असें सांगणाऱ्या तुकोबांच्या स्फुट अभंगांत गीताप्रभाव असणारच.

(५) तुकोबांच्या गाथ्यांत ' गीतेंतील श्लोकांचे किंवा चरणांचे समानार्थी अभंग ' विपुल प्रमाणांत सांपडत असले आणि ' तुकोबांच्या कवित्वावर गीतेंतील तत्त्व-ज्ञानाचाच विशेष पगडा बसला आहे ' हें खरें असलें, तरी त्यामुळें त्यांनीं गीतेवर टीका रचलीच असली पाहिजे, हें कसें सिद्ध होतें ? तुकोबांच्या गाथ्यांवरील गीताप्रभावाचा " विचार केला, तर तुकोबांच्या गीताविषयक सखोल ज्ञानाबद्दल शंका घेण्यास जागा राहात नाहीं, "[२०] हें सर्वांशानें मान्य. परंतु ही मान्यता प्रस्तुत गीतानुवाद देहूकर तुकोबांचाच आहे हें ठरविण्यास साक्षात् उपकारक नाहीं.

(६) समकालीन आणि उत्तरकालीन संतांनीं तुकोबांच्या वाणीला ' वेदवाणी ' म्हटलें आहे; ती वाणी ' वेदवेदार्थनिरोपणी ' आहे, असा तिचा गौरव केला आहे; तिला ' पांचवा वेद ' म्हटलें आहे, ती वाणी ' महाराष्ट्री शब्दांत वेदान्ताचा अर्थ सांगणारी आहे ', अशी ग्वाही दिली आहे. हा तुकोबांच्या वाणीचा गौरव स्फुट अभंगांच्या गाथ्याला उद्देशून नसून प्रस्तुत गीतानुवादाला उद्देशून आहे, असें श्री. बेंद्रे यांचें म्हणणें.[२१] या त्यांच्या म्हणण्याला आधार काय ?–तर तसें म्हणणें त्यांना सोयीस्कर आहे इतकेंच. ' वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ' असें जेव्हां तुकोबा आत्मविश्वासानें उद्घोषितात, तेव्हां त्यांनीं वेदऋचांचा अभ्यास केला होता, असें मानण्याचें कारण नाहीं. वेदांना न लाभलेली परंतु त्यांचें ध्येय असलेली परमप्रतीति ही आपण लीलया अनुभवीत आहोंत, असें तुकोबांना सांगावयाचें आहे. तुकोबांचा गौरव करणाऱ्यांचीहि त्यांच्याविषयींची धारणा अशीच आहे.

—मंत्रगीते 'च्या प्रथमावृत्तीच्या प्रस्तावनेंत श्री. बेंद्रे यांनीं दिलेल्या तात्त्विक

१८. ' मंत्रगीता ', प्रस्तावना, पृ. ७५.
१९. ' मंत्रगीता ', प्रस्तावना, पृ. ७६–७९.
२० ' मंत्रगीता ', प्रस्तावना, पृ. ८२–८६.
२१ ' मंत्रगीता ', प्रस्तावना, पृ. ७९–८१, ८७–८८.

प्रमाणांचें स्वरूप असें आहे. द्वितीयावृत्तीच्या प्रस्तावनेंत त्यांनीं कांहीं ऐतिहासिक प्रमाणांचा हवाला दिला आहे, प्रत्यक्ष प्रमाणें सादर केलीं नाहींत. त्यांनीं ज्या प्रमाणांचा हवाला दिला आहे, त्यांचा विचार क्रमशः करावयाचा आहे :

(१) श्री. बेंद्रे लिहितात. "......तुकोबांची सम-अभंगात्मक व वामन पंडितांची 'पार्थसारथी' समश्लोकी यांचें सहज वरवर परीक्षण केलें तरी त्यांत वामनपंडितांनीं तुकोबांचीं बीजवाक्यें आपल्या समश्लोकींत सर्वत्र जशींच्या तशींच घेतलेलीं आढळतात. हे वामनपंडित तुकोबांनंतर थोड्या उशीराचे, कदाचित् समकालीन आणि यांनीं तुकोबांची स्तुति केली आहे तीहि प्रसिद्ध आहे. त्यांत तुकोबांच्या गीताज्ञानाचें वर्णन आहे. "[२२]

— श्री. बेंद्रे यांनीं या विधानांत आपणांस अनुकूल असा आभास निर्माण केला आहे. कोणाहि निष्पक्षपाती अभ्यासकानें 'सहज वरवर परीक्षण केलें,' तरी त्यास असें स्पष्ट दिसून येईल कीं, अभंगात्मक गीतानुवाद करणाऱ्यानेंच वामनी समश्लोकीचा विस्तार केला आहे. मी येथें अवतरणें देऊन जागा अडवीत नाहीं. अभ्यासकांपुढें दोन्हीहि ग्रंथ मुद्रित स्वरूपांत आहेत. त्यांनीं खात्री करून घ्यावी. वामनपंडितांनीं केलेल्या तुकाराम-स्तुतींत 'जयाचे मुखीं भारती वेदमाता' असे शब्द आहेत. श्री. बेंद्रे यांच्या म्हणण्या-प्रमाणें 'भारती वेदमाता' म्हणजे गीता. वास्तविक असा अर्थ करण्यास कांहीं आधार नाहीं आणि श्री. बेंद्रे यांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांत तुकोबांच्या गीताज्ञानाची ग्वाही असली तरी त्यांतून हें कसें निष्पन्न होतें कीं, तुकोबांनीं गीतेवर टीका लिहिली आहे, ती अभंग-छंदांतच आहे, आणि तीहि बेंद्रे यांना अभिप्रेत असलेलीच आहे.

(२) श्री. बेंद्रे यांचें हें दुसरें ऐतिहासिक प्रमाण पहा : ते म्हणतात : "कल्याणीचे शिवरामस्वामी यांनींहि इ. स. १६८३ च्या सुमारास गीतेचा अनुवाद केलेला आहे. त्यांच्या त्या हस्तलिखितांत तुकोबांच्या 'मंत्रगीतें'तील कांहीं अभंग मध्येंच उतरलेले आढळतात.[२३] "

— श्री. बेंद्रे यांनी म्हटल्याप्रमाणें शिवरामस्वामींनीं इ. स. १६८३ च्या सुमारास गीतेचा अनुवाद केला आहे हें खरें आहे. तो अनुवाद 'गीताचंद्रिका' या नांवानें इतिहासाचार्य राजवाडे यांनीं भा. इ. सं. मंडळाच्या द्वितीय वार्षिक इतिवृत्तांत प्रसिद्ध केला असून पुढें मननामोदकार भिडे यांनीं स्वतंत्र पुस्तकरूपानें 'भगवद्गीता-चंद्रिका' या नांवानें संपादिला आहे. तालबद्ध गद्यांत असलेल्या त्या अनुवादांत ज्ञाने-श्वरींतील शब्दांचा विपुल उपयोग केलेला आहे. "त्यांच्या त्या हस्तलिखितांत तुकोबांच्या 'मंत्रगीतें'तील कांहीं अभंग मध्येंच उतरलेले आढळतात." हें श्री. बेंद्रे यांचें विधान साफ फसवें आहे. 'त्यांचें तें हस्तलिखित' म्हणजे काय ? श्री. बेंद्रे यांना शिवरामस्वामींच्या स्वतःच्या हस्ताक्षरांतील इ. स. १६८३ च्या सुमाराची प्रत मिळाली आहे काय ? शिवरामस्वामींनीं आपल्या ग्रंथांत कोणाचेंहि वेगळें अवतरण वापरलेलें नाहीं. प्रस्तुत

२२. 'मंत्रगीता' (द्वितीयावृत्ति) : प्रस्तावना पृ. १०.

२३. 'मंत्रगीता' (द्वितीयावृत्ति) : प्रस्तावना पृ. १०.

अभंगानुवादाचा त्यांच्या टीकेशीं कांहींहि संबंध नाहीं; फार तर श्री. बेंद्रे यांना एखादें उत्तरकालीन बाड मिळालें असेल आणि त्यांत बाडलेखकानें शिवरामस्वामींच्या अनुवादाबरोबर या अभंगात्मक अनुवादांतील उतारे घेतले असतील; परंतु श्री. बेंद्रे संदिग्ध शब्दरचना ठेवून असें भासवीत आहेत कीं, प्रस्तुत गीतानुवादाचा ज्या अर्थीं शिवरामांनीं उपयोग केला आहे, त्या अर्थीं त्यांच्या गीतानुवादापूर्वी म्हणजे इ. स. १६८३ पूर्वी हा अभंगानुवाद रचला गेला. परंतु त्यांचें हें कौशल्य टिकणार नाहीं.

(३) आपल्या वरील विधानाला पुष्टि देण्यासाठीं श्री. बेंद्रे लिहितात कीं, " शिवरामस्वामींनीं आपल्या एका अभंगांत गीतानुवादकांची नामावलि दिलेली आहे. तींत त्यांनीं तुकोबांचा गीतानुवाद म्हणजे 'अनुभवाचे बोल' असा निर्वाळा दिला आहे." [२४]

—इतका महत्त्वाचा पुरावा असलेला हा अभंग श्री. बेंद्रे यांनीं उद्धृत केला नाहीं. वामनाच्या तुकारामस्तुतींत ' गीतानुवादा'चा उल्लेख आहे, या श्री. बेंद्रे यांच्या म्हणण्यांत जसा आभास निर्माण केलेला आहे, तशीच स्थिति याचीहि असणार. शिवाय हे शिवराम म्हणजे भगवद्गीताचंद्रिकाकार शिवरामस्वामी कल्याणीकरच असतील, याचीहि खात्री देतां येत नाहीं. श्री. बेंद्रे हे नामसादृश्यानें वाटेल तो घोटाळा करतात, हें त्यांच्या संशोधनांतून अनेकवार दाखवितां येईल. मुकुंदराजविषयक बादरायणी संशोधनांत त्यांनीं एकनाथचरित्रकार केशवकवि आणि केशवस्वामी भागानगरकर यांना एक मानून कसा गोंधळ उडविला आहे, याची साधार चर्चा मीं पूर्वी ' इंद्रायणी ' मासिकांत केली आहे.

(४) परंतु श्री. बेंद्रे हे आभासनिर्मितीपर्यंतच थांबत नाहींत, तर त्याच्याहि पुढें जातात. ' मंत्रगीतें ' तील ' सद्गुरुदास ' हें तुकारामांचें बिरुद रमावल्लभदासांनीं (जे देहूकर तुकारामांचे समकालीन होते) आपल्या ' संतनामावळी ' त देहूकर तुकोबांना वापरलें आहे, असें श्री. बेंद्रे म्हणतात. रमावल्लभदासांची ' संतनामावळी ' प्रकाशित झालेली आहे.[२५] त्यांत देहूकर तुकारामांचा—एवढेंच नव्हे तर तुकाराम या नांवाच्या कोणाहि साधूचा उल्लेख सुद्धां नाहीं !

—श्री. बेंद्रे यांच्या प्रमाणांचें आणि प्रमाणचिकित्सेचें स्वरूप हें असें आहे. त्यांतील भ्रामकतेची याहून अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. ' साधनचिकित्साकार ' बेंद्रे हे जो गीतानुवाद देहूकर तुकारामांचा आहे, असें सिद्ध करावयास उद्युक्त झाले आहेत, त्या अनुवादांतीलच अवतरणें देहूकर तुकोबांच्या मुखीं घालून, साध्यालाच साधन बनवून सिद्धान्ताची उभारणी झाल्याचा जयघोष करतात,[२६] तेव्हां त्यांना काय म्हणावें तें कळत नाहीं.

हा ग्रंथ देहूकर तुकोबांचा नव्हे; त्याचा कर्ता तुका पांडुरंगदास या नांवाचा बेलेश्वरीं समाधिस्थ झालेला शाहुकालीन साधु आहे, हें सत्य प्राचीन मराठी वाङ्मयेतिहासांत रुजू व्हावयास आतां अडचण उरूं नये.

---

२४. ' मंत्रगीता ' (द्वितीयावृत्ति) : प्रस्तावना, पृ. १०.
२५. ' मराठी वाङ्मयाचा इतिहास ' (खंड २ रा) : ल. रा. पांगारकर नाशिक, १९३५. पृ. ५६४.
२६. ' मंत्रगीता, ' प्रस्तावना, पृ. ८१-८२.

५६६

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला

१ अहवाल (शक १८३२) रु. ३—०
२ अहवाल (शक १८३३) रु. ५—०
* ३ सुब्रंतविचार (वि. का. राजवाडे) १०—०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५—०
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (वि. का. राजवाडे) १—५०
६ प्रथम संमेलनवृत्त (शक१८३५) ०—७५
७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६—०
* ८ द्वितीय संमेलनवृत्त (शक १८३६) ३—०
९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३—०
१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३—०
११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६—०
१२ तृतीय संमेलनवृत्त (शक १८३७) ३—०
१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ०—५०
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ०—५०
१५ स्फुट प्रकरणें, भाग १ ला ०—७५
१६ स्फुट प्रकरणें, भाग २ रा ०—७५
१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३—०
१८ चतुर्थसंमेलनवृत्त (शक १८३८) ४—०
१९ राजवाडे खंड स्थलसूची ४—०
२० पंचम संमेलनवृत्त (शक १८३९) ३—०
*२१ संशोधनसंग्रह
२२ चंद्रचूड-दप्तर, कला १ (द.वि.आपटे) ३—०
*२३ महाराष्ट्र-सारस्वत १०—०
२४ षष्ठ संमेलनवृत्त (शक १८४०) ४—०
२५ सप्तम संमेलनवृत्त (शक १८४१) ३—०
२६ संशोधकाची छोटी जंत्री (आपटे) ०—२५
२७ मंडळप्रदर्शनपरिचय ०—२५
२८ फार्सी पत्रव्यवहार (गं.ना.मुजुमदार) ५—०
२९ फार्सी-मराठी कोश (मा.त्र्यं.पटवर्धन) ४—०
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला (कृ. वा. पुरंदरे) १—५०
३१ हिस्टॉरिकल मिसलेनी १—०
३२ पुरंदरे-दप्तर, भाग १ (कृ.वा.पुरंदरे) ४—०
३३ शिवचरित्रसाहित्य, खंड २ ४—०
३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड १ (ग. ह. खरे) २—०
*३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ २—०
३६ राजारामचरितम् (वा. सि. बेंद्रे) १—५०
३७ मंडळांतील नाणीं (ग. ह. खरे) १—०
*३८ शिवचरित्रसाहित्य, खंड ४ १—५०
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही (वा. सि. बेंद्रे) ४—०
*४० ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ (ग. ह. खरे) १—५०
*४१ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड २ (ग. ह. खरे) २—०
*४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड २ १—५०
*४३ मंडळचित्रग्रंथ, चित्रें २० ०—५०
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३ (शं. ना. जोशी) २—५०
४५ विजयनगर-स्मारक-ग्रंथ (करमरकर व ओतुरकर) ४—०
*४६ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड २ (ग. ह. खरे) १—५०
४७ शिवचरित्रसाहित्य, खंड ६ (ग.ह.खरे) १-५०
४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (शं. पु. जोशी) ०—७५
४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह (कानडी), भा. १ (पां. भी. देसाई) १—५०
४९अ अखिल भारतीय अर्वाचीन इतिहास परिषद पहिलें अधिवेशन ३—०
५० शिवचरित्रसाहित्य, खंड ७ (कृ.वा.पुरंदरे व ब. द. आपटे) १—५०
*५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३ (ग. ह. खरे) १—५०
५२} शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड २ व ३
५३} फार्सी विभाग (ग.ह.खरे), प्रत्येकीं १—२५
५४ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड १ (चिं.ग.कर्वे) १
*५४अ, ऐ. संकीर्ण साहित्य, खंड ३ ३—०

५५ शिवचरित्रसाहित्य, खंड ८ १—५०
*५५ अ, शिवचरित्रसाहित्य, खंड ५ ३—५०
५६ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड४ २—०
५७ ऐ. संकीर्ण वाङ्मय साहित्य, खंड१ १—५०
५८ शिवकालीन दंडनीति (वा.सि. बेंद्रे) ३—०
५९ पुणें नगरसंशोधनवृत्त, खं. २ (चिं. ग. कर्वे) १-५०
६० ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड१ १-५०
६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड५ १-५०
६२ शिवचरित्रसाहित्य, खंड ९ (शां. वि. आवळसकर) १—५०
६३ हिंगणे दप्तर, खंड १ (ग. ह. खरे) ३—०
६४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड६ १-५०
६५ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड३ २—०
६६ पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ (चिं. ग. कर्वे) १—५०
६७ महाराष्ट्रांतील कांहीं ताम्रपट व शिलालेख (डॉ. मो. गं. दीक्षित) ३—०
६८ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड७ २—०
६९ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड २ ३—०
७० हिंगणे दप्तर, खंड २ (ग. ह. खरे) ३—०
७१ आंग्रेकालीन पत्रव्यवहार (शां. वि. आवळसकर) ३—०
७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड४ २-५०
७३ पेठे दप्तर, भाग १ (वि.सि.चितळे) ३-०
७४ Explorations at Karad 5—0
७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व शकावली (शं. ना. जोशी) ३—०
*७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड ३ (ग. ह. खरे) ३—०
७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ४ (ग. ह. खरे) ३—०
७८ पेठे दप्तर, भाग २ (वि.सि.चितळे) ३—०
७९ पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (रा. वि. ओतुरकर) ३—०
८० इतिहासकर्ते मराठे (ग. ह. खरे) २—०
८१ दाभाडे दप्तर, खंड१ (शं.ना.जोशी) ३—०
८२ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खं. ४ (डॉ.मो. गं. दीक्षित) ३—०
८३ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड ४ (चिं. ग. कर्वे) २—०
८४ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५ ३—०
८५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ८ (द. वा. पोतदार) ३—०
८६ शिवचरित्रसाहित्य, खंड १० (शां. वि. आवळसकर) ३—०
८७ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड९ ३—० (शं. ना. जोशी)
८८ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ ५—०
८९ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड१० ५-० (शां. वि. आवळसकर)
९० शिवचरित्रसाहित्य खंड ११ (ग. ह. खरे) ५—०
९१ ऐतिहासिक संकीर्ण साहि[illegible], खंड ११ (य. न. केळकर) ५—०
९२ भारत–इतिहास–संशोधक–मण्डलस्थ–हस्तलिखित–ग्रन्थानुक्रमणिका (ग. ह. खरे) १५—०
९३ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ५ (ग. ह. खरे) ६—०
९४ शिवचरित्रसाहित्य, खंड १२ (ग. ह. खरे) ५—०
९५ शिवचरित्रसाहित्य खंड १३ (ग. ह. खरे) ६—०

मंडळ त्रैमासिक पुस्तकें १ ते ४०, ४३ प्रत्येकीं ५ रु. ४१-४२ ६ रु.

(१) याशिवाय सर्व प्रकारचीं ऐतिहासिक पुस्तकें मिळवून देण्याची खटपट केली जाईल.

(२) तारकांकित पुस्तकें अप्राप्य; पण क्र. ३५, ३८, ४०–४३, ४६, ५१, ५४ अ, ५५ अ, ७६ हीं त्रैमासिकांत भागशः प्रकाशित झालीं आहेत.

(३) स्वीय मालेंतील पुस्तकांच्या खरेदीवर खालीं दिल्याप्रमाणें सवलत मिळेल; २५–५० रु. = १० टक्के; ५१–१०० रु. = १२॥ टक्के; १०१ रु. व पुढें = १५ टक्के.